४.८०

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
नाटक

लेखक गो. कृ. टिळक

सन

ग्रंथालय क्रमांक
३२८

पुस्तकाचें नांव महाराज प्रतापसिंह

८३

नाटक

વારતા ~~૧૫૯~~ ૫૦૯

# महाराज प्रतापसिंह
## विजयनगरचा राजपुत्र

हें नाटक

## गोविंद कृष्ण टिळक

" बापू मेहेंदळे यांचें चरित्र " ह्याचे

कर्ते

यांणीं रचिलें

तें

अंबाजी कोन्हेरी, अंबाप्रसाद प्रेसाचे म्यानेजर,

यांनीं

आपले पुणें, "अंबाप्रसाद छापखान्यांत" छापून
प्रसिद्ध केलें.

इसवी सन १८९०.

—०※०—

[ सर्व हक्क राखून ठेविले आहेत. ]

चि० कै० वासुदेव कृष्ण टिळक

ह्यांस

हें नाटक

प्रेम पुरःसर

अर्पण केलें असे.

# नाटकांतील पात्रें.

## पुरुष

महाराज प्रतापसिंह—विजयनगरचा राजपुत्र.
सज्जनसिंग—महाराजांचा मित्र.
मत्सरसिंग—महाराजांचा नातेवाईक.
लालोदिन उर्फ लालासाहेब—दिल्लीचे बादशहाचा
मुलगा.
दिवाणजी—संस्थानचा कारभारी.
अहम्मद—लालासाहेबांचा स्नेही.

## स्त्रिया

लीला—महाराजांची बायको.
सत्कुवरबाई—थोरल्या आईसाहेब.
ललिताबाई—धाकट्या आईसाहेब.
पार्वती—लीलेची दासी.
मंजुळा—ललिताबाईची दासी.

नागरिक, गृहस्थ, वक्ते, जोशी, पहारेकरी, मुका, वेडी, वगैरे.

दादा भाई धुळे

# “महाराज प्रतापसिंह विजयनगरचा राजपुत्र” नाटक.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला—विजयनगरचा रस्ता.

[दोन नागरिक प्रवेश करितात.]

**पहिला**—कायहो आज सकाळचे एवढे गर्दीनें कोणीकडे निघालांत ?

**दुसरा**—ह्मणजे तुह्माला अजून माहीतच नाहीं वाटतं!

**पहिला**—छे बुवा. मला कांहींएक बातमी नाहीं. कांहीं नवल विशेष आहे कीं काय ?

**दुसरा**—अहात झालं! अहो जे आपल्या संस्थानचे प्रत्यक्ष भावी अधिपति ते आज येणार असून तुह्माला तर ह्या गोष्टीची दाद देखिल नाहीं तेव्हां चमत्कारच नाहींका ह्मणायाचा !

**पहिला**—हें पहा, कृपा करून रागावूं नका. कालच मी गावाहून आलों तेव्हां माहिती नव्हती ह्मणून विचारलं; तरीच आज अगदीं उजाडल्यापासून एवढी धामधूम चालली आहे; गांवांतून स्वार जिकडे तिकडे दवडत आहेत; अन् रस्ते साफसूफ करण्याच्या व्यवस्थेंत गांवकरी गुंतले आहेत वरंकां.

दुसरा–अहो, एवढ्यानच काय झालय! सर्व लोक आपआपल्या घरापुढें सडे घालून त्यावर नानातऱ्हेची रांगोळी अन् हळदकुंकवाची चित्र विचित्र नक्षी काढीत आहेत. कुलीन स्त्रिया नीटनेटक्या सजून महाराजांवर फुलांचा वर्षाव करण्यास सिद्ध झाल्या आहेत. शिवाय रात्रीं मोठा दीपोत्साह होणार आहे असेंही ह्मणतात.

पहिला–अन् संस्थानांतूनही कांहीं स्वागतार्थ तजवीज केली असेल कीं नाहीं!

दुसरा–हो हो. केव्हां आहे तर! दोन मैल घोडेस्वार अगदीं सारखे उभे केले आहेत. तिथून अंतरा अंतरावर पायदळ उभं केलं आहे. आणखी गांवांत स्वारी आली कीं दरबार भरायचा आहे.

पहिला–अरेवा! तर मग चांगलीच तयारी केली आहे ह्मणायची. कायहो पण ते यायचे तरी कोठून?

दुसरा–नळदुर्गाहून.

पहिला–नळदुर्गाहून! पण नळदुर्गास जायचं काय बरं कारण असावं.

दुसरा–एकंदरींत तुह्माला कांहींच माहीत नाहींसं दिसतं, सगळंच सांगितलं पाहिजे.

पहिला–तर मग सांगाल तर मेहरबानी होईल.

दुसरा–दिल्लीचे बादशहा फिरोजशहा तुह्माला ऐकून ठाऊक आहेतना?

पहिला–आहेत. बरं त्याच काय?

दुसरा–त्यांचं ह्या संस्थानावर पूर्वीपासून फार प्रेम आहे.

पहिला—असं कां !

दुसरा—त्यांनीं असं फर्मावलं होतं कीं, आमच्या युवराजाच्या सोबतीनं विजयनगरच्या राजपुत्राचा विद्याभ्यास व्हावा ह्मणून दोघांना ही कांहीं वर्ष नळदुर्गास मुनसीच्या हाताखालीं ठेवावें.

पहिला—तर मग शिक्षणाकरितां स्वारी नळदुर्गास होती कां ! बरं. पुढं ?

दुसरा—तेव्हां आतां शिक्षणक्रम संपल्यामुळें कां दुसऱ्या कांहीं गूढ कारणांनीं ते नळदुर्गाहून परतले आहेत ते आज दाखल होतील.

पहिला—आतां सर्व जुळलं. कायहो पण तुह्मी गूढ कारणं ह्मणतां तीं काय आहेत ?

दुसरा—ह्मणजे इतकंच कीं, बादशाहाच्या मुलाशीं महाराजांचं पटेना अन् अपमान व्हायला लागला. तेव्हां त्रासून परतले असं कुणी ह्मणतात.

पहिला—परंतु हें खरं कितपत आहे !

दुसरा—खरं जर पुसाल तर कांहीं तरी भांडणतंटे झाले ह्यांत कांहीं संशय नाहीं. स्वतःबादशहाला देखील तो मुलगा आवरत नाहीं. तेव्हां त्याचंन् महाराजांचं एके ठिकाणीं कसं जुळणार ! किती झालं तरी ते मुसलमान; हे रजपूत.

पहिला—हं आतां समजलों. पण हे मोठ मोठे आवाज कसले ऐकूं येतातहो.

दुसरा—[कान देऊन] हं स्वारी शहराबाहेर येऊन

धडकली वाटतं. हो. ह्या तोफाच सुटताहेत. चला आपण मौज पाह्यला जाऊं.

पाहिला—चला तर लवकर.

[ जातात. ]

## प्रवेश दुसरा—शहराबाहेरील तंबू.

[ लालोद्दिन आणि अहम्मद प्रवेश करितात. ]

**लालोद्दिन**—कायरे अहम्मद, तर मग बाबा इतके कां संतापले आहेत?

**अहम्मद**—संतापणार नाहींततर काय करतील! आपण शिकारीला ह्मणून एक दिवसाच्या मुदतीनें निघालेत त्याला आज पांच दिवस झाले. बरं, इथें मुक्काम झाला तर कांहीं निरोप बिरोप पाठवावा तर तें देखील कांहीं नाहीं. त्यांनीं समजावं तरी काय? शेवटीं आपला शोध करण्याकरितां निघण्याचा बादशहांचा मला हुकूम झाला तेव्हां तावडतोब निघणं भाग पडलं. तर आतां आपण उद्यां येथून तळ हलविण्याचा विचार करावाच एवढा माझा अर्ज आहे.

**लालोद्दिन**—मी तुला एकदां सांगितलंनां कीं, वाघाची शिकार तर झाली खरी; पण त्या हरिणीचा एकदां कां शिकार साधली कीं निघायचंच ह्मणून. मग उगीच उतावळी करण्यांत काय अर्थ आहे. शिकार साधेपर्यंत काय होईल तें होवो; आपण तर बुवा येथून नाहीं हालायचे.

**अहम्मद**—हा आपला अगदीं निश्चयचनां!

लालोद्दिन–हो निश्चयच. हा अगदीं मोडायचा नाहीं. पुढें काय!

अहम्मद–पुढें काय आपली मर्जी! दुसरं काय.

लालोद्दिन–अरे तुला काय सांगूं! केवळ अप्सरा आहे बरं! तिचें सौंदर्य पाहून मुक्याला देखील वाचा फुटेल. राक्षसाला देखील दया येईल. पशूंना देखिल आनंद होईल!! आपण तर असं समजतों कीं ती वश झाल्याशिवाय जन्माचं सार्थकच नाहीं. तेव्हां तुझं काय ह्मणणं?

अहम्मद–आपल्या पुढें माझं कांहीं ह्मणणं नाहीं. मला मात्र रजा असावी एवढंच मागणं आहे.

लालोद्दिन–ठीक आहे. जा. पण बाबांना काय सांगशील?

अहम्मद–सांगेन कीं, लालासाहेब हरिणीच्या शिकारींत अगदीं गर्क आहेत ह्मणून.

लालोद्दिन–शाबासरे शाबास! दोस्त असावा तर असाच असावा!

अहम्मद–तर काय सांगूं तें आपण सांगा.

लालोद्दिन–अरे तूंच कांहीं तरी शोभेलसं सांग.

अहम्मद–मला जे सयुक्तिक दिसेल तें तर मी सांगणारच होतों. पण आपणच ह्मणालां—

लालोद्दिन–हं पुरे पुरे आतां आपलं पांडित्य. आपला कांहीं एक तर्क न चालवितां आह्मी सांगतों तसं करा ह्मणजे झालं.

अहम्मद–ठीक आहे.मी कांहीं आपल्या बाहेर नाहीं.

**लालोद्दिन**–चाचांना ह्मणावं कीं, अगदी ह्या विजयनगरच्या आसपासच्या रानांत वाघांनीं फार वंडाळी माजविली आहे. अन् लोक अगदीं कसे त्रावरून गेले आहेत. तेव्हां तेवढा वाघांचा समाचार घेऊन लालासाहेब लागलीच परतणार आहेत.

**अहम्मद**–बरं आहे.युक्ति तर मोठी इरसाल निवाली.

**लालोद्दिन**–हें बत्र त्यांनां सांग कीं, गांवचे गांव ओस पडायला लागले आहेत. दर रोज दहा वीस माणसं बळी पडतात त्यामुळें लोकांच्या तोंडचं अगदीं पाणी पळालं आहे; बरं कां. कसं खुलवून सांगशील !

(त्याच्या गळ्यास मिठी मारितो.)

**अहम्मद**–हो हो. तें मला मुळींच शिकवायला नको.

**लालोद्दिन**–शाबास शाबास! (पाठीवर थापट मारतो.)

**अहम्मद**–बरं आहे. आपली शाबासकी पुरे आतां. घेतों आह्मी निरोप. (सलाम करतो.)

**लालोद्दिन**–जा. पण ए सांग जपून अं. (अहम्मद जातो.) चला एकदांची ही बाबांचीं पिरपीर संपली. नाहीं तरी भारीच रागीट स्वभाव बुवा त्यांचा. आह्मी कोणत्या नाजुक कामांत गुंतलेले अन् ह्यांचा आपला संताप! लागलीच त्या अहम्मदाला पाठवून आमचा शोध करिवला. जसें कांहीं आह्मी ही पृथ्वी सोडून पार नाहींसे झालों! पुरे; जाऊं द्या ही कटकट. आतां ह्या फटाकडीसाठीं काय पाहिजेल तें करायास तयार

व्हायचं. वेळेस जीव देखील देण्यास मी मागें पुढें पहाणार नाहीं! अशा मैनेला माझ्यासारखाच पोपट पाहिजे. आज चार दिवस झाले, त्या दिवशीं नजरानजर झाली; तेव्हां पासून ह्या बागेंत तिनं पाऊलच नाहीं टाकलंन. दररोज येते ह्मणून मला सारखी फशीवते आहे. बरं आहे; ह्मणावं हा लाल तुला मांडीखालीं घातल्याशिवाय कधींही सोडणार नाहीं!

[जातो.]

## प्रवेश तिसरा—दरबारची जागा.

[भालदार चोपदार ललकारत असतां महाराज प्रवेश करितात सरदार दरकदार उठून पुनः आपापल्या स्थानीं प्रविष्ट होतात. दिवाण मानपत्र वाचतात.]

**दिवाण**—श्रीमत् क्षात्रकुलमुकुटमणि स्वधर्मप्रतिपालक नानाविद्यागुणविभूपित राजाधिराज प्रतापसिंह महाराज संस्थान विजयनगर यांच्या चरणसेवेशीं.

संस्थानिक प्रजाजन अति नम्रपणें विज्ञप्ति करीत आहेत. महाराज, आपला विद्याभ्यास निर्विघ्नपणें समाप्त होऊन, नळदुर्गाहून आपलें संस्थानांत सुखरूप आगमन झालें ह्मणून ज्याप्रमाणें चंद्र दर्शन होतांच समुद्राला भरती येते तद्वत् आह्मां प्रजाजनांचे हृदयांत आनंदाचे पूर लोटले आहेत. अशोधित धातु शुद्ध झाल्यावर जशी उज्वल दिसते त्याप्रमाणें विद्येचा संस्कार झाल्यामुळें महाराजांच्या मनास विशेष प्रकारची शोभा आली असें पाहून आम्हांस परम संतोष होतो. महाराजांना आतां लवकरच राजपद प्राप्त

होईल अशी सर्व प्रजेला सबळ आशा आहे, आणि स्वराज्यछत्राच्या छायेखालीं सुखाचें वारें लागो अशी आमची उत्कटेच्छा आहे. संस्थानांत जिकडे तिकडे आबादानी ठेवून प्रजेचें सदैव कल्याण करणें हें जें राजाचें कर्तव्य तें बजावण्यास महाराजांनीं सिद्ध असलें पाहिजे आणि राज्यश्रीस जेणेंकरून शोभा येईल असें वर्तन ठेवलें पाहिजे.

"सांगावें तें काय सर्वज्ञ तूं राजा ॥
अनाथाच्या काजा साह्य व्हावें ॥"

हा महासाधु तुकाराम ह्यांचा उपदेश रात्रंदिवस आपण मनांत ठसविला पाहिजे. "ज्या राज्यांत गोरगरीबांची दाद लागते तें राज्य उत्तम." ही थोर पुरुषांची उक्ति महाराजांनीं विसरतां कामा नये. सरते शेवटीं महाराजांच्या प्रवासांतील श्रमाचा अपहार होऊन ते सर्वदां सुखांत नांदोत आणि परमेश्वर त्यांना चिरायु करो अशी प्रार्थना करून आह्मीं हें मानपत्र आपल्या चरणीं अर्पण करतों.

**महाराज**—सर्व सरदार, मानकरी व शिष्टजनहो, आपण सर्वांनीं आज जें माझें स्वागत आणि अभिनंदन केलें त्याबद्दल कृतज्ञता दर्शविण्याकरितां मी आपली परवानगी घेतों. ज्या वेळेस ईश्वरकृपेनें आपणा सर्वांना माझी प्रजा असें ह्मणण्याचा मला अधिकार येईल आणि ज्या वेळीं संस्थानिक ह्या नात्यानें माझ्याशीं आपला प्रत्यक्ष निकट संबंध घडेल त्या वेळेस ही कृतज्ञता शब्दरूप न रहातां माझ्या हातून कृत्यांनीं

प्रदर्शित होईल अशी मी आशा करतों. त्याच वेळीं संस्थानांतील प्रजेला शिक्षण देण्याच्या उद्देशानें माझे हातून जे यत्न होतील आणि त्यांना सुखावह अशा ज्या सुधारणा अमलांत येतील, ते यत्न व त्या सुधारणा आपणाला मान्य झाल्या ह्मणजे मी आपल्या विद्येचा योग्य उपयोग केला असें मानीन. ज्याच्या कीर्तीचे आणि सत्तेचे झेंडे सर्व राजपुतान्यांत फडकत आहेत असें आपलें हें विजयनगरसंस्थान आज एक दोन पिढ्या सार्वभौम सत्तेखालीं आहे हें मी पूर्ण जाणून आहे. अधिकार मिळाल्यावर बादशहांच्या प्रतिनिधीच्या धोरणानें आणि उपदेशानें, संस्थानिक मुत्सद्यांच्या अनुमोदनानें आणि राजधर्मान्वित पद्धतीनें हा राज्यशकट माझ्या हांतून सुलभतेनें सुरक्षित ओढला जाऊन ह्या गादीचा जिकडे तिकडे नांवलौकिक व्हावा आणि तो कानीं येण्याचें माझें सुदैव असावें एवढेंच परमेश्वराजवळ माझें मागणें आहे. राजपुतान्यांतील राजमंडळांत चांगलें नांव मिळवावें आणि ह्या राज्याला पूर्वीचें वैभव आणावें अशी माझी महत्वाकांक्षा आहे. दयाळू बादशहा फिरोजशहा ह्यांच्या साहाय्यानें हे सर्व हेतु सिद्धीस नेण्यास कांहीं अडचण येणार नाहीं अशी मी आपली खात्री करतों. आपला व माझा संबंध लवकरच घडून येवो आणि आपणा सर्वांचें मला साहाय्य असो एवढीच ईश्वराला माझी प्रार्थना आहे. ( अत्तर गुलाब वाटल्यावर दरबार बरखास्त होतो. )

**प्रवेश चवथा—राजवाड्यांतील खोली.**

[ लीला आणि पार्वती प्रवेश करतात. ]

लीला–कायग पार्वती, स्वारी वाड्यांत येण्याची वेळ झालीच नाहीं कां ह्मणायची आतां, आठ तर वाजून गेले असतील.

पार्वती–होय बाईसाहेब, आठ मघाच वाजले.

लीला–मग अजून स्वारीचें येणं कसंहोत नाहीं बरं.

पार्वती–येतील बाईसाहेब आतां.

लीला–गडे पण केव्हां येणं होईल सांग पाहूं. मला तर किनई आतां एकेक पळ युगासारखं वाटूं लागलय. आज तीन वर्षं नाहीं कां काढलीं ! पण तितक्या दिवसांत आतां सारखी उतावळी मी कधींच झाल नव्हते. जीव कसा तळमळ तळमळ करतोय. एकदां कां डोळे भरून जेव्हां ती मूर्ति पाहीन, तेव्हां अगदीं थंडगार होईन.

पार्वती–हें काय बाईसाहेब, इतकी तगमग कशाला पाहिजे. जसं कांहीं आपलंच काय तें प्रेम ! तुम-च्यांना कुणाला आहे कां प्रेम माहीत !

लीला–हो. पुरे प्रेम तुझं. शपथ आहे तुला खरं सांग, तुला नाहींना असं वेड्यासारखं कधीं झालं.

पार्वती–छे बाईसाहेब. मी नाहीं भेटण्याकरितां येवढी कधीं वेडी झाले.

लीला–तर तर ! तुझीन् तुझ्या नवऱ्याची सहा सहा महिन्यांत गांठ तरी पडते आहे कां !!

पार्वती–गांठ पडली ह्मणून काय झालं.

**लीला**—पण कायग गांवांत स्वारी येऊन पोंचली कीं नाहीं ह्याचा पक्का शोध काढून आलीसना ?

**पार्वती**—होय बाईसाहेब. गांवांत स्वारी आल्याला चांगल्या चार घटका झाल्या.

**लीला**—तर मग इकडे यायला इतका उशीर कसा होईल. हें बघ एखाद्याला उपास पडावा कनै,तशी गत माझी अवस्था झाली आहे. जा तूं पुनःशोध करून ये.

**पार्वती**—हें काय ! मी खरच चवकशी करून आलें. संध्याकाळीं येणार अशी गांवांत बोलवा आहे, अन् दिवाणसाहेबाकडेही असंच कळलं मग हावं असलं तर आणखी जाते.

**लीला**—अशीग काय माझी चेष्टा करतेस. ही वेळ का वरं चेष्टेची ! जा तूं पुनः तपास काढ. (पार्वती जाऊं लागते.) कायग पण खरंच कां नाहीं आतां येणं होत ?

**पार्वती**—काय तरी बाई वेड हें ! आतांची वेळ चुकली ह्मणून एवढं कांहीं खिन्न नको अगदीं व्हायला; संध्याकाळ आतां लांब कां आहे.

**लीला**—बरं जा तूं. आतां मला अमळ स्वस्थ पडूं दे. (पलंगावर पडते.)

**पार्वती**—बाईसाहेब असं करून कसं चालेल. हे पहा महाराज पाहिलेत कां इकडेच येताहेत तें. तुह्मी निजलेल्या पाहून त्यांना वाटेल तरी काय ! उठा उठा कशा.

**लीला**–पुरेग मेली तुझी थट्टा. माणसानं बाई तुझ्यावर विश्वास ठेवावा तरी कसा.

**पार्वती**–आतां काय सांगावं बाईसाहेब. अहो खरंच आले!

**लीला**–खरंच कां पण! नकोग मला असा फसवूं. (उठून पाहूं लागते.) अग बाई! खरंच स्वारी आली. मना, आतां कां बरं उगीच तळमळ. घटकेचा कां आतां प्रहर होतोय्. जरा धीर धर; मग आनंदानं वाटेल तितक्या उड्या मार. (महाराज आपल्या मित्रासह प्रवेश करतात. लीला नमस्कार करून बाजूस उभी रहाते.)

**महाराज**–पुरे पुरे. एवढे उपचार नकोत. अशा वेळेस तेवढं लज्जाभूषण काढून ठेवून जवळ बसाल तर त्यांतच काय तो खरा आदरसत्कार आहे.

**लीला**–इश्श! मर्यादा सोडणं एवढंच प्रेमाचं लक्षण आहे की काय? मी आपली अशीच उभी राहीन.

**महाराज**–प्रिये, तुला पाहून माझे हृदयाला रमणीय विकारांचें जें सौख्य होत आहे तसेंच जर प्रत्येक वेळीं प्रवासश्रमानंतर व्हायचें असेल, तर असाच प्रवास सर्वदा घडो अशी माझी देवाला प्रार्थना आहे. अशा प्रवासांत मग जरी मरण आलं तरी तें पूर्ण सुखाकरतांच. ह्या घटकेस ह्या जगांतील एक रमणीय प्राण्याचं मजवर परम निष्काम प्रेम आहे. अशा आनंदापेक्षां भावी भवितव्यंत अधिक तें काय असणार!

**लीला**–छेग बाई. नको नको! देव करोन् असं

कध्धीं न होवो. आपलं प्रेम आणि सौख्य हीं दोन्हीं आपल्या आयुष्याबरोबर वाढोत ह्मणजे झालं.

**महाराज**–बरं तर. तुझ्या ह्मणण्याप्रमाणेंच दैविक शक्तीचा ओघ असो. खरोखर ह्या वेळीं मला जें समाधान होत आहे तें बोलून दाखविणें अशक्य आहे.

**लीला**–असंच सदैव समाधान वाटो अन् कलह करण्याची दुष्ट वासना दूर पळो.

**महाराज**–असंच होईल बरं. अतिशय सुखाच्या वेळीं अशीच भीति मनांत उत्पन्न होते पण त्याला कारण कांहीं नाहीं.

**सज्जनसिंग**–(आपल्याशीं) अहाहा! किती रमणीय प्रीति ही! असें जोडपें सदा सुखांत कां नाहीं नांदणार!

**मत्सरसिंग**–( बाजूस ) हो हो. पाहून घेईन हें जोडपं कसं सुखांत नांदतं तें.(सज्जनसिंगास)सज्जनसिंग, खरोखर आपण ह्मणतां असाच ईश्वरी संकेत दिसतो.

**महाराज**–( दोघांकडे वळून लीलेस ) प्रिये, हे माझे स्नेही मला सख्या भावाप्रमाणें आहेत बरं. प्रवासांत ह्यांनीं मला फार सौख्य दिलं. ह्यांच्यावर तूं देखील अशीच ममता करशील.

**लीला**–हें काय! इकडे जें प्रिय तें मलाही प्रियच आहे.

**महाराज**–बरं बसा आतां. सज्जनसिंग, चला. आई साहेबांकडे जाऊं एकदां. ( जातात. )

**लीला**–(आपल्याशीं) डोळ्यांनो, अजून नाहीं कां तुमची हौस पुरली? धीर धरा. आतां नेहमीं तुह्माला

दर्शनसुखाचाच महोत्साह आहे नरं. पार्वती चल, अंगधुण्याची तयारी कर, अन् हें बघ आजकिनै जरीकाठी शालू चुणून ठेव आं.

पार्वती—होय. ठेवतें तोच. पण बाईसाहेब, आज अगदीं अशा सगाल कीं दृष्टच काढली पाहिजे.

लीला—पुरे कर गडे तुझी आतां थट्टा, अन् ऊठ आधीं.

(पडदा पडतो.)

## प्रवेश पांचवा—राजवाड्यांतील खोली.

[धाकट्या आईसाहेब ऊर्फ ललिताबाई प्रवेश करतात.]

ललिताबाई—(स्वतःशीं) काय बाई ज्या दैवाला भीत होतें तेंच कसं दत्त ह्मणून पुढें येऊन उभं राहिलं! काल स्वारी आली मात्र तो बाईंच्या जवळ गुजगुज गोष्टी झाल्या दिखील. पण मजकडे नुसता कोरडा मुजरा करायला सुद्धां फावलं नाहीं! उघडच आहे. माझ्या मांडीवर थोडेच त्यांना दत्तक दिलय् तर ते माझा मान ठेवतील. किती केलं तरी चिकटविलेला संबंध तो किती दिवस टिकणार! त्या सुकुमार राजकुमारावर, त्या मनमोहक राजबिंड्यावर किती तरी माझा जीव गुंतला होता! पण माझे मनोरथ पूर्ण कोठून होणार! जन्मापासूनच माझं दैव माझ्या पाठीमागं हात धुवून लागलयना! उपजलें तीच गरीबींत. तशांतून लहानपणींच आई मेली. मग सुखाचं नांव तरी कशाला काढायला पाहिजे! पण पुढें होतं कांहीं पूर्वजन्मीचं पुण्य, ह्मणून असल्या राजघराण्यांत तरी पडलें.

लग्न होऊन चार वर्षं दिखील पुरीं झालीं असतील नसतील. मी ऐन तारुण्याच्या भरांत अन् संसारसुखाची झुळुक कुठं लागूं लागली असेल तों दैवच कां परतं आडवं येऊं नये? ज्यांच्या जीवावर मौजा मारायच्या तेच आपले गेले! वर्ष सहा महिने लोटताहेत तों एकदाचं तें दत्तविधान झालं. दत्तकही बाईंच्याच मांडीवर दिला. त्या वेळेस माझीं कुठं अठरा वर्षं संपलीं असतीलन् महाराजांना सोळावं नुकतं टेकलं असेल; दोघंही अज्ञानच नाहीं तर काय? एका ठिकाणींच बसायचं; एकमेकं हसायचं, खेळायचं. जमला जीव झालं. मग त्यांच्या मनांत कांहीं किंतु असेल कीं नसेल; पण बाई माझ्या मनांत तर भलभलते विकार होऊं लागले अन् पुढं मन कांहीं अवरेना. मग काय करा? महाराजानांच एकदां आपलसं करून टाकावं म्हणजे आपलं जन्मभर सुख, असं मनांत येऊन मी जो स्वतः जुळवणार तों त्यांनाच परतें नळदुर्गास नेले. मग काय, अर्थांतच सर्व मावळलं. तरी माझ्या मनांत अजून थोडासा आशेचा अंकुर होता, पण काल जों पहातें तों आपला सर्वच रंग फिरलेला. हे महाराज आतां पूर्वींचे नव्हत. मी होऊन तीन तीनदां पुढं गेलें पण एक शब्द कां ढुंकून पहाणं दिखील नाहीं! बरं म्हणावं; मी पण कांहीं आतां आपल्यावर येवढी अगदीं लुब्ध नाहीं. माझ्यांतही कांहीं पाणी असेल. (मंजुळा प्रवेश करते.) कायग मंजुळे, बरीच आलीस कींग वेळेवर!

**मंजुळा**—काय बाई साहेब, मी तरी काय करूं?

आपलं हें पाणीच मळा बाधलं म्हणून उशीर झाला.

ललिताबाई—म्हणजे!

मंजुळा—म्हणजे काय. ह्यापेक्षां नसलं चांगलं रूप तर बरं नाहीं कां?

ललिताबाई—अग तूं म्हणतेस तरी काय!

मंजुळा—अहो म्हणते काय मी आपलं डोंबल. त्या अस्वलानं जीं मला मगरमिठी मारली ती कांहीं केल्या सोडीना. (रडत) मला असं झालं कीं, पुनः हे पाय दृष्टीस पडताहेत कीं, नाहीं.

ललिताबाई—पण तुला रडायला काय झालं?

मंजुळा—आतां माझे यजमान मला म्हणतील तरी काय? तो दांडगा मळा अगदीं चिलगला तो. ह्यापेक्षां नसलं रूप तर बरं. मी आपली भोळी म्हणून सांपडलें तावडींत.

ललिताबाई—तूं शुद्दीवर आहेस कां पण आज?

मंजुळा—काय त्या लालाला एवढं रूप आवडलं कुणाला ठाऊक,

ललिताबाई—तरी म्हटलं म्हणतेस काय. वा! काय पण तुझं रूप! म्हणूनच लालासाहेब तुझ्यावर अगदीं प्रसन्न झाले बरं कां.

मंजुळा—माझंच कशाला रूप पाहिजे. तुम्ही सुंदर म्हणून भुलून दांडगाई मात्र माझ्याशींच करायाला लागला.

ललिताबाई—इश्श, कांहीं तरी भलतच आपलं. तुझ्या जिभेला हाड आहे कां कांहीं मंजुळे?

मंजुळा—मला म्हणे, तुझ्या यजमाननीला आज

बागेंत खास आणशील तर तुला सोडीन. मला असं झालं कीं, मी कुठून इथें आलें.

**ललिताबाई**—बरं. आतां थट्टा पुरे. काय काय झालं तें नीट सांग.

**मंजुळा**—काय सांगूं! तुह्माला काय भाळलाय पण. अगदीं पाया पडत यायला तयार झालाय्.

**ललिताबाई**—खरंच कां मंजुळे पण?

**मंजुळा**—आतां कसा त्याला मुठींत ठेवाल!

**ललिताबाई**—अग तें काम माझं. तूं मात्र तेवढ्या ऐनेमहालाच्या किल्या दिवाणजीकडून हळूच आणून ठेव. आज रात्रींच् ठरलंय्ना?

**मंजुळा**—अशा मध्यान्हीला येऊं असं बोलले.

**ललिताबाई**—जा तूं तर आतां. [मंजुळा जाते.] ठीक आहे. बरंच जमलं. आतां पहातें महाराजांचा काय नक्षा चालतो तो. लालासाहेब दिखील पुरुष कसा देखणा आहे. शिवाय सत्ता केवढी! [जाते.]

## प्रवेश सहावा.

महाराजांच्या दिवाणखान्यांत जाण्याचा रस्ता.

[सज्जनसिंग आणि मत्सरासिंग प्रवेश करतात.]

**मत्सरासिंग**—कां सज्जनसिंग, कोणीकडे येवढ्या गर्दीनें?

**सज्जनसिंग**—अहो कोणीकडे ह्मणून काय विचारतां. महाराजांकडे.

**मत्सरसिंग**—पण येवढा उतावळेपणा कां. मनु-

ष्यांत उतावळेपणा असणं हा कांहीं मोठा गुण नव्हे. कांहीं करणं झालं तरी तें कसं शांतपणानें करावें. अशांतच काम करणाराची गंभीरता आणि दूरदृष्टि हीं दिसून येतात.

**सज्जनसिंग**—तो तुमचा वेदान्त कांहीं असो. पण माझा उतावळेपणा महाराजांना भेटण्याची माझी उत्सुकता दाखिवतोय् असें समजा. मत्सरसिंग, हें पहा महाराजांची जर एक सगळा दिवस गांठ पडली नाहीं तर आपल्याला बुवा कर्मनासें होतें.

**मत्सरसिंग**—होहो. तुमचंन् त्यांचं केवढं रहस्य!

**सज्जनसिंग**—कां वरं; रहस्य कां नाहीं? अहो त्यांचन् आपला लहानपणापासूनच सहवास किती दृढ झाला आहे वरं!

**मत्सरसिंग**—तेंही कांहीं अंशीं खरं आहे. सख्खीं मायलेक असतात, अन् तीं जर नेहेमीं एकमेकांपासून दूर असलीं तर त्यांना परस्पराविषयीं कांहीं सुखदुःख वाटत नाहीं; आणि तींच परकीं जरीं असलीं, पण त्यांचा जर बराच परिचय आहे तर एकमेकांचं कांहीं बरं वाईट झालं कीं, त्यांना किती कळकळा येतो वरं! तेव्हां तुमच्या ह्मणण्याप्रमाणें हीं सारीं सहवासजन्य फळें आहेत तर?

**सज्जनसिंग**—छे छे. महाराजांसंबंधानें पाहिलें तर केवळ सहवास एवढंच कांहीं कारण नव्हे. तर ते आपणास समदृष्टीनें वागवितात; आपल्यावर प्रीती करतात; भावाप्रमाणें आपली काळजी वाहतात. अशी

एक दोन? अनेक कारणें आहेत खरं.

मत्सरसिंग—परंतु ह्या सर्वांत सहवासच प्रधान. इतर गोष्टी त्याच्याच अनुषंगानें जमून येतात.

सज्जनसिंग—मला नाहीं बुवा तसें वाटत.

मत्सरसिंग—तर मग ह्यांत त्यांचा मोठा थोरपणा आहे असें तुमचें ह्मणणें कीं काय?

सज्जनसिंग—उघडच आहे. अहो, आपण त्यांचे गरीबींतले स्नेही. आतां त्यांना सुदैवानं उच्चपद लाभलं आहे खरं. पण त्याबरोबर असणारा जो स्वाभाविक ताठा तो त्यांच्यांत तिळभर तरी दिसून येत आहे कां? त्यांच्या पूर्वींच्या आणि प्रस्तुतच्या वर्तनांत लेशमात्र तरी अंतर आहे कां? तर ह्यांत त्यांच्या मनाचा मोठेपणा नाहीं तर काय? अहो योग्यच आहे; थोर कुळांतील लोक जरी कोणत्याही स्थितींत असले तरी ते आपली सुशीलता आणि सौजन्य कधींही विसरत नाहींत.

मत्सरसिंग-(बाजूस)अरे मीही कुलीन नाहीं कां? पण माझी प्रशंसा करशील तर गुलामा तुला पाप लागेल. कारण माझ्यापासून तुला लाभ थोडाच आहे!

सज्जनसिंग—कां मत्सरसिंग स्तब्ध कां? आमचं ह्मणणं तुह्माला नसलं मान्य तर नसूं द्या.

मत्सरसिंग—छे बुवा सज्जन, तूं गृहस्थ अगदीं खऱ्या अंतःकरणाचा आहेस. जसा बाहेर तसा आंत. महाराजाचे आपल्यावर अनंत उपकार आहेत हें तूं अजून जाणतो आहेस. कायरे पण तुला दत्तक होण्याचा हक्कच नव्हता असं केव्हां केव्हां महाराज जे

मला ह्मणतात तें तुला योग्यच वाटतं कां? (बाजूस) पहावें आतां काय उत्तर देतो तें.

**सज्जनसिंग**—मला तर त्याचं म्हणणं नीट दिसतं. कारण तुम्हीं असं पहा कीं त्यांचं नातं अगदीं जवळचं आहे.

**मत्सरसिंग**—बरं, तें एक असो म्हणा. पण एखाद वेळ मनाला टोंचेल असं कांहीं ते एकदम बोलतात तेव्हां तर माझ्यासारखंच तुम्हाला देखील वाईट वाटत असेल?

**सज्जनसिंग**—छेहो. ते कांहीं बोलोत; मला तें गोडच वाटतं अन् राग तर मुळींच येत नाहीं. आपल्यापेक्षां जर तें विद्येनें श्रेष्ट आहेत तर ते जो उपदेश करतील तो आपल्याच हिताकरितां असं मानून त्यांच्या कल्याणवृद्धीची आणि उत्कर्षाची इच्छा मनांत बाळगावी हाच आपला धर्म असं मी तर समजतों.

**मत्सरसिंग**—शाबास शाबास! खरोखर असें समजणें ह्यांतच आपण आपल्या कर्तव्याला पराङ्मुख होत नाहीं ह्याची साक्ष आहे.

**सज्जनसिंग**—बरं तर चला आतां आपण बरोबरच महाराजांकडे जाऊं

**मत्सरसिंग**—व्हा पुढें. हा मी तुमच्या मागोमाग आलोंच. (सज्जनसिंग जातो.) (आपल्याशीं) अरे लुच्चा, अशा गोडगोड भाषणांनीं तूं वाटेल तेवढं जाळं पसरशील ह्मणून मी त्याच्यांत सांपडेन कीं काय? उलटें तुह्मा दोघांना मी जाळ्यांत घालीन. महाराज आणखी कसेही असले ह्मणून हा मत्सरसिंग

त्यांचे गुणांवर लुब्ध होऊन आपलें स्वतःचें हित आणि सौख्य ह्या दोन गोष्टी विसरणारा नव्हे बरं ! हाच महाराजन् मी बरोबर वाढलों ; बरोबर खेळलों; बरोबर शिकलों ; सर्व प्रकारें कसे अगदीं बरोबर वागलोंना ! तो ज्या कुळांतला त्याच कुळांत माझा जन्म, रूपानें तोन् मी सारखेच, दोघांचीं वयें एकच, ज्ञानानें दोघे बरोबर. एकंदरींत दोघांची योग्यता सारखीच कीं नाहीं !

पण आतां पहा. हे राजश्री दत्तक झाल्यापासून सर्वच पडदे कांहीं निराळे ! ज्या पडद्यावर हात ठेवावा तो आपला निराळेच सूर काढतो. त्याची ती शांतवृत्ति नाहींशी झाली; तो मनमिळाऊपणा अगदीं लोपला. त्या नम्रतेचा कसा अभाव झाला; तें प्रेम गेलं; त्या दयाळु स्वभावाचें तर नांव देखील काढायला नको; अन् आतां माझ्याशीं प्रतरणा मात्र करायला तयार अं! मला ह्मणतो काय कीं, मत्सरासिंग, आपण दोघे एका कुळांतले खरे पण गादीला हक्क मात्र माझाच अधिक. बच्चाजी मलाच दत्तक घेतला असतां ह्मणजे कोणाचा अधिक हें मीही पण पहातों. एकेक पहावें तों विलक्षणच कांहीं तरी. तो सज्जनसिंग ह्मणजे अगदीं साधारण स्नेही बरं कां. परंतु आतांशा ते तर ह्यांच्या जिवाचे कळिदे बनले आहेत. त्याला ह्मणायचं सज्जन, मला एकदां अधिकार मिळूं दे तर खरा, कीं थोड्याच दिवसांत तुला कारभारी केलाच ह्मणून समज. अन् मग आपण दोघे अगदीं एकमेकांच्या विचारानं कार-

भार पहायाचा. वा: ! काय ह्यांचे विचारन् केवढी ह्यांची अक्कल पण ! ! जसे कांहीं हे दोन राजकार्य धुरंधर मंत्री स्वर्गांतूनच अवतरले ह्मणायचे बरं आहे. चालूं द्या तुमचें मनोराज्य; घ्या एकमेकांच्या मसलती; ठेवा परस्परांवर विश्वास; करा एकमेकांवर प्रेम; माना आपल्यालाच शहाणे. आजपासून एका वर्षाच्या आंत इकडची सृष्टि कशी तिकडे फिरवून टाकतों पहा. ह्या पशूंनाहो खड्यांत घालून मजा करायाला किती उशीर ? आमच्या सारखे वस्ताद जादूगार मात्र पाहिजेत. (जातो.)

**प्रवेश सातवा**.—ललिताबाईची खोली.

[ ललिताबाई आणि लालोद्दिन प्रवेश करतात. ]

**लालोद्दिन**—आज असं कां बरं ? चेहरा अगदीं कोमेजून जायला एवढं झालय् तरी काय. मी सारखा आज आठ दिवस येतोय् पण तूं इतकी खिन्न कधींच नाहीं दिसलीस.

**ललिताबाई**—आज तरी कुठं पण मी खिन्न आहें. आपल्यालाच कांहीं तरी झालय् झालं.

**लालोद्दिन**—तर तर ! आमचीं कांहीं तरी समजूत करतां होय; खरं कळूं नाहीं द्यायचं वाटतं ? (तिच्या हनवटीवर हात ठेवून) दररोज हाच चेहरा किती प्रफुल्लित दिसायचा, अन् तूं किती प्रेमानं बोलायची. पण आज मी एवढा वेळ आर्जव करतोय् तरी एकदां देखील गोड हसत नाहींस. लाडके, आमच्यावर इतकी इतराजी कां बरं ?

ललिताबाई—इतराजी कसची आली आहे. सहज आज माझ्या जिवाला चैन नाहीं झालं.

लालोद्दिन—माझ्या हातून कांहीं अपराध कां झालाय्? असेल तर सांग मी तुझी क्षमा मागतों. पण हा मनोहर मुखडा एकदां खुलवून मला गार कर.

ललिताबाई—आपला कसला आलाय् अपराध. माझंच दैव फुटकं त्याला आपण काय कराल! सुखच जर कपाळीं नसेल तर तें होईल तरी कोठून!

लालोद्दिन—पण काय तें सांगशील तर खरी. माझ्या वल्लभेला असं केविलवाणें तोंड करून दीन शब्द काढण्याची पाळी आली तर मग मी जिवन्त असून उपयोग काय?

ललिताबाई—छेग बाई! माझ्या मेलीच्या सुखाकरितां ह्या आपल्या सुकुमार देहाला कशाला ते कष्ट हवेत. एवढ्या करतां कां ही काया अर्पण केली.

लालोद्दिन—हें बघ, एकदां हा जो तुझ्याशीं प्रेमसंबंध जोडलाय् तो तुझ्याकरतां मी प्राण देण्यास देखील मागें पुढें पहाणार नाहीं बरं! पण तूं सांग काय तें बस्स.

ललिताबाई—हें पहा लालासाहेब, माझ्या करतां जीव धोक्यांत घालून उगीच आपण बादशहांचं मन मात्र दुखवाल झालं. तर असं कांहीं करण्याची गरज नाहीं. मी ही अशी दुःखांतच मरायची कळलं.

लालोद्दिन—सुंदरि, माझ्या करितां कोण ही तुला काळजी अन् मला मात्र आपल्या करतां कांहीं करूं नका म्हणतेस तें मला कसं बरं गोड वाटेल! मी

तुझ्यावर इतका लुब्ध आहे कीं, हा देह तुझ्यावरून ओंवाळून टाकायला मी तयार आहे. बोल बोल काय तें एकदां.

ललिताबाई–माझ्यावर एवढं आपलं प्रेम आहे हें काय थोडं आहे. आपला जीव मजकरतां कळवळतो हें मी जाणत कां नाहीं! पण उगीच एखाद्याच्या मनाची परीक्षा करण्या करतां त्याला संकटांत घालणं मला नाहीं बाई आवडायचं.

लालोद्दिन–परंतु मला स्वतःला संकटांत पडण्यांतच जर आनंद वाटत असेल तर तुझा तरी कां बरं हट्ट?

ललिताबाई–हा कसला भलताच आनंद. कांहीं तरी वेडाच नाद धरायचा.

लालोद्दिन–आमचा आपला वेडाच नाद. तूं आतां काय तें मोकळ्या मनानें सांग, नाहीं तर तुला उद्विग्न पाहून माझ्या मनाला कांहीं सौख्य नाहीं. तेव्हां मी आपले प्राण तुझ्या प्रीत्यर्थ उद्यां अर्पण करणार.

ललिताबाई–(त्याच्या गळ्यांत मिठी मारून) अहाहा माझ्या जिवलगा! मज कपाळकरंटीकरतां जीव द्यायला तयारनां! मी आतां सांगतें काय तें. पण मी असलं साहस कां करून देईन!

लालोद्दिन–सांग तर आधीं सांग. मग दुसऱ्या गोष्टी.

ललिताबाई–सांगूंच कां तर मग आतां.

लालोद्दिन–सांगाच एकदाच्या.

ललिताबाई–हें पहा आपला हा चोरून झालेला व्यवहार किनै सगळा महाराजांना कळला.

**लालोद्दिन**–सगळं कळलं म्हणतेस ! पण कळण्याचा संभव तर कांहीं दिसत नाहीं बुवा. मी तर इथें किती गुप्त तऱ्हेनं येतसें.

**ललिताबाई**–कुणास ठाऊक बाई कसं कळलं तें; पण आज सकाळीं ते मंजुळेला अगदीं खोदखोदून विचारीत होते.

**लालोद्दिन**–मग !

**ललिताबाई**–ती कसची त्यांना थांग लागूं देते ह्मणा, पण त्यांना संशय आला आहे खास.

**लालोद्दिन**–ते कशावरून पण ?

**ललिताबाई**–मला बंदोबस्त करून बंदींत ठेवायचा त्यांचा विचार आहे.

**लालोद्दिन**–हें तुला कसं कळलं ?

**ललिताबाई**–दिवाणजी जवळ कुजबुज चालली होती ती मंजुळेनं ऐकून मला येऊन सांगितलं.

**लालोद्दिन**–एवढंच कां आणखी कांहीं आहे ?

**ललिताबाई**–पुढें मी दिवाणजीला मथवून त्यांच्याकडून सगळं काढून घेतलं.

**लालोद्दिन**–हं !

**ललिताबाई**–बादशहांना कळवून आपलाही बंदोबस्त करवणार आहेत ह्मणून तो बोलला.

**लालोद्दिन**–एवढंचनां, दुसरं नाहींनां कांहीं ?

**ललिताबाई**–एवढं कां थोडंच कां झालं.

**लालोद्दिन**–तुला कां त्याची काळजी. असा बंदोबस्त करायला स्वर्गांतून देवच खालीं उतरले पाहि–

जेत म्हणावं. मनुष्यांच्या हातून मात्र आमचं कांहीं एक वाकडं होत नाहीं.

ललिताबाई–बरं. मग याला आतां युक्ति काय?

लालोदिन–युक्ति कसली आली आहे. उद्यां ह्या तरवारीनं त्याचा समाचार घेतों ह्मणजे झालं.

ललिताबाई–भलतंच कांहीं तरी! मी नाहीं बाई असं करूं द्यायची.

लालोदिन–राह्यलं. तूं आपली सांग काय ती युक्ति.

ललिताबाई–त्यांना असेच ठेवून अधिकार मात्र मिळूं द्यायचा नाहीं. आणखी;—

लालोदिन–बोला बोला काय तें. लाजूं नका.

ललिताबाई–आणखी ह्मटलं माझ्या मांडीवर दुसरा दत्तक देऊन त्याला गादीचा मालक करायचा.

लालोदिन–ठीक आहे. पण ही गोष्ट कोणाच्या हातची आहे हे कळलं कां?

ललिताबाई–कळलं. बादशहा अन् लालासाहेब कांहीं दोन नाहींत. आपणच आपले माझे बादशहा.

लालोदिन–बरं; तेवढंही पत्करलं. पण बाबांना कांहीं शोभेलशी थाप दिली पाहिजे कीं नको.

ललिताबाई–हात्तिच्या थाप ती कशाला? मी सांगेन तेवढं ऐकत जा ह्मणजे झालं.

लालोदिन–पण तूं सांगणार काय?

ललिताबाई–दिवाणजीच्या तोंडाला जरा मधाचं बोट लावून त्याला मथवावा, अन् त्याच्याकडून महाराजांना जरा जाचांत ठेवावे.

**लालोदिन**–बरं. आणखी !

**ललिताबाई**–आणखी काय? मला ठाऊक आहे त्यांचा स्वभाव किती तापट आहे तो. जरा गांजणूक सुरू झाली कीं, आपोआप वेडे बनतील.

**लालोदिन**–सुंदर स्त्रिया मोठ्या युक्तिवान असतात खऱ्या; बरं पुढें ?

**ललिताबाई**–मग असल्या वेड्याला कोण अधिकार देईल ?

**ललिताबाई**–तर मी बाबांचे कान एव्हांपासूनच फुंकून ठेवतों ह्मणजे बरं; मग मी उद्याच दिल्लीस जातों झालं.

**ललिताबाई**–हा बाई ! एव्हांच. मग मला येथें प्रेमाचें माणूस कोण बरं आहे?

**लालोदिन**–एवढं कांहीं वाईट नको वाटायाला. शिकारीच्या निमित्तानं मी दर आठ पंधरा दिवसांनीं इथें ठेवलेला.

**ललिताबाई**–खचितना पण !

**लालोदिन**–खचित येईन. तर आतां एकदां गोड हास पाहूं.

**ललिताबाई**–इश्श हें कसलं कौतुक; (त्याच्या गळ्यांत मिठी मारते;) (पडद्यांत आवाज ऐकूं येतो) हा मेल्यांनो कोणी आलं वाटतं. दारावरं कोण थाप मारतय्. (ऐकते.)

**लालोदिन**–कोणी नाहींग उगीच वाऱ्यानं दार हाललं असेल झालं.

**ललिताबाई**–छे आलंच कुणी. ती मंजुळा हाक

मारते पहा. उठा उठा. जरा त्या आरशाआड व्हा.

**लालोद्दिन**–मी नाहीं बुवा इथून हालणार. कोणी ब्रह्मदेव आला तरी मला काय भीति आहे.

**ललिताबाई**–असं काय बरं. माझ्या भयाकरितां एवढं नाहीं कां करायचं? उठा, क्षणभर आड झालंच पाहिजे.

**लालोद्दिन**–तें कांहीं नाहीं व्हायचं. कोण येईल तें येवो, त्याची गर्दनच उडिवतों ह्मणजे झालं कां नाहीं.

**ललिताबाई**–असं वेडंवेडं करून माझी फजिती कां करायची? व्हा जरा आड; मी आपल्या पाया पडतें.

**लालोद्दिन**–कांहीं केलस तरी मी कांहीं लपायचा नाहीं.

**ललिताबाई**–आतां काय करावं बाई, ह्या हट्टाला! कोण दार ठोठावतय तें मेलं बोलतही नाहीं. (मंजुळा येते.)

**मंजुळा**–आटपा आटपा बाईसाहेब महाराज येताहेत. मी दार उघडतें. (दाराकडे जाते.)

**ललिताबाई**–अग ए मेले थांब थांब जरा. आतां काय करावं. उठा हो लालासाहेब उठा!

**मंजुळा**–(दार उघडून) हें पहा बाईसाहेब दार उघडलं. महाराज गेले वाटतं; चालूं द्या आतां तुमचंच राज्य.

**ललिताबाई**–मंजुळे बरीच आहेस कींग? चावट नाहीं तर. कोण मी घाबरलें ती!

**मंजुळा**–मी आपली सहज नव्या नोडप्याची जरा

मौज केली, त्यांत चावटपणा तो काय झाला.

**लालोदिन**—पण मी तर नाहीं घाबरलों, असो, एकंदरींत मंजुळा गमती खरी.

**ललिताबाई**—गमती असेल तर काय झालं ! आपल्याला मजा पाह्यला सांपडली ह्मणजे मग लोकांची काय थोडीच काळजी आहे.

**मंजुळा**—बरं मी आतां बाहेरच्या माडींत बसतें पहारा करीत ह्मणजे झालं कीं नाहीं. (जाते).

**लालोदिन**—बरं आतां एकदां निर्भयपणें गाढ आलिंगन देऊन आम्हाला गार करा.

( पडदा पडतो. )

**प्रवेश आठवा**—महाराजांचा दिवाणखाना.

[ महाराज आणि मत्सरसिंग प्रवेश करतात. ]

**महाराज**—कायरे पण त्यांना राग आला आहे असं तूं ह्मणतोस तरी कशावरून ? त्यांना रुसण्याला मला तर कांहीं कारण दिसत नाहीं, बुवा. माझ्या हातून कांहीं चूक झाल्याचें मला स्मरत देखील नाहीं.

**मत्सरसिंग**—मला तरी काय ठाऊक. त्यांचीच कुळंबीण ती मंजुळी मला म्हणाली ह्मणून मीं सहज विचारलें.

**महाराज**—पण ती काय ह्मणाली, तें तर सांगशील कीं नाहीं.

**मत्सरसिंग**—म्हणाली, महाराज आल्यापासून आमच्या बाईसाहेबांना एकदां देखील भेटले नाहींत तेव्हां त्या रागावल्या आहेत.

**महाराज**–असं कां ?

**मत्सरसिंग**–पुढें मीं तिला म्हटलं, सहज नसतील आले, तों म्हणते काय, थोरल्या आईसाहेबांना मात्र बरे दोन तीनदां भेटले.

**महाराज**–एवढंच, कां आणखी कांहीं बोलली ?

**मत्सरसिंग**–आतां ह्मणाली महाराजांची भेट ध्याय ची नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला आहे.

**महाराज**–एवढंच कां कारण राग यायला पुरलं ? हात् तिच्या. मी एकदां सोडून दहादा भेटलों असतों. पण मला कुणी सांगितलं कीं, त्या बागेंत राह्यला गेल्या आहेत त्या अजून परत आल्या नाहींत ह्मणून मीं मग ज्यास्त चौकशी केली नाहीं.

**मत्सरसिंग**–पण मी ह्मणतों दोन दिवस नाहीं भेट झाली ह्मणून काय झालं. त्यांत एवढा अपमान तो कसला झाला.

**महाराज**–नाहीं नाहीं. तसं मात्र समजूं नकोस. त्या वाड्यांत असून मी जर त्यांना भेटलों नाहीं तर ती माझी चूकच झाली खरी. तेव्हां त्यांना अपमान झाला असं वाटणं अगदीं स्वभाविक आहे. मला काय त्या आणि थोरल्या आईसाहेब दोघी सारख्याच. दोघी वंद्यच.

**मत्सरसिंग**–खरोखर महाराज आपली उभयतां मातोश्री संबंधानें भक्ति आणि त्या उभयतांचं आपल्यावर वात्सल्य हीं पाहून कोणासही कौतुकच वाटेल. ह्याचं नांव मातापुत्र ! नाहीं तर सख्खीं मायलेंक असतात पण कधीं सुखासमाधानानं नांदतील तर शपथ.

मग दत्तक असल्यावर तर कांहीं विचारायलाच नको. आधीं मोठ्या कौतुकानं दत्तक घ्यायचा अन् नंतर आपल्याच हातांनीं घरांत कलहाचें बीज पेरण्यास तयार. तोंडावर स्तुति करावी ह्मणून नव्हें, पण एकंदरींत आपल्यासारखे दत्तक फार विरळा. बरं तर आपण एकदां आईसाहेबांना भेटून आपलं मन निर्मळ करून टाकावं हेंच बरं.

**महाराज**–माझा दिखील तसाच विचार आहे. तूंच तर मग त्यांच्याकडे जा आणि त्यांना म्हण कीं झाली चुकी ती झाली, आतां त्याबद्दल क्षमा करा, अन् महाराजांना भेटण्याची कृपा करा. (जातात.)

**मत्सरसिंग**–ठीक आहे. आधीं मी तेंच काम करतों. ( आपल्याशीं ) वहावा बरीच मजा उडाली. आतां त्या बाईला भेटण्याचा आयताच प्रसंग आला. एकदां कां त्यांच्या मनावर आमच्या मनाची छाया पडली कीं, बहुतेक कार्यभाग उरकलाच म्हणून समजावं. राहिलेला बाकीचा भाग साधण्याकरितां आपल्याजवळ एक मंत्र आहेच. झालेल्या अपमानाबद्दल सूड उगवलाच पाहिजे. हा मंत्र त्यांच्या मनावर चांगला बिंबवला म्हणजे झालं. नाहीं तरी सुखाकरितां झटणें हें प्रत्येक प्राण्याचें मुख्य कर्तव्य समजलें पाहिजे. आणि प्रत्येकाचें सुखदुःख भिन्न असल्यामुळें तें प्राप्त करून घेण्याचे मार्गही अर्थात भिन्नच असणार. अमुक एक गोष्ट बरी, आणि अमुक एक गोष्ट वाईट असं कांहीं कोणी एकाद्या नियमानं आजपर्यंत

ठरवलय् काय? अन् पुढें तरी ठरवील असा कोण गाढव आहे! तर सृष्टीमध्यें ज्याप्रमाणें प्रत्येक वस्तूला कांहींएक वाढ असते तद्वतच बरें काय आणि वाईट काय ह्या गोष्टीच्या कल्पनेला ही एक प्रकारची वाढ आहे. आणि म्हणूनच प्रत्येक मनुष्याच्या सदसज्ञतेंत अंतर हें असलेंच पाहिजे. आम्ही आपल्या सदसज्ञारूपी उपवनांत जशा इच्छातरूंचें बीजारोपण करूं तशीं त्याला फळें आलीं पाहिजेत हेंच आमच्या वर्तनक्रमाचें आदि तत्व. समाजबंधनांची हितप्रद व्यवस्था करण्याकरितां नीतिवेत्ते वाटेल तों आचारतत्वें ठरवून घमेंड मारोत. परंतु व्यवहारांत ज्या नीतीचा उपयोग होतो तिच्यापुढें ह्यांची तात्विक नीति काय टिकाव धरणार? कोणचेंही कृत्य घ्या त्यांत परोपकाराचा वाटेल तेवढा आव असला तरी अपलपोटेपणा हा कधीं कोणास चुकला नाहीं. स्वार्थासाठीं जेथें अनेक कपटें घडत नाहींत असें एक तरी राज्य सांपडेल काय? आपलें कार्य साधून घेण्याकरितां जेथें सत्तेचा उपयोग होत नाहीं असें प्रभुत्व विरळा. स्वहिताकरितां आपल्या शक्तीची मनमानेल तशी योजना ज्याला करितां येणार नाहीं त्या मुत्सद्याला राज्यकार्य धुरंधर कोण म्हणेल! तेव्हां चल, मना, चल. तुझ्या ठायीं मी अशा प्रकारच्याच विचारांची लागवड केली आहे; तर माझे हेतू सिद्धीस नेण्यास तयार हो. (जातो.)

## अंक पहिला समाप्त

# अंक दुसरा.

**प्रवेश पहिला**—राजवाड्याच्या पिछाडीचा भाग.

[दोन गृहस्थ प्रवेश करितात.]

**पहिला**—नमस्कार.

**दुसरा**—नमस्कार. कसें काय?

**पहिला**—ठीक आहे. कांहीं नवल विशेष?

**दुसरा**—अहो नवल विशेष तुम्हास माहीत. तुमच्या प्रमाणें समजण्याचीं आम्हांस कांहीं साधनें कां आहेत.

**पहिला**—असें कां म्हणतां? ज्याला खरोखर हौस आहे त्याला साधनें कांहीं शोधण्यास जायला नको.

**दुसरा**—बरं तें कांहीं असो. तुमची कांहीं राजकीय बातमी मांगाल कीं नाहीं. अशा गोष्टींत तुमचें जरा लक्ष असतें म्हणून विचारतों हो.

**पहिला**—बातमी कांहीं मोठी विशेष नाहीं. महाराज आतां राज्यकारभार पहाण्यास योग्य झाले आहेत म्हणून त्यांना गादीवर बसविण्याची परवानगी बादशहांकडे मागितली आहे अशी गुणगुण पसरली आहे.

**दुसरा**—असें काय! खरोखरच शिक्षणक्रम आटपून ते आतां राज्याभिषेकाच्या योग्यच झाले आहेत. असा सुशिक्षित राजकुमार सिंहासनारूढ झाल्यावर मग प्रजेचें सौख्य अगदीं विचारायलाच नको. लोकांना विद्येची अभिरुचि लागेल आणि सदैव त्यांचें कल्याणच होईल.

**पहिला**—अहो, पण ह्या सर्व गोष्टी परवानगी मि-

ळेल तेव्हांना! कां उगीच आम्ही मनांत मांडे खातां.

**दुसरा**—परवानगी तर मिळालीच पाहिजे. बादशहा कांहीं योग्य विचार करील कां उगीच आपला मनास वाटेल तसा वागेल. लोकांची कांहीं दहशत आहे कीं नाहीं.

**पहिला**—एकंदरीत तुम्हाला त्यांच्या राज्यकारभाराची शैली कळली नाहींसें दिसतें.

**दुसरा**—ह्मणजे! याच्यांत शैली ती काय कळायची.

**पहिला**—अहो, एकानें एक पक्ष स्वीकारावा; दुसऱ्यानें दुसरा स्वीकारावा. एकानें अनुकूळ अभिप्राय द्यावा; दुसऱ्यानें त्याविपर्यीच प्रतिकूळ व्हावें. अशानें एक लोकप्रिय होतो, दुसरा लोकांचा द्वेषी ठरतो. तुम्हाला माहीत नाहीं कां? थोरले महाराज एवढे विद्वान, अनुभव संपन्न झाले; राज्यकारभाराचें ज्ञान त्यांनीं संपादन केलें, पण शेवटीं त्यांचा काय परिणाम झाला बरें! अन् त्याचें कारणही पण काय होतें.

**दुसरा**—हां आतां समजलों. कांहीं तरी करून घशांत टाकायचा हेतु ह्मणतां?

**पहिला**—अहो, उघडच आहे. एवढें मोठें संस्थान हातीं लागण्याचा संभव दिसल्यावर बादशहा तें गडप करायला सोडतील काय? ते नानातऱ्हेच्या सबबी पुढें आणतील, भानगडी उपस्थित करतील, अन् लोकांना मात्र गोड गोड थापा देतील.

**दुसरा**—परंतु लोकांचें तर खटपट करण्याचें काम आहे कीं नाहीं. त्यांनीं आपलें गाऱ्हाणें सरकारच्या कानावर घालावें.

**पहिला**—हा तुम्हाला व्यर्थ भ्रम आहे. लोक काय करणार? सरड्याची धांव कुंपणापर्यंत. जरा ओरड करतील तों धमकी मिळेल, अन् गप्प बसावें लागेल. तें कांहीं नाहीं बाबा. कळी तो कान पिळी; हाच कायदा सर्वत्र अनुभवास येतो.

**दुसरा**—तें काय असेल तें असो. पण ह्या कामांत सरकारची परवानगी खास मिळणार असा आपला तर बुवा तर्क चालतो. महाराज लवकर राज्यपदारूढ व्हावे अशी लोकांची किती तरी उत्सुकता आहे पण!

**पहिला**—ठीकच आहे; कां नाहीं असणार. स्वराज्य असावें असें कोणास नाहीं वाटणार? देव करो न् एकदां सर्वांचे मनोरथ पूर्ण होवोत ह्मणजे झालं.

**दुसरा**—कायहो, पण धाकट्या आईसाहेबांना ही गोष्ट पसंत नाहीं म्हणतात त्यांत कांहीं तथ्य आहे कां?

**पहिला**—दत्तविधान तरी त्यांना कोठें सम्मत होतं. बरोबरच आहे. सवतीमत्सर हा स्त्रियांच्या मनांत सदा अग्नीप्रमाणं धुमसत असणारच. मग त्या चांगल्या स्वभावाच्या किंवा वाईट स्वभावाच्या असोत, गरीब असोत कां श्रीमन्त असोत.

**दुसरा**—असो, आपल्याला गृहसंबंधीं भानगडींत मन घालून कर्तव्य काय?

**पहिला**—बरं तर चला आतां; बराच वेळ आपण बोलत इथें उभे आहों. हे पहा इकडे महाराजच येताहेत वाटतं. (जातात.)

## प्रवेश दुसरा—तोच.

[ सज्जनसिंगासह महाराज प्रवेश करतात. ]

**महाराज**—ये इथेंच क्षणभर बसूं. ह्मणजे माझें मन जरा रमेल तरी. आतांशा अशी कांहीं स्थिति झाली आहे कीं, कोणत्याही विषयांत चित्ताला आनंदच वाटत नाहीं.

**सज्जनसिंग**—महाराज, असं कां बरं व्हावं. प्रस्तुत आपल्या आयुष्यांतील काळ तर विशेष रमणीय आहे, तथापि आनंद नाहीं ह्मणतां तेव्हां त्याचं कारण सांगण्यासारखं असल्यास सांगावं.

**महाराज**—अरे तुला माहीत नाहीं कां कीं, माझ्या स्वाधीन अधिकार करण्याविषयीं वकील साहेबांची बादशहाच्या दरबारांत खटपट चालूं आहे ती ?

**सज्जनसिंग**—हो. ही गोष्ट तर मला ठाऊक आहे अन् लोकांतही पण अशी वदंता दाट पसरली आहे कीं, राज्याभिषेक आतां लवकरच होणार.

**महाराज**—वदन्ता असेल तशी. परंतु अजून ह्या गोष्टीचा कांहींच निकाल नाहीं. तेव्हां तो अनुकूळ होतो कां प्रतिकूळ होतो ह्याविषयीं मनाला मोठी उत्कंठा आहे. खरं जर विचारशील तर माझी स्थिति अशी झाली आहे कीं, जशी एकादी स्त्री गर्भार असली ह्मणजे तिला प्रसूत होण्यापूर्वीं मुलगा होईल कां मुलगी होईल असा रात्रंदिवस ध्यास लागलेला असतो त्याप्रमाणं माझी आशा सफळ होऊन हें भाग्यहीन राजकुळ उदयाला येईल किंवा आशा निष्फळ होऊन

माझ्या हातून कांहीं देखील होणार नाहीं अशा चिंतेनें मन सदोदित व्याकुळ असतें. माझी चिंता जाणणारी एक माझी प्रिया किंवा दुसरी रात्र. इतरांना काय त्याचा अनुभव. एकंदरींत हा अनिश्चयाचा काळ मोठा त्रासदायक न् कंटाळवाणा असतो खरा.

**सज्जनसिंग**—असं कां बरं ह्मणतां. मला तर वाटतं कीं, कार्यसिद्धीचे पूर्वींचे दिवस मोठे सुखदायक असतात. कारण सिद्धि पूर्वीं आपण आपल्या मनोरथानुकूळ सर्व गोष्टी जुळवीत असतों. पण शेवटीं त्या ईश्वरी नियमाप्रमाणेंच घडून येतात.

**महाराज**—कधीं कधीं तूं ह्मणतोस असं खरं ठरेल. एखाद्या वेळीं माझ्या देखील मनांत नानाविध कल्पनांचे तरंग उठतात; नंतर मी हें करीन मी तें करीन अशा मनोरथांत मी गुंग होतों, आणि मनोराज्यरूपी सागरांत पोहूं लागतों. पण ह्या सर्व क्रिया चित्ताची क्षणभर करमणूक करायच्या मात्र उपयोगी.

**सज्जनसिंग**—महाराज आपण कांहीं एक काळजी करूं नका; आपले मनोरथ खचीत लवकर पूर्ण होतील अन् आह्मांला अभिषेकसमयमहोत्सव पहाण्याचा प्रसंग थोडकेच दिवसांत येईल अशी माझी मनोदेवता साक्ष देते.

**महाराज**—अशी वेळ एकदांची येवो एवढीच देवाला माझी विनवणी आहे. पण सृष्टिनियम असा दिसतो कीं, कोणतीही गोष्ट सर्व बाजूंनीं सुखमय होईल अशी आशा करणें व्यर्थ होतें. माझी प्रस्तुत स्थितिही पण अशी कांहीं आहे कीं, माझी काळजी

वाहण्याला दोघी मातोश्री सदा तत्पर आणि दोघींना माझ्याविषयीं कळकळ; श्रमविनोदार्थ मनोरंजन करण्यास प्रियादक्ष; केवळ विश्वासस्थान असे माझे तुह्मी दोघे प्रियमित्र; लक्ष्मीचे उपभोग यथेष्ट; तेव्हां अशा समयीं अभिषेक झाला ह्मणजे सर्व सौख्याचा कळसच झाला ह्मणायचा. तर असा आनंदपरमावधि क्वचितच होतो आणि ह्मणूनच माझें मन शंकाकुळ होतें बरं.

**सज्जनसिंग**—कांहीं जरी नियम असला तरी मला वाटतें कीं, आतां विघ्नें येण्याला द्वारच खुलें नाहीं. आपण आतां वयानें, विद्येनें, अनुभवानें, एकंदरींत सर्व प्रकारें योग्य झालां असतां अधिकार मिळणार नाहीं असें संभवेल तरी कसें ! आणि त्यांतून हल्लींच्या दयाळू बादशहाच्या राज्यांत तर असें स्वप्नीं देखील आणण्याची गरज नाहीं.

**महाराज**—विवेक दृष्टीनं पाह्यलं ह्मणजे तूं ह्मणतोस हें कांहीं खोटं नव्हे, पण लालासाहेबाशीं नळदुर्गास आपलं सख्य नव्हतं ह्या गोष्टीची आठवण झाली कीं निराशा आपला अंमल बसवते.

**सज्जनसिंग**—पिरोजशहा बादशहा विचारी आहेत, ते अशा उनाड बाळाच्या नादानं वागतील कीं काय !

**महाराज**—असो. तें कांहीं होवो. सज्जन, आज माझ्या मनाची चांगलीच करमणूक केलीस. समवयस्क, सुजाण, चतुर आणि निष्काम मित्र असले ह्मणजे त्यांच्या भाषणापासून असाच आल्हाद होतो न् जीवाला समाधान वाटतें.

**सज्जनसिंग**–असे मित्र फार विरळा.

**महाराज**–देवाच्या दयेनं तूं तसाच आहेस हें केवढं माझं भाग्य! तुला नुसता गळ्यांतला ताईत करावा. (जातात.)

**प्रवेश तिसरा**–ललिताबाईचा महाल.

[ललिताबाई आणि मत्सरसिंग प्रवेश करतात.]

**ललिताबाई**–पण क्षमा काय न् अपराध तो कसला?

**मत्सरसिंग**–आल्यापासून आपल्याला एकदां देखील भेटले नाहींत तर हा आपला अपमान झाला त्याबद्दल त्यांनीं क्षमा मागणें हें वाजवी नाहीं काय? वास्तविक ह्मटलं ह्मणजे पश्चात्ताप होऊन त्यांनीं आपली कृपा संपादण्याची खटपट केव्हांच करायला पाहिजे होती..

**ललिताबाई**–पण माझी कृपा त्यांच्यावर नसेल तर मग खटपट कीं नाहीं.

**मत्सरसिंग**–परंतु आपल्याला ज्या अर्थी राग आलाच त्या अर्थी आतां पूर्ववत् मन कसं शुद्ध राहूं शकेल?

**ललिताबाई**–राग आला असला तर किनै. राग आला नसेल तर?'

**मत्सरसिंग**–नाहीं अपमानच जर झाला तर राग येणं हें अगदीं साहजिक आहे. त्यांत आपला दोष आहे असं कोण ह्मणेल.

**ललिताबाई**–पण मला त्यांत अपमान झाला असं मुळींच वाटत नाहीं.

**मत्सरसिंग**—कां वाटूं नये. वाटलाच पाहिजे. ते जर आपलं कर्तव्यच बजावण्यास चुकले,तर हा त्यांचा अपराध नव्हे कां. आपल्याला ते प्रत्यक्ष चिरंजिवासारखे अन् त्यांना आपण प्रत्यक्ष मातोश्रीच्या ठिकाणीं ना?

**ललिताबाई**—होय. आणि ह्मणूनच त्यांनीं माझा अपमान केला तरी क्षमा मागण्याची गरज नाहीं. माय आणि लेंक ह्यांच्या नात्याप्रमाणं जिथें ममतामय संबंध आहे ; जिथें हेतूंचा अभाव आहे ; जेथें कृत्रिम मनोवृत्तींचं वारं दिखील नाहीं; जिथें केवळ निष्काम, शुद्ध अशा प्रेमाचा झरा वहात आहे ; तेथें कर्तव्याची उग्रता रहात नाहीं. तेव्हां समजलास, मत्सरसिंग, जरीं त्यांनीं आपलं कर्तव्य करण्याकडे दुर्लक्ष केलं तरी क्षमा ती कशाला मागायला पाहिजे.

**मत्सरसिंग**—( आपल्याशीं ) अहाहा ईश्वरा ! ह्या जगांत स्त्रियांना जर मायेनं आणि प्रेमानं अंधळं केलं नसतं तर पुरुषांच्या हृदयाला दिलेला चकाकणारा मुलामा पाहूनच ह्या भुलून वेड्या झाल्या नसत्या ; ह्यांच्या मनाचा भ्रम दूर झाला असतां ; ह्यांच्या चंचलदृष्टीवरील मोहरूपी अंधःकारपटलाचा नाश झाला असतां ; ह्यांच्या हृदयांत मानवी सृष्टिज्ञानाचा प्रकाश खेळूं लागला असतां; वादळाच्या भयंकर सोसाट्याच्या ठिकाणीं पुष्पपरिमलानं मधुर असा मृदु वायु ह्यांना भासमान होताना; क्षुब्ध झालेल्या अगाध जलनिधीच्या ठायीं ह्यांना रमणीय वनभुमि दिसतांना; नरकाच्या ठिकाणीं ह्यांना स्वर्गाचें सौख्य होतेना !!

ललिताबाई—अरे, तूं ही कसली पोथी वाचण्यास सुरुवात केली आहेस ? मला तर त्यांत कांहीं धड समजेना न् उमजेना.

मत्सरसिंग—हे स्त्रियांच्या स्थितीविषयीं उद्गार काढल्यावांचून माझ्यानं रहावेना त्याला मी काय करूं ! खरोखर प्रेम फार वेडं आहे.

ललिताबाई—म्हणजे ह्या उद्गारांचा आपल्या बोलण्याशीं संबंध काय ?

मत्सरसिंग—संबंध कां नाहीं ? संबंध असल्याशिवाय मी उगीच बरा बोलेन.

ललिताबाई—काय संबंध आहे तो सांग पाहूं.

मत्सरसिंग—हें पहा आईसाहेब, माझ्या बोलण्याचा भाव मिळून इतकाच कीं, आपल्या हृदयाची निर्मळ शुद्धता पाहून एखादा कौतुक करील तितकं थोडंच. पण हीच शुद्धता दुसऱ्याचं हृदय ओळण्याच्या कामीं कुपथ्याप्रमाणें आहे असें पाहून मात्र त्याला दिलगिरी वाटेल. समजलं कां आतां माझ्या म्हणण्याचं इंगित ?

ललिताबाई—हें तुझं बोलणं समजलें. त्यांत काय आहे. पण दुसऱ्याचं मन तें काय ओळखायचनं शुद्धता कुपथ्य काय तें नाहीं बाई मला कांहीं समजत. तूं आपला उघड सांग कसा, काय तें.

मत्सरसिंग—म्हणजे तुमचं. प्रेम महाराजांवर जसं निष्कपट आहे तसं त्यांचं आपल्यावर आहे कीं नाहीं, हें जाणण्याला माया नाहीं कां आडवी येत ?

ललिताबाई—तुझं तर आपलं सारं उलटचं बोलणं!

मत्सरसिंग—उलटं कसं असेल आईसाहेब ?

ललिताबाई—अरे असं बघ कीं, आपण जर दुसऱ्यावर खरी खरी माया करतों तर दुसरा आपल्यावर माया करीलच करील. माझं मन जर महाराजांविषयीं शुद्ध आहे तर त्यांचंही माझ्याविषयीं तसं असलंच पाहिजे. असं नाहीं कां ?

मत्सरसिंग—तें मी काय सांगूं. आपणच आपलं पहा काय असेल तें.

ललिताबाई—म्हणजे त्यांचा स्वभाव कपटी आहे असं तुला वाटतं कीं काय ;

मत्सरसिंग—तें मी काय सांगूं. तें ज्याचं त्यांनींच पहावं. एकंदरींत म्हटलं म्हणजे त्यांचा स्वभाव चांगलाच आहे. ते मनमिळाऊ, दयाळू आहेत. स्नेहाला योग्य; पण आलीकडेच असं काय झालय् कुणास ठाऊक. (आपल्याशीं) ज्या पुत्रावर येवढी निरपेक्ष ममता तो पुत्र कसा पाहिजे ! देवा जिथें तिथें तुझी करणी अशी विपरीत कां बरं असावी ? "विधेर्विचित्राणि विचेष्टितानि" असं म्हणात तें कांहीं खोटं नव्हे.

ललिताबाई—तर मग तुझ्या म्हणण्याप्रमाणें कसा पुत्र असावा ?

मत्सरसिंग—तें मी काय सांगूं. तें ज्याचं त्यांनीं पाह्यलं पाहिजे.

ललिताबाई—पुरे मेलं असलं तुझं हें संदिग्ध बोलणं. सारा वेळ आपलं. "मी काय सांगूं मी काय

सांगू" चालवलं आहेस. ( मंजुळा प्रवेश करते. )

**मंजुळा**–दैव परीक्षा, भाग्य परीक्षा. चांगले ग्रह, वाईट ग्रह. रेषा दाखवा. भाग्य फळफळून घ्या. ( असे आरडत फिरते. )

**ललिताबाई**–आली मेली कांहीं तरी बडबडत. ए मंजुळे !

**मंजुळा**–बाईसाहेब, दैव परीक्षा, भाग्य परीक्षा, चांगले ग्रह, वाईट ग्रह, रेषा दाखवा, दैव फळफळेल.

**ललिताबाई**–अग मेले ए अवदसे, हें काय बडबडते आहेस ?

**मंजुळा**–मला जोशी बुवांनीं अशी दवंडी पिटायला सांगितलंय्, हें कांहीं माझ्या पदरचं बरळणं नव्हें.

**ललिताबाई**–असे कोण ते जोशीबुवा ?

**मंजुला**–ते महाराजांकडून आले आहेत ते बाहेर उभे आहेत.

**ललिताबाई**–मग ?

**मंजुळा**–ते आंत यायला परवानगी मागताहेत.

**ललिताबाई**–अग येऊं दे तर त्यांना. (जोशी मंजुळे मागून येतो. मुजरा करून बाजूस उभा रहातो.) ( जोशीबोवास ) बसा. असे इथें बसा. उभे कां ? ( बसतो ) कुठले तुम्ही जोशी ?

**जोशी**–मी काशीहून आलों आहें.

**ललिताबाई**–तुम्हीं रहाणार तिथलेच कां ?

**जोशी**–होय. मी नेहमीं काशीसच असतों.

**ललिताबाई**–तुमचं नांव काय ?

**जोशी**—मला विष्णुजोशी म्हणतात. मी देशस्थ ब्राम्हण आहे.

**ललिताबाई**—तुमचं आडनांवही जोशीच तर मग.

**जोशी**—नाहीं, माझं उपनांव विश्वरूप. पण माझा धंदा पडला जोशाचा तेव्हां मला म्हणतातही विष्णुजोशी झालं.

**ललिताबाई**—इकडे आपण देवीच्या दर्शनाला आला असाल?

**जोशी**—नाहीं, केवळ तेवढाच कांहीं हेतु नाहीं. अंबाबाईचं दर्शन घ्यावं हा हेतु तर खराच. पण आपलाही नांवलौकिक आमच्या प्रांतांत फार आहे तेव्हां म्हटलं आपल्या चरणाचंही दर्शन होईल म्हणून आलों झालं.

**ललिताबाई**—आमचं दर्शन घेऊन तुम्हांला काय पुण्य लागणार?

**जोशी**—( मान चोळीत ) हं. पुण्य कां नाहीं. राजदर्शन हें पुण्यकारकच आहे.

**ललिताबाई**—पण आह्मी कोठें आहों राजे. राजे तर निराळेच आहेत.

**जोशी**—आह्माला आईसाहेब आपण राजाच्याच ठिकाणीं आहां.

**मत्सरसिंग**—खरी गोष्ट सांगितलीत जोशीबुवा.

**ललिताबाई**—यजमानांना भेटलेत कां?

**जोशी**—हो भेटलों महाराजांकडूनच हा आतां आपल्या दर्शनाला आलों.

**ललिताबाई**—काय पाहतां तुह्मी. हात कां पत्रिका

पहाता, कां नुसते प्रश्नच सांगता ?

**जोशी**–मी सामुद्रिक पहातों आईसाहेब.

**ललिताबाई**–पहा तर माझा हात पाहूं. (हात पुढें करते.) काय तुह्माला सांगण्यासारखं वाटेल तें सांगा. पण पहिल्यानं आयुष्य किती आहे तें तर ऐकूं द्या.

**जोशी**–( हात पहातो. ) आपली आयुर्मर्यादा तर फार लांब आहे आईसाहेब. ही इथून इतकी आयुष्याचीच रेषा सारखी आहे. ऐशीं वर्षें आपल्याला आयुष्य आहे. शिवाय मधें दुखणंबाणं कांहींएक नाहीं.

**ललिताबाई**–हा बाई ! इतकीं कां मी जगणार. देवा ! नकोरे मला इतके दिवस वांचवूं. ह्यातारपणीं माझे हाल कुणी कुत्रं दिखील खायचं नाहीं. बरें. पुढें काय काय आणखी ?

**मत्सरसिंग**–असं अशुभ कां बोलावं पण. आपल्याला काय कमी पडेल. आपल्या तोंडून शब्द निघायचा अवकाश कीं,पुढें चाकरमाणसें नाचायाला तयार.

**जोशी**–आपल्या सुखांत जन्मभर कांहीं कमी पडायचं नाहीं. दिवस सदा आनंदांत जातील. प्रकृतीला नेहमीं आरोग्य राहील.

**ललिताबाई**–बरं. पण मला काशीयात्रा होईल कां पहा.

**मत्सरसिंग**–आपल्यालाहो काशीयात्रा नव्हायला काय झालंय्.

**ललिताबाई**–अरे बहुधां वासना होत नाहीं ह्मणून विचारतें.

**जोशी**—आपल्याला आईसाहेब एकदां सोडून तीनदां काशीयात्रा होईल.

**ललिताबाई**—काशीयात्रा होणार तर. बरं आणखी काय आहे?

**जोशी**—आपल्याला राजमातेची पदवी प्राप्त होईल. (तिच्याकडे पहातो).

**ललिताबाई**—ह्मणजे! ह्यांत तुह्मी ते अधिक काय सांगितलंत? हें सगळ्यांना समजतच आहे.

**जोशी**—प्रस्तुत आपण राजमाताच आहां हें मी समजतों.

**ललिताबाई**—मग तुमचं दुसरं काय ह्मणणं आहे तर?

**जोशी**—माझ्या ह्मणण्याचा भाव असा कीं, आपल्या मांडीवर बसलेला मुलगा राजा होईल.

**ललिताबाई**—हा मेल्यांनो! ह्मणजे महाराज नाहीं कां गादीवर बसणार?

**जोशी**—त्यांना राजपद नाहीं असं त्यांच्याही हातावरून दिसतं खरं. मग काय असेल तें असो! मला जो प्रकार कळला तो मी आपल्याला निवेदन केला. आणखी कांहीं विचाराचय्?

**ललिताबाई**—छे, मला नाहीं बाई अधिक कांहीं विचारायचं. पण विचित्रच कांहीं तरी तुचचं भाकित! असं जोशी बुवा होईल तरी कसं?

**जोशी**-तें आपलं आपण पहावं. मला जें दिसलं तें मी कळीवलं.

**ललिताबाई**—तर मग आतां दुसरा एक प्रश्न विचारतें आं.

**जोशी**–विचारावा.

**ललिताबाई**–मजवर महाराजांची माया आहे कीं नाहीं सांगा पाहूं.

**जोशी**–असले प्रश्न आईसाहेब न विचारले तर बरें, कारण असं कीं आह्मी पाह्यलं अन् विपरीतच कांहीं दिसलं ह्मणजे मनाला मात्र रिकामी हुरहुर झालं.

**ललिताबाई**–पण तुमचं काय त्यांत खर्च होतय? लागूद्या आपली माझ्या मनाला हुरहुर.

**जोशी**–ठीक आहे. मी सांगतों; माझं काय जातं. ( हात पुनः पहातो ) आपल्यावर त्यांची माया बातावेताचीच आहे ह्मटलं तरी चालेल. महाराजांपासून आपल्याला फारच थोडं सौख्य आहे.

**ललिताबाई**–( बाजूस ) एकंदरींत मी भाविष्य केलं तें कांहीं खोटं नव्हे, आणि जोशी बुवा ही पण तसंच सांगताहेत. ( उघड ) मत्सरासिंग तुला दाखवायचा आहे कां आपला हात? दैव पाहण्याची हौस असेल तर ती एकदां फेडून घे.

**मत्सरसिंग**–हो हो आपलं काय गेलं हात दाखवायला. पाहूं द्या तर खरं, काय काय आमच्या कपाळीं आहे तें एकदां. ( हात पुढें करतो. )

**जोशी**–( हात पाहून ) वाहावारे वाहावा! ह्यांचा हात तर फार नामी आहे. हे अत्यंत भाग्यशाली दिसतात. पण संभव तर कांहीं दिसत नाहीं बुवा.

**ललिताबाई**–ह्मणजे आहे तरी काय एवढं?

**जोशी**–हा पाह्यलात कां त्यांचा हात? (हात तिच्या

पुढें करतो ) हें तळहातावर पद्म आहे. फारच सुरेख आहे बरं कां. अगदीं कसं स्पष्ट दिसतयं तें.

**ललिताबाई**–मग पद्म असलं ह्मणून काय झालं ?

**जोशी**–( आरडतो ) तें राजचिन्ह आहेना राज-चिन्ह ! ह्यांच्या कपाळीं राजपद आहे आईसाहेब !!

**ललिताबाई**–कुठलारे बाबा तूं राजा होणार मत्सरसिंग! जोशिबुवांनीं तर तुला आजच राज्य देऊन टाकलं.

**मत्सरसिंग**–तें मी काय सांगूं ? परंतु मी महाराजांच्या पूर्वींच्या संबंधानं त्यांचा नातेवाईक आहें हें मात्र मला माहीत आहे. (आपल्याशीं) प्रभो, कायरे तुझा हा अतर्क्य महिमा ! काय तुझी अगाध लीला ही ! देवा, हा भक्त तुझा फार ऋणि आहे बरं. तूं आपल्या कृपा सागरांत मला अगदीं बुडवून सोडलंस. हा प्रसादातिशय मी आतां सहन तरी कसा करूं ! नारायणा, मला रात्रीं दृष्टान्त दिलास त्याची प्रतीति आणून देऊन मला सहाय्य होण्यास्तव प्रत्यक्ष अवतरलासनां ! ह्या तुझ्या दीन दासाकरतां रूपांतर देखील करण्यास तयार झालास आं ! प्रणतवत्सला, भक्तप्रियकरा, दयानिधे, भगवंता, ह्या सेवकाला आतां एकदां प्रत्यक्ष दर्शन देऊन पावन कर ह्मणजे ह्या संसार-बंधनाची मुळींच गरज नाहीं. माझा कैवारी झालास खरा. (जमिनीवर कपाळ आपटतो. डोळ्यांत अश्रु येतात.)

**ललिताबाई**–राजा होणार असं ऐकून तुला वेड तर नाहींना लागलं मत्सरसिंग ? ही बडबड कसली आरंभलीस !

**मत्सरसिंग**–आपल्याला ती बडबडच वाटेल. आतांच त्याचं मी सांगून काय फायदा. सांगेन केव्हां तरी. जातों मी आतां.

**ललिताबाई**–बैसरे.एकदां सगळं सांगन् जाशील ह्मटलं.

**मत्सरसिंग**–द्यावीच मला एव्हां रजा. आधीं विष्णुमंदिरांत जाऊन एकदां भजन केलं ह्मणजे मला जरा बरं वाटेल. (जातो.)

**जोशी**–काय चमत्कार ! ह्यांच्या मनाची एकदम अशी विलक्षण स्थिति कशी झाली न कळे.

**ललिताबाई**–कुणास ठाऊक काय झालं तें.

**जोशी**–बरं. होईल आतां आज्ञा ?

**ललिताबाई**–(त्याला बक्षिस देते) या बरं. पहातें आतां तुह्मीं भविष्य केल्याप्रमाणं काय काय खरं होतं तें.

**जोशी**–पहावं आईसाहेब. पण ह्या दासाचं मात्र स्मरण असावं एवढीच पायाजवळ विनंती आहे. (मुजरा करून जातो.)

**ललिताबाई**–(आपल्याशीं) जोशीबुवाचं भाकित बहुतकरून खरं ठरेलसं दिसतं. पण मत्सरसिंगाला राज्यपद मिळणार हें कसं बाई म्हणाला कुणास ठाऊक. (जरा विचार करते) हां गडे, तें कदाचित् असं जुळेल कीं दुसरा दत्तक घेण्याची जर वेळ आली तर ह्यालाच पसंत करण्याचा संभव अधिक दिसतो खरा. कारण हा महाराजांचाच कुणी नातेवाईक आहे असं ह्मणतात. असो. आपल्या खटपटीला मात्र आतां दुप्पट जोर आला खरा. (जाते.)

## प्रवेश चवथा—महाराजांच्या दिवाणखान्याच्या बाजूची खोली.

[ लीला प्रवेश करते. ]

**लीला**—( आपल्याशीं ) ह्यांच्या बोलण्याचा रंग तर कांहीं चमत्कारिकच दिसतो. पूर्वी कधीं असं बोलल्याचं मला तर बाई कांहीं आठवत नाहीं. मग मी माहेरीं होतें तेवढ्यांत इतका फेर कशानं बरं पडला असावा? पूर्वीं तर मला किती ममतेनं वागवावं. केवढ्या आदरानं आपल्या जवळ बसवून घ्यावं; अन् बाई किती गोड बोलावं पण. मला मोठी धन्य वाटे कीं, माझं करणं ह्यांना आवडतं. मागच्या पाळीला जेव्हां मी माहेरून आलें, तेव्हांचा खण तर उलटा कमी किमतीचा होता. पण तो त्यांनीं किती मानानं स्वीकारला. ह्या पाळीला तर भीत भीत उंची खण दोघी सासूबाईंना देण्याकरितां आणले. तरी तो धाकट्या सासूबाईंनीं नाकरला. कां बरं असं त्यानीं केलं असेल? जळं आजच तें त्यांचं बोलणं. काय ह्मणे वेडेपीर झाले आहेत ह्मणून. येवढी खप्पा मर्जी व्हायला असं काय यांचं घोड मारलय् कुणास ठाऊक. मागं तर काय प्रेम अन् काय स्तुति करायची ती. असं असून एकाएकीं एवढा बदल होण्याचं कारण तरी काय बरं असेल? काय तीं एकदां बारकाईनं चवकशी तरी केली पाहिजे. ( महाराज प्रवेश करतात. )

**महाराज**—(लीलेकडे पाहून आपल्याशीं) वहावा.

किती आनंदी प्राणी हा! हा प्राणी ईश्वराचा मोठा आवडता दिसतो. ह्याचं करणं सदा ईश्वराला मान्य. नेहमीं आपली प्रसन्न असायची विचारी! दोघी आईसाहेबांची मोठी लाडकी. घरांतील सर्व माणसांना हवी. मोठ्या सत्तेनें वागायची. येथें नव्हती तर घरांत अगदीं ओकं ओकं वाटे. आली मात्र तों घर जसं कांहीं गजबजून गेलं. आज इतके दिवस मजपासून दूर असल्यामुळें, तिचें साधारणच रूप; पण तें किती रमणीय दिसत आहे! हिला पाहिलें ह्मणजे हृदयास जसे आनंदाचे पूर येतात (विचारांत निमग्न राहतात.) (लीला मोठ्या उत्सुकतेनें जवळ येते.)

**लीला**—आज येवढे विचार तरी बाई कसले चालले आहेत. माझ्या बोलण्याकडे जरा लक्ष द्यायचं होईल कां? मला कांहीं विचाराचं आहे.

**महाराज**—आपल्या विषयींच विचार चालले आहेत. आपण ही आपली मनोहर मूर्ति माझ्या मनांत सांठवून ठेवली आहांत, ती तेथून हलेल तेव्हां दुसरे विचार सुचतील ना?

**लीला**—हो! उगीच आपलं एखाद्याला चढवायचं झालं. मी आपली काळी सावळीच आहे हें कां मला समजत नाहीं कीं काय! माझं कुठाय इकडच्या सारखं सुंदर रूप.

**महाराज**—पण आपली येवढी मोहकता मला द्याल काय? (लीलेस जवळ घेऊन) प्रिये हे पहा, हे तुझे डोळे माझे कसे प्राण हरण करतात? एकदां कां मजकडे दृष्टि फेंकलीस कीं मी अगदीं वितळून जातों.

केवढी तरी ह्या डोळ्यांची सत्ता! आणि हे डोळे तुझे जसे कांहीं सेवक. तेव्हां मग तुझं वैभव काय विचारायचंय्.

लीला–पुरे बाई आतां ही स्तुति. अन् ती करायची तरी किती गोड! बरं. पण मीं विचारलं तें नाहींच कां ऐकून घ्यायचं शेवटीं?

महाराज–तुझं ऐकायचं नाहीं ह्मणजे मग देवाच्या आज्ञेचा भंग झाला असंच ह्मटलं पाहिजे.

लीला–तर मग विचारूंच कां आतां!

महाराज–विचार, विचार. मी अगदीं सर्व कांहीं ऐकून घ्यायला आपल्या सेवेंत तत्पर आहे.

लीला–मी माहेरीं गेल्यावर धाकट्या सासूबाईंशीं रीती बाहेर कां कांहीं वागायचं झालं?

महाराज–कां बरं? कांहीं नाहीं.

लीला–मग इकडच्यावर त्यांचा येवढा राग कशानं झालाय्?

महाराज–धाकट्या आई साहेबांचें मजवर नेहेमींप्रमाणेंच तर प्रेम आहे. मला कांहीं त्यांच्या वर्तनांत फरक दिसत नाहीं.

लीला–पण मजजवळ बाई इकडच्या संबंधानं काय काय वेडींवाकडीं बोलणीं झालीं. काय ह्मणे इकडे अगदीं हेकेखोरपणा फार वाढलायन् जसं कांहीं शुद्ध वेडेपणाची अवस्था झाली आहे. माझ्यानं शेवटीं ऐकवेना तशी मग त्यांच्यापासून उठलें आपली कशी. मी आल्यापासून मजवर दिसेल अम्मळ रागच आहे.

महाराज–प्रिये! खरोखर विचारशील तर मल

हें कांहीं एक खरं वाटत नाहीं. त्यांचा तो दयाळू शांत स्वभाव एकदम इतका क्रूर होईल अशी मला कल्पना देखील करवत नाहीं. किती झालं तरी प्रत्यक्ष माझ्या आईसारख्याना त्या मला. समुद्राला कधीं आग लागली आहे कां ?

**लीला**–तर मग मी हें खोटंच कां सांगतें ?

**महाराज**–दुसरं काय तर. तुमचंन् त्यांचं कांहीं तरी भांडण झालं असेल म्हणून तुम्हीं ही इमारत रचली असावी.

**लीला**–( गहिंवरून ) पण अशीं खोटींनाटीं कुभांडं रचण्यांत मला फायदा कां कांहीं आहे ?

**महाराज**–हो. फायदा कां नाहीं. एकदां असे त्यांच्याविषयीं माझे कान फुंकले म्हणजे मग स्वेच्छेनें वाटेल तसं वागायला सांपडेल. हा लहान कां फायदा?

**लीला**–( आपल्याशीं ) देवा ! तर मग अशा लबाड, मतलबी, चाहाडखोर बायकांतच माझी गणनाना! हें प्रेम सारं वेडं आहे. इकडच्याविषयीं माझा जीव तरफडला म्हणूनना माझ्यानं सांगितल्यावांचून रहावेना ! (महाराजांना) असं करण्यांत माझ्या हातून मोठा भयंकर अपराध घडला असं जर वाटत असेल तर मी हात जोडून विनंती करतें, मला एकदा क्षमा करावी. क्षमा करणं नसेल तर वाटेल तें पारिपत्य करावं. सोसण्यास मी तयार आहें. (पाया पडते). ही आपली दासी आहे इच्या जीवाचं स्वामित्व इकडे आहे.

**महाराज**–( मनाशीं ) किती नम्र, किती सुशील,

किती सौम्य, किती आज्ञाधारक बिचारी! खरोखर अशी सरळ मनाची, निष्कपटी, प्रेमळ बायको मिळणं म्हणजे मोठं भाग्यच समजलं पाहिजे. (तिला उठवून) प्रिये पुरे. इतक्या विनवण्या नकोत करायला. पण हें बघ तुला सांगून ठेवतों कीं पुन्हा अशा भानगडींत तूं कधींही पडूं नको. (तिच्या चेहऱ्याकडे पाहून मनाशीं.)

अहाहा! सत्य कसें मूर्तिमंत हिच्या मुद्रेवर उभें आहे; आपल्याला ह्या गोष्टीचा शोध तर केलाच पाहिजे.

लीला–इकडून मला क्षमा झाली एवढ्यानं मोठी मी धन्य मानतें, मी आज्ञे बाहेर कधींही पाऊल टाकणार नाहीं. (जातात.)

**प्रवेश पांचवा.–राजवाड्यांतील मागील चौक.**

[सज्जनसिंग, हातांत पत्र घेऊन प्रवेश करतो.]

**सज्जनसिंग**–(आपल्याशीं) बरं झालं. आज हें पत्र सहज हातांत पडलं. नाहीं तर ह्यांच्या ह्या आंतल्या आंत चाललेल्या खटपटी मला कळण्याचं वास्तवीक कांहींच साधन नव्हतं. खरोखर ह्या स्त्रिया मत्सरानं कुणाचं घर जाळतील याचा कांहीं नेम लागणार नाहीं. कोणीही मोठी दयाळू, सुंदर, सुशील स्त्री जरी असली तरी तिच्या मनांत मत्सर हा आपला मूर्तिमंत उभा आहेच आहे. ते म्हणतात तें कांहीं खोटं नव्हे:—

एकीचें बरवें बघूनि दुजिते वाटे किती खिन्नता।
एकीचा अपकर्ष पाहुनि दुजी मानी मनीं धन्यता॥

हित्रे आणखी काय काय दुष्ट बेत चालले असतील ते ईश्वराला माहीत. हे मत्सरमूर्ति, कमाल झाली तुझी! ह्या कपटनाटकाचं सूत्रधारित्व तूंच पतकरल्यावर इतर पात्रें रंगभूमीवर आपापलीं कामें चोख करतील ह्यांत काय संशय! हे विजयनगर संस्थाना! सुशिक्षित, शहाणा असा स्वामी असणें हें तुझ्या दैवींच लिहिलें नाहीं कारे! हातभाग्य तूं! थोरले महाराजांचा तो तसा शेवट झाला म्हणतात. बरं आतां कुठें हातातोंडीं आलं होतं तोंच हे गृहकलह आणि मत्सर मधें आडवे पडण्यास तयार! असो. आपल्याकडून होईल तितकी खटपट करून हे बेत फसले तर पहावें. ह्याउपर देवाची मर्जी. (जातो.)

**प्रवेश सहावा.**—वाड्यांतील एक खोली.

[ ललिताबाई आणि मत्सरसिंग प्रवेश करतात. ]

**ललिताबाई**—अरे पण दृष्टान्त कसा झाला तें अगोदर सांगशील किनै.

**मत्सरसिंग**—हें पहा त्या दिवशीं असेच विचार माझ्या मनांत घोळत असतां मला झोंप लागली, अन् पहांटच्या सुमारास मला दृष्टान्त झाला. त्या वेळीं—आपल्या इथें त्या दिवशीं जोशीबुवा आले होते कीं नाहीं—हुबेहूब तशी मला मूर्ति दिसली. पुढें पहातों ता ती मूर्ति शांत स्वरानं कांहीं बोलूं लागली!

**ललिताबाई**—खरंच कां बोलूं लागली?

**मत्सरसिंग**—खरंच आईसाहेब.

ललिताबाई–तर बाई मोठा चमत्कार म्हणायचा. बरं पुढें ?

मत्सरसिंग–ती म्हणाली कीं, तूं अगदीं निराश होऊं नकोस. तुझे मनोरथ पूर्ण करण्यास ललिताबाई समर्थ बसल्या आहेत. तूं आपला त्यांचं सहाय्य माग कसा. त्यांच्या मांडीवर दत्तक बसण्यास तूंच योग्य आहेस. येवढाच काय तो दृष्टान्त. पुढें मी जागा झालों. न् पहातों तों मूर्ति अदृश्य झाली !

ललिताबाई–पण अशी मूर्ति जागेपणीं नाहींच दिसावयाची, नाहीं तरी.

मत्सरसिंग–असं कां ! पण माझ्या मनाला एक प्रकारची हुरहूर मात्र लागली. ती इतकी कीं मी आपल्याकडे तावडतोब आलों अन् गोष्ट काढायला सुरवात दिखील केली, पण आपल्याला कांहींच खरं वाटेना. मग मात्र मी फार निराश झालों आणि मोठ्या चिंतेत पडतोंय् तों माझ्या सुदैवानं अवचित् तो जोशी येऊन उभा राहिला. त्याच्या भविष्यकथनावरून पुढें मग आपला माझ्या सांगण्यावर आपोआप विश्वास बसला.

ललिताबाई–तेव्हां प्रत्यक्ष देवच आपला सहाय्यकारी होणार असं ह्मणायचं.

मत्सरसिंग–यांत काय संशय आहे ! मला तर खचित असं वाटतं; आणि ह्मणूनच त्या वेळेस आपल्या समोर मी देवाविषयीं कृतज्ञतापूर्वक उद्गार काढले ते.

ललिताबाई–तेव्हां मला त्यांत कांहीं कळेना.

तुझी निव्वळ बडबड वाटली. बरं, पण आतां आपण एकमेक ठरल्याप्रमाणं वागायचंना ?

**मत्सरसिंग**—हो हो. आतां त्यांत बदल व्हायचा नाहीं.

**ललिताबाई**—तूं मोठा पाणीदारच खरा आं! तुझ्यांत कांहीं ज्योत आहे मत्सरसिंग. हा तुझा निश्चय पाहून कोणालाही कौतुकच वाटेल. त्या मेल्यापेक्षां तूं काय कमी आहेस. गुणानं, रुपानं, शीलानं त्याच्यापेक्षां काकणभर अधिकच आहेस. पहा एका महिन्याच्या आंत त्या कपाळकरंट्याच्या ऐवजीं तुला गादीवर बशीवतें.

**मत्सरसिंग**—ज्ञात्याशिवाय गुणाची पारख नाहीं ह्मणतात तें अक्षरशः खरं आहे आईसाहेब. आपल्यासारखीं चार रसिक माणसं अजून जगांत आढळताहेत ह्मणून गुणाचं कांहीं उगीच चीज आहे. बरं तर, आतां होईल निरोप?

**ललिताबाई**—ठीक आहे. काय काय करायचं तें वेळोवेळीं आपण एकमेकांच्या सल्लामसलतीनं ठरवूं. जा तूं आतां. ( जाते. )

**मत्सरसिंग**—( आपल्याशीं ) ह्याला ह्मणतात मुत्सद्दीपणा. आपल्या नाटकांत सुंदर अभिनय करणारं पात्र असं मिळवावं लागतं बरं! केवढं मोठं तोरेबाज बोलणं. जशी कांहीं मैना बोलते आहे. पण तिला ह्मणावं तूं समजून ऐस कीं तुलाही पिंजऱ्यांत घालणारे कांहीं विलक्षण मंत्री आहेत. जोशीबुवानं मोठी मजा केलीन्. नाहीं तर जर गडबडता तर मग तिला

मथीवणं तर एकीकडेच राहतं; पण फजितीला मात्र पारावार नव्हता. सोंगाची बतावणी पण खूपच सुरेख केलीन. असं सोंग उठल्यावर मग तो दृष्टांताचा पेंच तर मारूच झाला.

पुरुषांच्या पेंचावर बायका तोड ती काय करणार. असो. एथवर तर आपलं गौडबंगाल नीटच साधलं. आतां उमेद बाळगायला कांहीं हरकत नाहीं. (जातो.)

**अंक दुसरा समाप्त.**

---

# अंक तिसरा.

**प्रवेश पहिला**–दिवाणजीच्या वाड्यांतील दिवाणखाना.

[ दिवाण प्रवेश करतो. ]

**दिवाण**–( आपल्याशीं ) ह्या महाराजाला हा लहानपणींच मला चंचल, तीव्रबुद्धीचा, हुशार, असा दिसला, ह्मणून दत्तक दिला. पुढें त्याच्याकडून विद्याभ्यास करविला आणि नंतर संस्थानांत परत आणला. माझी त्याच्यावर पहिल्यापासूनच मर्जी बसली. तशांत शिक्षणानें संस्कृत झाला ह्मणून गादीवर बसविण्यास योग्य असें मनांत येऊन त्या कृत्याची खटपट सुरू केली; तों कांहीं विपरीतच प्रकार घडूं येऊं पहातो. ललिताईनीं तर ती तसल्या प्रकारची खटपट करून लालासाहेबाला अगदीं आपल्या मुठींत ठेवला आहे.

त्यामुळें बादशहाचे हे असे सक्त हुकूम. एकंदरींत आपण स्वतः उभारलेली इमारत ढासळणार झालें. दुसरें काय ! एवढीशीच पैशाची लालूच. पण तिच्या योगानें मी केवढ्या मोठ्या कचाट्यांत सांपडलों आहे पहा ! राजकार्य करीन तर बादशहाचे चिरंजीवाची इतराजी होईल. बरें ! त्यांची मर्जी संपादन करीन तर राजकार्यास हरताळ लागणार. तेव्हां आतां सुरक्षित उपाय ह्मटला ह्मणजे अगदीं नाटक उठवून देण्यास तयार असलें पाहिजे, आणि हें नाटक नीट साधण्याकरितां अंतरंगसृष्टि आणि बाह्यांगसृष्टि ह्या दोहोमध्यें कितीतरी पडदे सोडले पाहिजेत ! पहा खरोखर त्या राजकुमाराचा उदय व्हावा अशी माझी मनापासून इच्छा ; आणि बाह्यांगसृष्टींत देखील अशीच इच्छा प्रदर्शित करणें भाग आहे. परंतु इच्छेच्या अंतरंगांत आणि बाह्यांगांत हेतुसंबंधानें पाहतां केवढें तरी अंतर ! बरें. महाराजाविषयीं मला मुळींच कळकळ नाहीं असें ललिताबाईसाहेबांस दाखविण्याचा वेष धारण करावा लागणार तर खरा. पण ह्या वेषाचा अंतर्वेषाशीं अगदीं वेगळाच संबंध. तर मग बुरख्यावर बुरखा, बुरख्यावर बुरखा घालण्याची योजना करण्याचें पतकरलें पाहिजे. ह्मणजे सर्व बुरख्यांच्या आंतील खरा वेष काय हें जाणण्याची कोणालाही मोठी मारामारच पडणार. हें सर्व तर ठरलं खरं. परंतु जी भूमिका स्वीकारावी लागणार तिच्या योग्य असा अभिनय माझ्या हातून कुशलतेनें वठेल कीं

नाहीं ह्या गोष्टींचा विचार करूं लागलों म्हणजे मन बरेंच शंकाकुळ होतें. (जरा विचार करून) छे; हें कंत्राट आपल्या हातून नाहीं बुवा निभणार. आपण आपलं ललिताबाईसाहेबास साफ सांगावं कीं, माझ्याकडून कांहीं व्हायचं नाहीं अन् मोकळं व्हावं कसं. ठरलं,असंच करायचं. तर चला तिकडेच जाऊं. (जातो)

## प्रवेश दुसरा.–ललिताबाईची खोली.

[ललिताबाई आणि विनायकराव प्रवेश करतात.]

**ललिताबाई**–हें पहा विनायकराव, तुम्हाला मी सांगतें तसं करा. तुम्हीं स्वतःची कल्पना लढविण्याचें ह्यांत मुळींच कारण नाहीं. ऐकलंत, कां तुम्हाला दिवाणजींचा हुकूम हवाय्? तसं असेल तर तसं सांगा; म्हणजे मी आपली त्यांचा हुकूम आणवीन कशी.

**विनायकराव**–आईसाहेब, आम्हाला काय. आपला हुकूम कायन् दिवाणजींचा हुकूम काय सारखाच. आम्हीं दोघांचेही ताबेदारच. तेव्हां हुकूम मान्य न करून कसे चालेल; पण सूचवायचं म्हणून एवढंच कीं, ह्या गोष्टीचा सगळ्या वाड्यांत बभ्रा होईल त्याची व्यवस्था काय?

**ललिताबाई**–हें पहा,बभ्रा झाला तर खुशाल होवो. तो नाहींसा करण्यास आम्ही खंबीर बसलों आहों. आम्हीं असं करण्यांत कांहीं दुष्कृत्य तर नाहींना आरंभलं?

**विनायकराव**–नाहीं. दुष्कृत्य नाहीं म्हणा.

**ललिताबाई**–झालं तर मग.

**विनायकराव**—पण मी असं ह्मणतों ह्या योगानं महाराजांची विनाकारण छळणूक नाहीं कां होणार ?

**ललिताबाई**—अहो, तुह्मी वेडे तर नव्हे विनायकराव ! छळणूक करण्याकरितां कां तुम्हाला आम्ही असं सांगूं ! ह्मणजे एकंदरींत तुम्हाला परवांची मौज माहीतच नाहीं असं दिसतं.

**विनायकराव**—मला नाहीं बुवा कांहीं मौजबीउज माहीत.

**ललिताबाई**—बरं तर मी सांगतें तुह्माला. हें पहा परवां कीं नाहीं आम्ही सगळींजण गच्चीवर अगदीं पांढरं शुभ्र चांदणं पडलं होतं ह्मणून एकेच ठिकाणीं जेवण्याचं ठरविलं. महाराजांनींही पण त्या दिशीं आमच्या बरोबर बसण्याचं कबूल केलं. पुढें काय झालं कीं, जेवतां जेवतां सहज गोष्टी निघाल्या कीं, वाटेल तें पक्वान्न किंवा हवी ती भाजी पानावर वाढली तर बिनचूक कोण ओळखतं. तों महाराजांनीं मारली घमेंड, आम्ही ओळखतों म्हणून.

**विनायकराव**—बरीच मजा आहे तर !

**ललिताबाई**—तेव्हां मग आम्हीं बायकांनींही पण प्रतिज्ञा केली कीं, ह्यांना खास फसवून ह्यांची फजिती करायचीच एकदां. तेव्हां असा विनोद करण्यांत छळणूक कशाची बरं तें तुम्हीच सांगा.

**विनायकराव**—ठीक आहे, आतां समजलों. मग चालूं द्या वाटेल तें. माझी काय हरकत आहे.

**ललिताबाई**—बरं पण काम मात्र अगदीं बेमालूम

करा अं. मुळीं दिखील बोभाटा करूं नका कसा पहातें कसं करतां तें.

विनायकराव–त्यांत बेमालूम तें काय करायचं. महाराज जे पदार्थ मागतील ते न देतां त्यांच्या ऐवजीं भलतेच कांहीं तरी द्यायचे एवढंच कीं नाहीं ?

ललिताबाई–पण त्यांना असंच सांगायचं कीं, आपण मागितलेलेच पदार्थ हे.

विनायकराव–समजलों.त्यांत विशेष कांहीं नाहीं.

ललिताबाई–तें खरं हो. तुम्ही कुशलतेनच कराल; पण आपलं मी सांगून ठेवलं हें बरं.

विनायकराव–होईल तर मग आतां हुकूम.

ललिताबाई–हं या. पण अगदीं सावधगिरीनं आं. (विनायकराव जातो) (आपल्याशीं ) मोठा बाई सोदा खरा अं. आपलं सांगितलं तें काम मुकाट्यानं करायचं सोडून देऊन अगदीं तोंड पसरून मला म्हणतो कीं, त्या मेल्याची छळणूक नाहीं कां होणार म्हणून. ह्याला असली चवकशी करायला सांगितलं कुणी. फाजील कुठला. बरं पण माझ्यांत कांहीं करामत आहे हें तुला वेड्याला काय माहीत ! शेवटीं थाप मारून तुझ्या हातावर तर तुरीच दिल्या कीं नाहीं आतां आपोआप सगळ नीट बिनबोभाट करशील ( जाते )

प्रवेश तिसरा–वाड्यांतील दिवाणखाना.

[मत्सरसिंग प्रवेश करितो.]

मत्सरसिंग–(आपल्याशीं) वः, एकंदर बेत तर ब-

ऱ्याच रंगाला येऊन पोहोंचला. मात्र मधेंच त्या दिवाणजीनं हातपाय गाळण्याचा आणला होता प्रसंग. कांहीं मुत्सद्दीपणाचा अंश त्या गृहस्थांत आहे असं आपल्याला तर नाहीं बुवा वाटत. आहे आपला मेषपात्र झालं. काय गुलाम रड्या! म्हणे असल्या बिकट प्रसंगांत मला नका गुंतवूं. माझ्या हातून तें कांहीं नीट नाहीं पार पडायचं. केवढा गुलामावर प्रसंग अन् पार तें काय पडायचं. सगळाच दळभद्र्याचा भकू कारखाना. सांगतील तसं ऐकायचं एवढंच काय तें ह्याचं काम. पण तेवढं देखील नेभळ्या तुझ्यानं करवेना! अरे प्रत्यक्ष बायकोसारखी बायको ती. पण तिनं बघ कशी कंबर बांधली आहेन् ती. शाबास खरी ललिताबाईची. पराक्रमीच बायको ती ह्यांत काय संशय! किती चतुराईनें काम करते पण. अगदीं त्याच्याशीं गोड गोड बोलून, तोंड कसं गोरं मोरं करून त्याच्या पोटांत मायेचे जसे पाझर फोडलेन! एवढ्यानंच किती झालं. शिवाय नेत्रकटाक्ष तयार होतेच. एवढं केलंन मात्र, तों काम तडीस नेतों अशी त्याच्याकडून प्रतिज्ञाच करविलीन्. ह्याचं नांव कामन् ह्याला ह्मणतात कर्तबगारी. नाहीं तर आमचे मित्र दिवाण साहेब! असो. आतां एकदाचा त्या सज्जनसिंगाला वाड्यांतून घालवून दिला ह्मणजे आपला रस्ता बराच साफ झाला म्हणायचा, बराच कां? पुराच साफ होईल. आणखी काय पाहिजे. आपण युक्ति तर मोठी नामी योजिली आहे. पाहूं या काय होतं तें. बहुधां फस-

णार नाहीं. आम्हीं हातीं धरलेली गोष्ट ही फत्ते झालीच पाहिजे. (बाजूस पाहून) हे इकडे महाराज त्याच संबन्धानें कांहीं पुटपुटत येताहेतसें वाटतें. आडून सर्व ऐकून तर घेऊं या; मग ठोकूं रामराम. (आड होतो).

**प्रवेश चवथा.**—तोच.

[महाराज प्रवेश करतात.]

**महाराज**—(आपल्याशीं) छे. हें संभवेल तरी कसं. अगदींच विलक्षण! कांहीं तर्क चालत नाहीं. अहो तो किती शहाणा, धूर्त, विचारी, नम्र, विश्वसनीय, खरा; अन् ह्या अशा कामांत! अशी गोष्ट त्याच्या ध्यानीं,मनीं, स्वप्नीं देखील आली नसती असं मला खास वाटतं. मग प्रत्यक्ष तसं आचरण करण्यास तयार अं! आणि तो कोण? तर प्रामाणिक, शुद्ध मनाचा सज्जनसिंगना!! बरं तो धाडशी तरी किती झाला? तर धाकट्या आईसाहेबांसारख्या इभ्रतदार, उग्र, कडक स्वभावाच्या स्त्रीवर हात टाकण्या इतका! अन् तें तरी केव्हां? भर दिवसा! हें सर्वच कांहीं बुवा अतर्क्य दिसतं. आपली तर कांहीं कल्पना चालत नाहीं. तेव्हां भरंवसा बसावा तरी कसा! परंतु अशी गोष्ट घडल्याचं प्रत्यक्ष आईसाहेब आपल्यास्वतःच्या तोंडानं सांगतात, आणि ते सांगतांना त्यांचा चेहरा तरी रागानं किती लाल दिसत होता! त्यांना असलं खोटं नाटं रचून सांगण्यांत काय बरं लाभ असेल? कांहीं नाहीं. ती बिचारी देवभोळी साध्वी. ती असल्या पापांत खचित पडायची नाहीं. तर मग स-

उज्जनसिंगच्च तें तिचं दिव्यरूप पाहून पावळला झालं. दुसरें काय? असेंच खरं. वहावा, सौंदर्या शाबास तुझी! तुझें साम्राज्य सर्व काळीं, सर्व जगीं, सर्व प्राण्यांवर सारखं चालतंना! तुझ्या चरणीं प्राणिमात्र अगदीं लीन होऊन जातात. एकदां कां तुझ्या मुलखांत मनुष्य शिरला कीं, तो पादाक्रांत झालाच ह्मणून समजावें. केवढा हा तुझा अम्मल अन् काय ही तुझी सत्ता! एखादा सर्व शक्तिमान्, बलाढ्य, सार्वभौम राजा जरी असला तरी प्रजाजनांचीं मनें जिंकण्या इतकं त्याचं सामर्थ्य नसतं. परंतु तुझ्या संबंधानं पहातां सर्वांचीं मनं वश करून घेणं हाच तर तुझा बाणा! तेव्हां तुझी योग्यता अर्थात सर्वांहून श्रेष्ठ मानिली पाहिजे. तुझ्या पुढें मनुष्य आपलं कुल विसरतं, शील सोडतं, आपल्या अमूल्य गुणांची राखरांगोळी करण्यास तयार होतं! काय ही तुझी अगाध शक्ति! हा नीचा, सज्जना, शेवटीं निर्लज्ज होऊन पशुतुल्य वर्तन केलंस अं. अधमा, धिःकार असो तुला! तुझ्या नांवाचा आतां नुस्ता उच्चार करणें ह्मणजे पाप आहे. (जरा स्वस्थ राहून) असंच तें; त्याला वाड्यांतून दूर केलाच पाहिजे, दुसरा कांहीं मार्ग नाहीं. (मत्सरसिंग पुढें येतो.)

**मत्सरसिंग**—महाराज, दूर कोणाला कारितां अन् काय हे आपले विचार चालले आहेत, आज आपणाला एवढा संताप यायला काय बरं कारण झालं असेल!

**महाराज**—मत्सरसिंग, या वेळेस मजजवळ अगदीं भाषण करूं नकोस.

**मत्सरसिंग**—तें नाहीं व्हायचं महाराज, मला सर्व समजलंच पाहिजे.

**महाराज**—नकोरे माझं मस्तक अधिक फिरवूं.

**मत्सरसिंग**—हे काय महाराज, मला तेवढं सांगि· तलं ह्मणून काय झालं.

**महाराज**—हे पहा ज्यास्त त्रास देशील तर मला ह्या वेळेस भ्रम होईल.

**मत्सरसिंग**—पण येवढं सांगण्यानं काय झालं भ्रम व्हायला.

**महाराज**—सांगतो तुला काय झालय् तें. ( मत्सर- सिंगाच्या जोरानें तोंडांत मारून चालते होतात. )

**मत्सरसिंग**—वा, काय बहार उडाली ! थोत्राडींत खाल्ली खरी, पण ह्या थोबाडीचा पुढें केवढा उपयोग करून घेईन येवढं कळण्या इतकी या वेडंबूला अक्कल ती कोठची असणार ! हा घमेंडनंदना सज्जनसिंग, तुला तर येथून अर्धचंद्र देऊन हाकून दिलाच ; अन् तो पुन्हा, ज्याच्या जिवाचा मी मोठा कालिदा असं समजत होतास, त्याच्याकडून, ही तर त्यांत विशेष शक्कल. आतां पहातों एकमेक कसें खलवत कराल तें. त्या वहिनी साहेबाजवळ देखील लेकाच्या गुजगुज गोष्टी चालायच्या. जसा कांहीं भ्रमर गुंजारव करतो- य्. ठीक झालं. तुला असलंच बक्षीस पाहिजे. अहाहा, देवा ! ह्या भूतलावर काय काय चमत्कार दृष्टीस पडतात, आणि ते पुन्हा आश्चर्यानें परिपूर्ण सुखाक- रितां तूं कशी सर्व प्राण्यांची शर्यत लाविली आहेस

अं! खरोखर सौख्य हेंच जर ह्या लोकीं अस्तित्वाचें पर्यवसान नसतं तर असे हे गाढव, मूर्खशिरोमणी आमच्यासारख्यांच्या अकलेस वळी कां पडते. (जातो.)

## प्रवेश पाचवा.—लीलेची खोली.

[ लीला आणि सज्जनसिंग प्रवेश करितात. ]

**लीला**—काय! भावोजी ह्मणतां काय? असं होईल तरी कसं. मला नाहीं बाई खरं वाटत.

**सज्जनसिंग**—वहिनीसाहेब, अजून कां तुह्माला संशयच. तुमचा नाहीं कां विश्वास बसत? काय हें माझं दुर्दैव!

**लीला**—अहो, संशय कां नाहीं येणार. तुमच्यावर तिकडचा लोभ किती होता हे मला नव्यानं कां सांगाला पाहिजे? काय जसं वेड असे. भावोजींची एक दिवस भेट नाहीं झाली कीं, अगदीं करमेनासं व्हायचं.

**सज्जनसिंग**—अहो, तें सर्व खरं, मी नाहीं कां ह्मणतों, पण.

**लीला**—हे काय भावोजी, पण कसचं आलय. कालपर्यंत अगदीं जीवश्च कंठश्च स्नेह होता अन् आज ह्मणें आह्मी वैरी झालों. कसं मेलं एखाद्याला खरं तरी हें वाटावं!

**सज्जनसिंग**—अहो, खोटें जरी वाटण्याचा संभव आहे तथापि ही गोष्ट अगदीं अक्षरशहा खरी आहे. मला त्यांणीं अगदीं सांगितलं कीं, तुला आजपासून वाड्यांत राहण्याची सक्त मनाई आहे ह्मणून.

**लीला**—पण असं सांगवेल तरी कसं, तुमची उगीच चेष्टा केली असेल झालं.

**सज्जनसिंग**—आतां काय करावं. कधीं कधीं आपण सांगतों तें खरं असून सुद्धां ऐकणाराला ती चेष्टाच वाटते, याचा मासला हाच पहा. अहो, मी इतका जीव तोडून सांगतोना कीं, त्यांनीं मला एकाएकीं असं सांगितलन् माझ्याशीं बोलायला देखील ते तिथें क्षणभरही थांबले नाहींत. तेव्हां हें सर्व मांझ्या पदरंचच कां ?

**लीला**—पण मग एवढं कारण तरी काय झालं ?

**सज्जनसिंग**—कारण कसलं; आपलं दुर्भाग्य झालं.

**लीला**—काय बाई एकक आयकावं तं चमत्कारिच्च कांहीं तरी. कारण नाहीं, भांडण नाहीं, बोलाचाली नाहीं अन् एकदम आपलं जा ह्मणून सांगितलं तर माणसानं त्यांत समजावं तरी काय ?

**सज्जनसिंग**—वरं, वहिनीसाहेब आतां आपण कारण शोधीत बसणार, कां माझ्या विनंतीकडे लक्ष देणार.

**लीला**—पण एवढी विनंती ती कशाला हवी, मी कां कुणी परकी कां आहें तुह्माला ? सांगा काय सांगायचं असेल तें.

**सज्जनसिंग**—हें पहा, महाराजांचें हित व्हावं हीच कायती आमची मनापासून इच्छा; त्यांचा उदय व्हावा, हाच आमचा आनंद, आणि त्यांना सुख व्हावं ह्यांतच आमचा अभिमान. ह्या सर्व गोष्टी घडून येण्यास आतां फारसा विलंब लागेल अशी

कांहीं गोष्ट नाहीं; आणि असं घडून येणं हें कांही मोठें अशक्यही नाहीं. तथापि आपल्याला आधीं कळवून ठेवायाचं ह्मणून इतकंच कीं, महाराजांच्या उदय चंद्राआड आपल्या कृष्ण कारस्थानांनीं मेवपटलें पसरून अंधःकार पाडावा असा धाकट्या आईसाहेबांनीं विडा उचलला आहे. एवढं आपण लक्षांत असूं द्यावं (लीलेचा उतरलेला चेहरा पाहून) नको, येवढा धीर सोडण्याचं कांहीं कारण नाहीं. माझं आपण शेवटपर्यंत ऐकून तर घ्याल.

**लीला**–[ श्वास टाकून ] हं, चालूंद्या. तरीच त्या असं भलतं भलतं बोलत होत्या.

**सज्जनसिंग**–ह्या खटपटींत दिवाणजींचेंही आंग आहे असं दिसतं.

**लीला**–हरहर, देवा, घरांतल्या घरांत कारे असले नीच बेत सुरू असावे ! !

**सज्जनसिंग**–वहिनीसाहेब, ही चिंता करण्याची वेळ नव्हे. आपण माझ्याकडे लक्ष द्या कशा.

**लीला**–बरं पुढें काय ?

**सज्जनसिंग**–तेव्हां आपण त्यांच्या बोलण्यावर, चालण्यावर, करण्यावर, सारखी नजर असूं द्या आणि ही गोष्ट महाराजांचे कानावर जाईल अशी तजवीज करा ह्मणजे त्यांचा बीमोड करणें ठीक पडेल.

**लीला**–बरं, मी आपल्याकडून सावध राहीन. तिकडेही कळवीन पण बाई माझ्या सांगण्यावर भरंवसा बसला पाहिजेना.

**सज्जनसिंग**–त्यांना समजावून सांगा ह्मणजे विश्वास बसेल. मीही आपल्याकडून होईल तितकी खटपट करण्यास कसूर करणार नाहीं. बरं, मी आतां आपला निरोप घेतों. माझं कर्तव्य संपलं.

**लीला**–पण भावोजी, तुमच्याकडून सांगणं होतं ह्मणजे तें बरं झालं असतं.

**सज्जनसिंग**–त्याला काय उपाय ? आपण आपल्याला दैवहीन मानावं अन् स्वस्थ बसावं झालं. पण हें पहा वहिनीसाहेब, मला परत बलावण्याविषयीं महाराजांचें मन वळेल तर यत्न करून पहा. कृपाकरून विसरणार नाहींना ! ( तिच्या पाया पडतो ) तुह्मी मला मातुश्रीप्रमाणंच अहां बरं, मला या संकटांतून सोडवा ह्मणजे मी आपले उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं हेच माझं शेवटचं सांगणं. [ डोळ्यांत पाणी येतें व तिच्याकडे पहात उभा रहातो. ]

**लीला**–बरं, या आतां. तुह्मी अगदीं धैर्य खचूं देऊं नका. मी माझ्याकडून होईल तितकं करण्यास कमी करणार नाहीं. ( जाते. )

**सज्जनसिंग**–( आपल्याशींच ) जा, माउलि तूं जा. हे साध्वि, अजून तुझं मन किती प्रेमळ आहे बरं ! सासूबाई कपटनाटक रचण्यांत व्यग्र आहेत, हें ऐकून तुला आश्चर्य वाटलं अं. उघडच आहे. तुझ्या मनाला जर अद्यापि कपटाचा लेश देखील नाहीं तर तुला दुसरं काय वाटणार ! सर्व पदार्थांचे ठाईं अजून तुला स्वतःचेंच प्रतिबिंब दिसत आहे. तुझं

हृदय ह्मणजे केवळ उन्नत आणि शुद्ध मनोवृत्तींचाच ठेवा आहे, ईश्वरा, अशा प्राण्याला तूं दुःख ह्मणून काय तें दाखवूं नको!

आमच्या महाराजांचा सदैव जयजयकार असूं दे. अहाहा हे रमणीय प्रासादस्थला, तुला सोडून आतां मला जावें लागणारना! काय हें माझें दुर्भाग्य! ज्या ठिकाणीं मी सत्तेनं वागत होतों तेथें पुनः प्रवेश करण्याची देखील मला आतां चोरी आं! ज्या राजकुमाराबरोबर हसण्याबोलण्याचा माझा हक्क त्याच राजकुमाराचें नुसतें मुखावलोकन करणें ह्मणजे आतां माझा केवढा अपराध! अशा एक कां दोन–सर्व सुखांना आतां मी आंचवलों. एका घटकेंत केवढें स्थित्यन्तर झालें पहा. काळाचा महिमा असाच कांहीं विलक्षण आहे. हे जगचालका, पुनः हाच वाडा माझ्या दृष्टीला उल्हासदायक होईल कां! ह्या तिमिराक्रमित रजनीचा विलय होऊन सूर्यकिरणांचा प्रकाश पडेल काय! अथवा अशी आशा करणें व्यर्थच नव्हें तर काय. ज्या जगांत असत्य भाषण हेंच स्वसुखाचें साधन; दुराचरण हें उन्नतावस्थेचें मुख्य अंग; नीच विकारांचें प्राबल्य हेंच यशप्राप्तीचें प्रधानद्वार, आणि जेथें सदा दुर्गुणांचा जयजयकार; त्या जगांत सत्गुणांचं वर्चस्व होण्याची आशा करणं ह्मणजे केवळ मूर्खपणाच समजला पाहिजे. असो. जावं झालं आतां. पण जाण्याचं नांव काढतांक्षणींच मन किती कचरतं पहा. मना, बाबा आतां दुःख करून काय उपयोग

बरं! महाराजांचं सदा क्षेमचिन्तन हेंच आपलं कर्तव्य मानावं आणि आनंदांत दिवस क्रमावे झालं. अहाहा, माझे प्रिय वसतिस्थाना, आतां तुझा विरह होणार खरा, मग उगीच निरोप घ्यायला तरी उशीर कां करा. (जातो.)

## प्रवेश पांचवा–महाराजांची खोली.

[ महाराजांपुढें एक शागीर्द फराळाचें ताट आणून ठेवतो आणि बाजूस उभा राहतो. हुजऱ्या हातावर पाणी घालून रूमाल पुढें करतो. ]

**महाराज**–(हात पुशीत) कायरे राजाराम, आज उशीरसा झाला. तुला दररोजची वेळ माहीत नाहीं होय.

**राजाराम**–आहे तर काय झालं पण झाला अम्मळ उशीर.

**महाराज**–दररोज दररोज कसला आलायरे उशीर. ऐकून घेतों ह्मणून वाटेल तसे जबाब देतोस वाटतं.

**राजाराम**–नाहीं महाराज. मी आपलं सहज बोलून चुकलों त्याबद्दल राग नसावा.

**महाराज**–( त्रासून ) कमाल झाली बुवा. अरे, तुम्ही मला रोजच्यारोज छळण्याचा पत्कर घेतला आहे कीं काय! काल तसं, परवां तसंच. सारखं आज आठ दिवस चाललंय्.

**राजाराम**–काय महाराज, झालं तरी काय?

**महाराज**–थोडकं तुझं. आजच्या लाडूंचा हा मासला कोठून पैदा केलासरे बाबा!

**राजाराम**—महाराज, तें कां? ते दळयाचे आहेत. आज ताजे केलेले आहेत.

**महाराज**—अरे, मग त्यांना असा कोंड्याचा काय वास येतो?

**राजाराम**—वः असं कसं होईल. आतां केलेन् आणले हेच.

**महाराज**—मग मी म्हणतों हें खोटंच कारे सारं? हा अगदीं कोंड्याचाच वास अन् दुसरं काय!

**राजाराम**—महाराज, आपल्याला आम्ही असे लाडू कां आणून देऊं?

**महाराज**—जास्त बोलून आपला शहाणपणा आणखीं व्यक्त करूं नको. (आश्चर्यानें) अरे, आज हें आहे तरी काय! तूं शुद्धीवर होतास का? हें श्रीखंड आहे कां काय आहे?

**राजाराम**—काय! हें कां? हें श्रीखंडच. दुसरं काय असणार असं!

**महाराज**—हो. (रागानें) दुसरं काय असणार, हें बघ एकदां. मेतूकूट आणलय अन् श्रीखंड काय म्हणतोस? (न्याहाळून पाहून) ह्याला केशर मात्र लावलं आहे खरं.

**राजाराम**—आतां काय बोलावं, इथें!

**महाराज**—तर मग मी खोटंच सांगतों कारे, गाढवा. (त्याच्या तोंडांत मारून मान खालीं करतात) हें पहा. डोळे उघड एकदां.

**राजाराम**—(आरडतो) हें काय मला असें मारतां

काय महाराज. मला कांहीं एक त्यांत कळत नाहीं.

**महाराज**–तुला कळत नाहीं काय, थांब तुला मी कळवितों. (पुनः चापट मारतात. राजाराम मोठ्यानें आरडतो. गलबा ऐकून ललिताबाई आणि मत्सरसिंग प्रवेश करतात.)

**मत्सरसिंग**–(पुढें सरसाऊन) हां हां हें काय महाराज! आपण कां असल्या नीच माणसावर हात टाकायचा. मला आज्ञा होती तर मी देखील आलों असतों.

**महाराज**–अरे करावं तरी काय. मला अगदीं त्यानं भंडावून सोडलन् कसं ते. फार बुवा उद्धट झालीं हीं माणसं.

**ललिताबाई**–(पुढें होऊन) पण बाई एवढं झालं तरी काय. केवढा गलबा तरी हा. इश्श, कोणी ऐकेल तर ह्मणेल तरी काय!

**राजाराम**–मला ह्यांनीं मारून मारून घेतलं आईसाहेब; तुह्मी आलांत ह्मणून बरं झालं नाहीं तर माझी आज इथल्याइंधच गठडी वळत होती.

**मत्सरसिंग**–(डोळ्यानें दाबून) गप्प बैस मूर्खा. मध्यें तोंड घालायला तुला कोणी सांगितलं. जरा जीभ आवर.

**ललिताबाई**–फार बाई चावट झालीं आं माणसं हीं. कोणापुढें कसं बोलावं एवढं दिखील ह्यांना कळेना. (महाराजाकडे वळून) बरं. पण असं झालं काय तें कळूं द्या तरी एकदां?

**महाराज**—अहो, फराळाला बसलों न् पहातों तों कसले वाईटन् साईट पदार्थ आणलेले! मी कशाला शिवलों देखील नाहीं.

**ललिताबाई**—असं कां तें? अशी अनास्था कां म्हणून पण?

**महाराज**—लाडू हातांत घेतला तों त्याला कोंड्याचा वास; बरं, श्रीखंड पाहूं ह्मटलं तर तें आपलं मेतकूटच. काय फराळ करणारानं फराळ करावा तरी कसा! बरं, पुढें सरबत घ्यावं म्हटलं तर त्यांत खोबरेलच मिसळलेलं. मला अगदीं आतां वांति होईल कीं, काय असं वाटतंय्. अशी आजची ही तिसरी चवथी वेळ.

**ललिताबाई**—खरंच कां पण हें! मग मोठा चमत्कारच म्हणायचा.

**महाराज**—तर मी आपल्याला खोटंच कां सांगेन. मत्सरसिंग, तूं बघरे एकदां चव घेऊन म्हणजे समजेल काय तें.

**मत्सरसिंग**—( चाखून ) छे, भलतंच कांहीं तरी! मला तर नाहीं बुवा कांहीं वासबीस येत.

**महाराज**—आहेस झालं गाजर पारखी. आईसाहेब, आपणच कां पहांना एकदां म्हणजे मी ह्मणतो तें खरं कां खोटं हें कळेल.

**ललिताबाई**—मी तरी काय ज्यास्त पहाणार. (खाऊन पहाते ) तरी म्हटलं असं होईल तरी कसं. विलक्षणच कांहीं! कांहीं वास नाहींनी बीस नाहीं. लाडू कसे चांगले चवदार झाले आहेत अन् श्री-

खडाला तर वास किती स्वादिष्ट येतोय पण!

**महाराज**–आतां मात्र कमाल झाली! आपणच जेव्हां असं म्हणतां तेव्हां दुसरं काय बोलायचंय्!

**ललिताबाई**–मी कांहीं महाराज चेष्टा नाहीं क' रीत तुमची. खरोखर मला बाई छान लागतंय्.

**महाराज**–( त्रासून ) तर मी तरी ही सारी थट्टाच करतोय कीं काय!

**ललिताबाई**–नसाल मेली. तुमच्या जिभेची तर मग रुचि गेली असेल. नाहीं तर तुमचं मन शुद्धीवर नसेल न दुसरं काय. आतां आम्हीं दोघांनीं पाहिलंना, तेव्हां आम्हा दोघांचं खरं कां तुमचं एकट्याचं खरं?

**महाराज**–बरोबरच आहे. माझी रुचि गेली; माझं मन शुद्धीवर नाहीं. मीं अगदीं वेडाच कीं नाहीं!

**ललिताबाई**–( गंभीरतेनें ) वेड्याला कां आणखी शिंगं असतात कीं काय. आणखी म्हटलंत तरी, आतांशे चार चारच चाळले आहेत. परवा म्हणे त्या मत्सरसिंगाच्या तोंडातच मारली. आज काय तर त्या बिचाऱ्यावर कांहीं तरी कुभांड रचून त्यालाच मार मार मारलं, ह्याचं नांव तरी काय! मी नव्हतं बाई असं कधीं पाह्यलं. आलीकडेच हे वेडे चाळे सुरूं झाले आहेत. एकदां वैद्याला तरी प्रकृति दाखविली पाहिजे.

**मत्सरसिंग**–खरंच आईसाहेब, आपण म्हणतां तें कांहीं खोटं नव्हे. एकदां पहावं तरी काय झालंय् तें.

**महाराज**–आपली जीभ फार लांब होत चालली वाटतं. (त्याचे कान उपटतात.)

**ललिताबाई**—काय हें महाराज आरंभलं आहेत तरी काय हें तुम्ही आज ! (आपल्याशीं) मी आपली येथून निघून जातें कशी. नाहीं तर आणखी माझी शोभा व्हायची एखादी. (ती, मत्सरसिंग आणि चाकर माणसें निघून जातात.)

**महाराज**—( आपल्याशीं ) आजचा हा चवथा प्रसंग. दर वेळेस अशी कांहीं तरी कटकट करून माझ्याशीं भांडतात अन् माझं माथं फिरवतात. पुढें मी काय करतों ह्याचं मळा अगदीं भान नाहीं रहात तें. हें काय डोकं तापलं पहा.

कोण बुवा असला त्रास नेहमीं नेहमीं सहन करील. पण माझा असा छळ करण्यांत ह्यांचा काय बरं मतलब असेल ! वुद्ध्या गांजणूक करतात म्हणावं तर अशा दुष्टपणाबद्दल आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यापेक्षां ह्यांना दुसरा फायदा तो काय होणार. असं करण्यांत हौसच वाटते ह्मणावं तर मी ह्यांचा असा काय अपराध केलाय् कीं माझें मन दुखविण्यांतच ह्यांना सौख्य वाटावं ! चेष्टा जर म्हणावी तर अशी विकोपाला जाणारी चेष्टा करून आपण स्वतः मार खायला किंवा शिव्या ध्यायला कोण तयार होईल ? अथवा कदाचित माझीच बुद्धि तर भ्रंश पावली नसेलना ! पण मी असे वेडे चाळे कसे करीन ! कां बरं, काय हरकत आहे. मनच जर शुद्धीवर नसेल तर मनुष्य वाटेल तसं वरळतं; वाटेल तें वेडं कृत्य करतं. पण मी देहभानावर आहें असा आंतून ध्वनि निघतो

तो कुणाचा तर मग ! हां बरोबर आहे. खरोखरच शुद्धीवर आत्मा नसता जर असा ध्वनि निघतो तर तोही खोटाच असला पाहिजे. मग त्याच्यावर विश्वास कसा ठेवावा ! तर मी भ्रमिष्ट झालोंय् असंच म्हणायचं. पण असं मी आपलं स्वतः ठरवितों इतकं तर मला भान आहे. तेव्हां ह्याचं नांव तरी काय ? सर्वच घोटाळा ! ( जातात. )

**प्रवेश सहावा**—सतकुवरबाईचा महाल.

[ सतकुवरबाई ऊर्फ थोरल्या आईसाहेब आणि लीला प्रवेश करतात. ]

**सतकुवरबाई**—अग इतक्यांतच दिवाणजी भेटून गेले; पण त्यांनीं सांगितलं कीं, गादीवर बसविण्याचा समारंभ आठ पंधरा दिवसांचे आंतच करण्याचा बादशहाचा विचार आहे म्हणून.

**लीला**—तर मग वराच जवळ आला म्हणायचा.

**सतकुवरबाई**—लीला, हें बघ महाराजांना किनै एकदां अभिषेक झाला अन् तुला कांहीं मूलबाळ झालं म्हणजे माझे सगळे सुखसोहाळे झाले असं मी मानीन.

**लीला**—पण बाई हा समारंभ एकदांचा कसा निर्विघ्नपणें तडीस जाईल तो जावो. मला तर त्याचं नांव काढलं कीं भयच वाटतं.

**सतकुवरबाई**—अग भय तें कसलं त्यांत ; त्याचा आतां संशय का कांहीं आहे.

**लीला**—धाकट्या सासूबाईचे काय काय बेत चालले आहेत, ते अजून कानावर नाहीं आले वाटतं.

**सतकुवरबाई** अग हो. सज्जनसिंगानं सारं कांहीं सांगितलंन. त्याला मात्र बाई इथून जातांना किती तरी अवघड वाटलं म्हणतेस !

**लीला**—मग त्याची व्यवस्था काय पण ?

**सतकुवरबाई**—मी दिवाणजी जवळ सगळा पाढा वाचलाय् अन् तेही पण मला म्हणाले कीं, काळजी करण्याचं कांहींएक कारण नाहीं.

**लीला**—पण दिवाणजीच मुळीं त्या मसलतींत आहेत त्याची काय वाट.

**सतकुवरबाई**—असूंदे परते असले तर. त्यांचंच कां बादशहा सगळं ऐकेल. हें बघ तूं अशी काळजी करून आपल्या जीवाला अगदीं दुःख देऊं नकोस कसं; सर्व कांहीं देवाच्या दयेनं आपल्या मनाप्रमाणं खास होईल.

## प्रवेश सातवा—वाड्यांतील चित्रशाळा.

[ महाराज प्रवेश करतात. ]

**महाराज**—( आपल्याशीं ) जें कळलं आहे तें एकदां संशयमुक्त केलंच पाहिजे. मी बोलावणं धाडून तर बराच वेळ झाला अजून कां बरं येत नाहींत. ( लीला प्रवेश करते. )

**लीला**—आलेंच म्हणाल्या. पण मी मात्र नाहीं बाई इथें उभी राहणार.

**महाराज**—तें कांहीं नाहीं चालायचं. उभं राह्यलच पाहिजे.

**लीला**–मला बाई लाज वाटेल. त्यांच्या देखत मी अशी उभी राहूं तरी कशी.

**महाराज**–आतां कां लाज? सांगतांना नाहीं लाज वाटली. तूं येथें समक्ष असलीस म्हणजे एकदां काय ती शहानिशा करून टाकतों.

**लीला**–म्हणजे कांहीं तरी करून माझी फजिती करायची वाटतं.

**महाराज**–( तिच्या हनवटीला हात लावतात ) हें तोंड समोर असलं म्हणजे मला बोलतांना मोठं अवसान येईल म्हणून तुला जाऊं नाहीं द्यायची. (ललिताबाई मंजुळेसह प्रवेश करतात. )

**लीला**–इश्श. सासूबाई आल्या त्या पहा. मी आपली जातें कशी. ( जाते )

**महाराज**–( बाजूस ) बराच थाटमाट करून आल्या आहेत. या म्हणावं आतां. परीक्षेची वेळ जवळच येऊन ठेपली आहे. ( ललिताबाईला ) यायला बराच उशीरसा झाला म्हटलं.

**ललिता**–झाला अम्मळ; बसलें होतें बाईशीं बोलत.

**महाराज**–आईसाहेब, चितारी काम पहाण्याची तुम्हाला जरा हौस म्हणून म्हटलं आज ही तसदी द्यावी.

**ललिता**–हात्तिच्या तसदी ती कसली त्याच्यांत. पण खरोखर महाराज, हुबेहुब जर प्रतिमा काढली असली किनै तर मोठी मौज खरी आं. मला तर अशी प्रतिमा पाहून भारी आनंद लोटतो.

**महाराज**—आजच्या ह्या तसबिरी अशाच मोठ्या कसबी कारागिरानें काढलेल्या आहेत. त्रावणकोराहून हा आलेला आहे.

**ललिताबाई**—मोठा न मांकित असेल तर.

**महाराज**—हो हो.

**ललिताबाई**—बरं पाहूं द्या तर खऱ्या कशा आहेत त्या. उगीच आधींच येवढं वर्णन नको.

**महाराज**—( एका तसबिरीवरील वस्त्र काढतात ) ही पहा पहिल्यानदां कशी आहे ती.

**ललिताबाई**—वाः, काय विलक्षण लावण्य हें ! ही स्त्री मोठी मोहकन् रंगेली दिसताहे बरं कां. पण बाई हें काय ! तिला नवरा मात्र असा पंडुरोगी काय काढला आहेन् तो. हिला नवरा कसा दिव्य पाहिजे. चांगलं नाहीं कांहीं शोभत असं जोडपं. कायग मंजुळे, तुला कसं दिसतंय.

**मंजुळा**—खरंच बाईसाहेब तिला कसा तरणाताठा गुलजार जवान पाहिजे.

**महाराज**—आईसाहेब, हा कांहीं तिचा नवरा नव्हें.

**ललिताबाई**—तर ! दुसऱ्याच्याच कां मांडीवर बसली आहे ही. दिसते आहे तर कुलीन.

**महाराज**—हा तिचा आवडता जार आहे. तिनं त्याला मिठी पहा कशी घट्ट मारली आहेन् ती अन् तो तरी प्रेमानं किती वेडा झालाय् पहा.

**ललिताबाई**—पण तिचा नवरा नाहीं असं कशावरुन महाराज ?

**महाराज**–ती विधवा आहे. हें पाह्यलत, तिच्या कपाळीं कुंकू आहे कां ?

**ललिताबाई**–मग दागदागिने बरे घातले आहेन् ते.

**महाराज**–अहो, ती थोर मराठ्यांच्या कुळातली आहे ह्मणून.

**मंजुळा**–बाईसाहेब, हिचे डोळे पहा कसे सुरेख दिसताहेत ते.

**ललिताबाई**–आंत जसं पाणी खेळतंय् असे दिसतात नाहींग. तोंडावर तरी काय हें तेज लोटलंय् ! आनंदांत गर्क आहे बिचारी.

**महाराज**–आपल्या प्रियकराशीं बोलण्यास किती उत्सुक झाली आहे हें अगदीं हुबेहुब दाखवलय् नाहीं?

**ललिताबाई**–खरच बाई शिकस्त आहे आं त्या चितार्‍याची. पण आपल्या योग्य असा पुरुष कांहीं तिनं पसंत केला नाहीं हें खास.

**महाराज**–मन कुठें लुब्ध होईल हें कांहीं सांगतां येणार नाहीं आईसाहेब.

**ललिताबाई**–बरं. पण हिनं असा हा भलता संबंध कां बरं जुळवून आणला असावा ! कांहीं तरी हेतु असला पाहिजे.

**महाराज**–हो हो, हेतु असेल तर ! ( बाजूस ) हेतु असला ह्मणजे मग मात्र जार देखील ठेवावे. हा संबंध तर हिच्या हृदयापाशीं खिळला खास, हें तिच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत आहे. बरं पुढें पाहूं. ( उघड ) आईसाहेब ह्या स्त्रिया जितक्या शरीरानें

सुंदर दिसतात तितक्या जर खरोखर मनानें असत्या तर ह्या जगांतील निदान एक तृतियांश माणसं सुखी असतीं बरं.

**ललिताबाई**—ह्या बाईचा कुणाला जर वृत्तान्त माहीत असतां तर काय मौज होती! मला तो ऐक-ण्याची फार इच्छा झाली आहे.

**महाराज**—अहो, ही एका मोठ्या कुलवान राजाची धर्मपत्नी आहे.

**ललिताबाई**—तर मग मोठ्या राजघराण्यांतील असून असं कां?

**महाराज**—पुढें तो राजा परकीय राज्यांत निवर्तला. तेव्हां त्याच्या मागून त्याच्या थोरल्या राणीच्या मुलाला अभिषेक करायचं ठरलं. हा पहा तो राजपुत्र ह्या तसबिरींत आहे. (दुसऱ्या तसबिरीकडे बोट करतात.)

**ललिताबाई**—आधीं पण सगळी हकीगत तर कळूं द्या.

**महाराज**—ह्मणून या स्त्रीला मत्सर उत्पन्न होऊन, त्या सवतीच्या मुलाला एकदांचा कसा तरी वेडा ठरवावा अन् मग आपल्या पसंतीनं आपल्या मांडीवर दत्तक घ्यावा असं तिच्या मनांत आलं.

**ललिताबाई**—तर मग ही त्या राजाची धाकटी राणी वाटतं?

**महाराज**—ह्याच त्या धाकट्या राणीसाहेब.

**ललिताबाई**—बरं पुढं?

**महाराज**–तेव्हां आपला हेतु सिद्धीस जावा ह्मणून हिनं एका मुसलमान राजपुत्राशीं असला नीच, अपवित्र संबंध जुळविलान् [ तजविरीकडे बोट करून, तिच्या तोंडाकडे पाहातात. ] आतां समजलंना ? ही ज्याच्या गळ्यांत मिठी घालून बसली आहे ते गृहस्थ कोण ते. ते हे मुसलमान राजपुत्र.

**ललिताबाई**–असं कां! पुरे तर मेलं आतां हें पहाणं; असल्या ह्या दुष्टमूर्ति पाहूनन् त्यांची ही अशी अश्लील लीला ऐकून माझ्या अंगाचा पहा कसा थरकांप होतोय्.

**महाराज**–कां नाहीं होणार. ज्याला कधींही असल्या गोष्टी स्वप्नीं देखील दिसायच्या नाहींत त्या प्रत्यक्ष पाहून असं होणं हें साहजिकच आहे. (बाजूस) असं करणं मात्र त्याहून साहजिक. ( उघड ) आतां एवढी दुसरी पाहिली कीं झालं. ( दाखवितात )

**ललिताबाई**–(पाहते) हा कां तो राजपुत्र ? असा काय दिसतो बाई तो.

**महाराज**–ह्या क्रूर, भयंकर स्त्रीनं त्याला वेडा करण्याचा केलेला विचार त्याला कळून ही त्याची अशी शोचनीय स्थिति झाली आहे. त्याला पाहुन कोणाचेंही हृदय कळवळेल. काय करील बिचारा !

**ललिताबाई**–शिव शिव, काय भयंकरन् हृदयद्रावक देखावा ! माझ्या अंगावर कसा कांटा येऊन हुडहुडी भरल्यासारखं झालं आहे पहा.

**महाराज**–ह्यावरून एकंदरींत चितार्‍याची केवढी चतुराई आहे बरं. पण तुह्मालां तजविरी पसंत पडल्याना?

ललिताबाई–हें पहा, एव्हां त्याचं कांहीं नको. कायग बाई मला अगदीं थंडी भरलीही. एकदां मला माझ्या महालात जाऊं द्या ह्मणजे झालं. मंजुळे, चल कशी. क्षणभर दडपून पांघरूण घेऊन पडलें म्हणजे जरा बरं वाटेल.

महाराज–ठीक आहे, जावं. मंजुळे ह्यांना जपून ने आं. (ललिताबाई आणि मंजुळा जातात.) (स्वतःशीं) वहावारे चितारी! आपल्या कलेंत निष्णात खरा. ज्याप्रमाणें त्याला सांगितलं त्याप्रमाणें त्यानं तजविरी कशा हुबेहूब उठवल्यान्. प्रतिमेमध्यें मनोविकारांची छाया इतकी स्पष्ट रेखली आहे कीं, त्या निर्जीव मूर्ति सचेतनच आहेत कीं काय असा प्रेक्षकास भास व्हावा. एकंदरींत त्याची कला पूर्णतेला पावलेली खरी. त्या चित्रांतील वृत्तीशीं माझं अगदीं तादात्म्य झाल्यामुळें माझं मलाच भान नसल्यासारखं झालं होतं. पण आतां मात्र ती सर्व वृत्ति जाऊन सर्वांगांत प्रबल, तीव्र विकारांचें वादळ सुटून तें आंग फोडून बाहेर पडते कीं काय अशा शरीराला वेदना होत आहेत. आंग भडकून त्यांतून निरनिराळ्या द्वारांनीं ज्या प्रखर ज्वाला उठतील त्यांच्या शांत्यर्थ ह्या बिचारीच्या एकट्या जिवाची तर काय कथा–पण तिच्या शरीराच्या प्रत्येक रंध्रामागें एक असे शेंकडोंशें जीव जरी उत्पन्न झाले तरी त्या सर्वांची आहुति पुरे होईल कीं नाहीं ह्याचा संशयच आहे. छे, छे, शरीराचे सर्व टाके तुटतात कीं काय असं वाटतं. हा दुष्टे, नीचे,

व्यभिचारिणि, तुझ्या हृदयांत त्या विधात्यानें काय काय मालमसाला भरला असेल तो त्याचा त्यालाच ठाऊक ! कुलांगारे, अमावास्येच्या मध्यरात्रीच्या भयंकर अंधःकाराप्रमाणें तें काळें असावें आणि पहाणारास तें तसें न दिसल्यामुळें प्रांत भागांतील काटेरी झाडांस कोणी आडकून राहतील, कोणी खडकावर आपटतील, कोणी एकाद्या घातुक ओहळांत बुडून मरतील, कोणी हिंसक पशूंच्या तडाक्यांत सांपडतलि ते पुनः सांपडणार देखील नाहींत. हा वेश्ये, मनुष्यजातीस तूं एक कलंकच होऊन बसशील. आपल्या पांढऱ्या हातांनीं राज्यश्रीमंदिरावर जो अग्नि ठेविलास त्याच्या प्रखर प्रज्वलित ज्वालांची, सर्व जगास आपलें कृष्णकारस्थान जाहीर करण्याकरितां मशाल पेटविलीस अं!! आपल्या पूर्वजांचा उच्चार करण्याकरितां अन् स्वपतीवरील आपलें प्रेम व्यक्त करण्याकरितां आपल्या गौरकाय वर्णाच्या लाल तेजाचा प्रकाश पाडून व्यभिचार महोत्सव आरंभिलास कीं काय ! ज्ञान हें एक महापातकच समजलं पाहिजे. ज्याची चोरी झाली, त्याला जर चोरीस गेलेल्या जिनसेची गरज नाहीं, आणि त्याला असं झाल्याचं कळवूं मात्र नव्हे म्हणजे त्याची चोरी जशी काय झालीच नाहीं. तद्वत माझ्या न कळत एकच काय पण हजारो जरी नीच बेत सुरूं असते आणि ह्या डाकिणीची काया जरी सर्व जगानें भ्रष्ट केली असती तरी माझं मन स्वस्थ राहतं ; परंतु कळल्या-

बरोबर एका क्षणांत काय स्थिति झाली पहा ! एकंदर ह्या सर्व दुष्ट प्रकारांचा देखावा दृष्टीपुढें आला आणि त्यामुळें सर्व संस्थानाच्या हिताहिताचे. उत्कर्षापकर्षांचे विचार मनांत घोळूं लागले कीं, कंबर अगदीं खचून जाते; नाहीं. अगदीं आतां उभं राहवत नाहीं. अंगाला किती दरदरून घाम सुटला हा ! [ कोचावर पडतात. पडदा पडतो. ]

### अंक तिसरा समाप्त.

---

## अंक चवथा.

### प्रवेश पहिला—ललिताबाईचा महाल.

[ ललिताबाई आणि मत्सरसिंग प्रवेश करतात. ]

ललिताबाई—काय दुष्ट वेळ ती. वैऱ्याला दिखील असा प्रसंग कधीं येऊं नये. खरोखर मत्सरसिंग, त्या वेळेस माझी स्थिति कशी झाली म्हणशील तर मला सांगतां दिखील येणार नाहीं इतकी चमत्कारिक बरं. त्यांनीं मला अगदीं बावरी करून सोडली कशी ! एक तसबीर पहिल्यानं पाहिलीन् तिचा वृत्तांत ऐकला तों तोंच माझ्या हृदयाला अगदीं झोंबला. स्थीरपणानं त्यांच्याशीं बोलण्याचीसुद्धां मला मारामार पडूं लागली. इतक्यांत त्यांनीं दुसरी दाखविली अन् तिचं वर्णन करूं लागले मात्र तोंच मला हींव भरलं; अगदीं बोबडी वळण्याची वेळ आली. शेवटीं मी कशीबशी आपल्या म

हालांत परतलं. तेव्हां एवढ्यावरून त्यांनीं माझं मन तर ओळखलं खास असं मला वाटतं. तर मग आतां कसं ?

**मत्सरसिंग**–( बाजूस ) बाईसाहेब घाबरलेल्या तर दिसतात खऱ्या. परंतु त्यांच्या घाबरपट्टीनं आपल्या मनोरथांची मात्र राखरांगोळी होऊं पहाते. तेव्हां जें झालं तें उलटं हितकरच झालं अशी ह्यांची समजूत केली ह्मणजे आपलं कार्य अगदीं अव्याहत चालेल. (उघड) हें पहा आईसाहेब, झाली ही गोष्ट फारच नामी झाली. अशी गोष्ट आपण घडवून आणूं म्हटलं असतं तर घडून आली नसती. वः खरोखरच सर्वोत्कृष्ट झालं !

**ललिताबाई**–हेंरे काय मत्सरसिंग, मी आपली तुझी मसलत घ्यावी म्हणून भोळ्या भावानं सगळं तुला सांगितलं तों मेलं तूं माझी चेष्टा काय आरंभलीस !

**मत्सरसिंग**–ही चेष्टा नव्हे. मी म्हणतों हें सर्वथैव खरं आणि सयुक्तीक आहे कीं नाहीं तें पहा.

**ललिताबाई**–कसंरे ?

**मत्सरसिंग**–हे तुमचे बेत–

**ललिताबाई**–माझे एकटीचेच कारे गुलामा.

**मत्सरसिंग**–नाहीं हो. आपल्या सर्वांचे बेत जर महाराजांना कळले नसते तर ते वाटेल तसं मनोराज्य करतेन् मनांत मांडे खाते. आपण थोडक्याच दिवसांत सिंहासनारूढ होऊं अशा आशा आणि मनोरथ ह्यांतच ते गर्क रहाते. अशामुळें झालं असतं काय कीं, त्यांच्या डोक्यांत भ्रम उत्पन्न करण्याचा जो आपला मुख्य उद्देश तो आपण मग कितीही यत्न करतों तरी सिद्धीस जाण्याची

पंचाईतच पडती. आतां पहा काय मौज होईल ती ! निराशेचं दुःख तर त्यांच्या उरावर बसलंच बसलं. आणि आपले बेत मोडून काडण्याचीं साधनं तर हातांत कांहींच नाहींत. तेव्हां मग काय. आंतल्याआंत जीव तरफड तरफड तरफडेलन् मग श्रमिष्ट झालेच ह्मणून समजा. येवढ्यानं झालं काय पण! महाराज वेडे झाले ह्मणून जी खोटी रचना करावी लागती ती आतां नको करायला आपले अगदीं खरोखरच वेडे. तेव्हां गादीवर न बसवणें हें यथान्यायच होईल. मग हें लहान कां कार्य झालं!

**ललिताबाई**—खरंच गडे, शाबास शाबास मत्सरसिंग; (त्याची पाठ थोपटते.) कल्पना पण कल्पना काढलीस ! असंच ते. असं होईल खरं; कालच डोकं फिरून गेलं ह्मणून ते अगदीं निजून होते बरं कां. पण लालासाहेबांची भेट झाली होती कां मत्सरसिंग ?

**मत्सरसिंग**—हो हो. आपलं नांव सांगितल्यावर भेट होणार नाहीं अशी काय गोष्ट आहे. आईसाहेबांकडून आलोय् असं कळविल्याबरोबर वर्दी लागली.

**ललिताबाई**—तर मग ते काय ह्मणाले तें सांग आधीं.

**मत्सरसिंग**—त्यानीं सांगितलं कीं, आपल्या मनाप्रमाणें सर्व व्यवस्था दिवाणजी मार्फत करीवली आहे. तेव्हां आतां रुसण्याचं कांहीं कारण नाहीं. घरांतील तजवीज मात्र कायती तुम्ही संभाळा.

**ललिताबाई**—झालं एकदाचं सर्व काम त्यांच्याच हातून झालं ही उत्तम गोष्ट झाली.

**मत्सरसिंग**—त्यांनीं संध्याकाळीं आपल्याला भेटायला

बोलावलय् आं. म्हणाले मी अगदीं वाट पहात बसतों.

**ललिताबाई**–आतां मोठ्या हौसेनं जाईन मी. बरं, पण तूंही गोष्टबाईंना कशी खुबीनं कळवतोस म्हणशील!

**मत्सरसिंग**–तें माझं काम. त्याची आपल्याला अगदीं फिकीर नको. मी जातोंच तर मग. तेंच काम पहिल्यानं करूं.

**ललिताबाई**–जा, अगदीं सावधगिरीनं अं (मत्सरसिंग जातो.) (आपल्याशीं) मोठा गुलाम हुशार खरा आं. कल्पना पण कशी छानदार काढलीन्. त्यामुळें माझ्या मनाला किती तरी धीर आला. शिवाय लालासाहेबांची मदत आहे हें मोठं भाग्यच समजलं पाहिजे; तीं आपली मीच आहें ह्मणून माझ्या मर्जीबाहेर त्यांना काडीभर दिखील जातां येत नाहीं. असो; असंच एकदां शेवदास जावो ह्मणजे गंगेस घोडे न्हायले. (जाते)

## प्रवेश दुसरा–महाराजांचा दिवाणखाना.

[महाराज डोकें बांधून पलंगावर पडले आहेत. लीला उशाशीं उभी आहे. सत्कुवरबाई उशाकडे तोंड करून बसल्या आहेत.]

**महाराज**–( खोल स्वरानं ) हें पाह्यलत कां माझं डोकं किती तापलय् तें. अगदीं सारखं भ्रमण चालं आहे. मनांत शेंकडो विचारांची सारखी झटपट चालली आहे. अजून एकाचीही सरशी होत नाहीं. त्यामुळें माझ्या मनाची स्थिति किती विलक्षण झाला आहे पहा. क्षणांत उत्साह वाटतो, क्षणांत मी खिन्न

होतों, क्षणांत सर्व आनंदमय भासतें, क्षणांत समाधान वाटतें, क्षणांत महत्वाकांक्षा उत्पन्न होते; एकदां मी करीन तें होईल असें अवसान येतें. एकदां पराधीनता हृदयाला झोंबते, आणि शेवटीं पुनः निराशेचा अम्मल सुरू होतो. असा मी अगदीं वेड्यासारखा झालों आहें!

सतकुवरबाई—पण असा जीवाचा संताप करून कसं चालेल बरं. सगळ्या गोष्टी खऱ्या. ती दुष्ट, ती कपटी आहे. कोणत्या वेळेस मान कापील ह्याचा नेम नाहीं. पण ह्या गोष्टीचा बंदोबस्त करायचा कां आपणच आपलं कुढत बसायचं. अम्मळ हुशारी धराल तरच काहीं उपयोग आहे. तुम्ही मनांत आणल्यावर काय नाहीं होणार.

महाराज—(उठून बसून) अहो तत्वतः पाहिलं तर मी ह्या वाड्यांतिल माणसांचाच काय पण सर्व संस्थानच्या लोकांचा स्वामी आहें. सर्वांवर माझी सत्ता आहे. परंतु या दुष्ट चंडाळणीच्या केवळ कपटानं अन् त्या परस्त्रीलोलुप शिखानष्टाच्या मसलतीनं व्यवहारांत मला त्यांचं दास्य करावं लागणारना! परवशतेचा मी बंदा गुलाम होणारन् माझ्यावर त्यांचीच हुकमत चालणार कीं नाहीं! मग ह्यापेक्षां मरण बरं. यः कश्चित् दीड दमडीचीं चाकर माणसं सुद्धां उलट उत्तरं देऊन अपमान करायला लागलीं. परवां ती जारिणी निर्लज्जपणानं तोंड पसरून मला म्हणते कीं, तुम्ही शुद्धीवर नसाल; तुम्ही वेडेच आहां. तर तें सर्व मला निमुटपणेंच ऐकून घ्यावं लागलं कीं नाहीं.

काय ही माझी मानखंडना, केवढी ही अप्रतिष्ठा, कोण ही अवहेलना! परमेश्वरा, ह्यापेक्षां मला हें उच्चपद मुळींच प्राप्त झालं नसतं तर बरं नसतं का झालं! म्हणायला काय तर संस्थानचे महाराज. दिसायला काय, तर अधिकार केवढा! पण सत्तेच्या नावानं मात्र पांचजन्य! एखाद्या ल्हानशा डगरीवरून पडणं बरं. परंतु पर्वतावरून पडलं कीं, प्राणांचा चूरच व्हावयाचा. आतां करूं तरी काय! (आंग टाकतात, लीला सांवरते.)

**सतकुवरबाई**—आतां काय तरी करावंगबाई. कांहीं सुचेनासं झालय्. ह्यांचं मन शांत तरी केव्हां होणार. ह्यांच्या जिवाला चैन तरी कसं पडणार. अंबाबाई, आह्माला ह्या संकटांतून सोडीव बरं! महाराजांच्या प्रकृतीला आराम पडूं दे ह्मणजे सहस्त्र सुवासिनींची खणानारळानं ओटी भरीन अन् तुझी सोन्याची प्रतिमा करून देव्हाऱ्यांत बसवीन. महाराज, जरा धीर धरा बरं. असं अवसान सोडून कसं चालेल. मी स्वतः बादशहाच्या कानावर ह्या सर्व गोष्टी घालून लालासाहेबांचा बंदोबस्त करीवतें. मग तर झालं कीं नाहीं. तुम्ही अगदीं काळजी सोडून द्या कशी. उठून बसा अन् येवढं दूध ध्या ह्मणजे पहा कसं बरं वाटेल तें.

**महाराज**—(उठून बसतात.) आईसाहेब, केवढी ही माझ्याविषयीं तुम्हाला कळकळ. ह्याचा मी उतराई तरी कसा होईन! (दूध पितात.) अहाहा, किती थंड वाटतें पहा. मला तुम्ही आपल्या ममतेचा पेला भरून दिलात त्यामुळें मी गार झालों आं. दुधानं

नव्हे बरं. देवा! येवढं तरी मीं आपलं मोठं भाग्य समजतों कीं, ह्या माउलीच्या आणि ह्या लाडकीच्या हृदयांत सत्तेनं प्रवेश करण्याची मला मोकळीक आहे. आईसाहेब, तुम्ही अंबिकेचं स्मरण केल्याबरोबर पहा मला किती बरं वाटतय्! मी आतां वाटेल तें सो-सण्यास तयार झालों आहें.

सतकुवरबाई—शाबास बेटा असंच धैर्य धरावं. ह्यांतच कल्याण आहे.

लीला—अम्मळ डोकीला गुलाबपाणी तरी चोळूं कां बाई ह्मणजे जरा बरं वाटलं तर वाटेल तरी.

महाराज—कोण! (तिच्याकडे बघून) आपण कां चोळणार. चोळा बरं. आपल्या प्रेमाचा अर्क माझ्या मस्तकाला लावा ह्मणजे आतां डोकीचा संताप नाहींसा होईल. आईसाहेब, (लीलेकडे हात करून) हिचें प्रेम आणि तुमचें वात्सल्य ह्या दोन विस्तीर्ण, मनोहर, रमणीय प्रान्तांत माझं जें सार्वभौमत्व पसरलं आहे तें हिरावून नेण्यास कोणाची तरी छाती होईल कां! ह्या दोन ठिकाणीं तरी माझ्या स्वामित्वाचा भगवा झेंडा सदैव फडको ह्मणजे मी आपल्याला धन्य मानीन.

[ मत्सरसिंग प्रवेश करतो. ] मत्सरसिंग बरा आ-लास. तुझी मी वाटच पहात होतों.

मत्सरसिंग—( बाजूस ) वाः वार्ता कळवायला प्र-संग तर मोठा नामी आलाय् खरा. पहावें ह्या औष-धाचा काय गुण येतो तो. हे तीव्र जालीम औषधा, आपला पराक्रम चांगला दाखीव बरं. काढतोच तुला

आतां पोतडी बाहेर. (सतकुंवरबाईस) आईसाहेब, कायहो हा माझ्यावर बिकट प्रसंग आलाय् पहा. ह्यांतून मी पार तरी कसा पडेन! मला कांहीं युक्ति तरी सांगा.

सत्कुंवरबाई–अरे मत्सरसिंग प्रसंग तो कसचान् पार काय पडायचं!

मत्सरसिंग–काय सांगावं तरी काय. कांहीं विचारूं नका. केवढं घोर अरिष्ट हें! आणि माझ्याच कपाळीं कसं आलं पहा कीं हो.

सत्कुंवरबाई–पण असं मुग्धांत काय. स्पष्ट सांगेनास काय असेल तें.

मत्सरसिंग–भलतंच कांहीं तरी. माझ्यानं स्पष्ट सांगवेल तरी कसं. हें पाह्यलंत कां माझं हृदय सारखं कसं धडधड उडत आहे तें. तुह्मा सगळ्यांना पाह्यल्या बरोबर माझं धैर्यच खचून गेलं. केवढं हें आपणा सर्वांचं दुर्दैव!

महाराज–अरे वाटेल तें दुर्दैव असूं दे. 'आह्माला काय त्याची पर्वा आहे. सांग सांग, असं घाबरायला कायझालंय्.

मत्सरसिंग–महाराज आपणच विचारतां अन् आपल्यावरच कोसळलेलं संकट आपल्या समक्ष सांगण्याची ह्या मत्सरसिंगाला पाळी यावी ह्यापेक्षां मी जन्मतांच मुका कां नाहीं झालों. छेहो माझ्यानं सांगण्याचं धारिष्ट नाहीं होणार! फार तर लिहून दाखवतों. (कागदावर लिहून तो कागद महाराजांपुढें ठेवतो.)

लीला–(स्वतःशीं) अंबाबाई सर्व इडापीडा टळूं दे बरं?

महाराज–(वाचतात) " आपल्याला भ्रम झाल्यामुळें राज्याधिकार देण्याचा विचार बादशहांनीं रहित

करण्याविषयीं हुकूम फर्माविला आहे" असा दिवाण-जींचा निरोप आहे. ( सर्वांगास घाम सुटतो. ) बरं आहे बाबा! आम्ही बादशहाचे गुलामच आहों. आमच्या पूर्वजांच्या नुसत्या नांवाचा महिमा केवढा होता! त्यांच्या पराक्रमापुढें ह्याच मुसंड्यांना देमाय धरणीठाव असं होत असे! आणि तेच आतां आमच्या उरावर बसून वाटेल तसा जुलूम, घातपात करण्यास कसे तयार आहेत पहा. पण त्यांना तरी काय बोल! आम्हीच जर हातांत बांगड्या भरल्या, हतवीर्य झालों, नेभळे ठरलों तर ते तरी आह्माला कां भितील! बाबांनो, वाटेल ती छळणूक करा. तुह्मी आमचे यजमान अहां. शिव शिव, काय ही अवस्था! सर्वांगांत विष कालवलें ह्मणजे जशा वेदना होतात, तद्वतच हे शब्द माझं काळीज चरचर कापून सर्व शरीरांत भिनून गेल्या मुळें मला वेदना होत आहेत. आतां सर्व कांहीं मावळलं. निराशे, ये ये, आतां तूं माझी प्रिया हो. मला घट्ट आलिंगन दे. माझ्या हृदयावर तुझं साम्राज्य सर्वकाळ राहूं दे. मी आतां तुझा बंदा दास आहे बरं! निराशे, तुझ्याशीं एकदां कां समागम झाला कीं, मनुष्य किती तरी सुखी होतो पहा! जगाला तुच्छ मानणें, इहलोकचीं सुखदुःखें, हालविपत्ति, चिन्ताव्याधि ह्या सर्वांना लाथ मारणें, मायापाशाचीं बंधनें तोडून टाकणें, अशा सर्व गोष्टी ह्मणजे त्याच्या अगदीं अंकित होतात. एवढीं सर्व बन्धनं तोडून स्वतंत्र जो झाला तो कालातीत, स्थलातीत झाला. त्याला कशाचीही पर्वा

नाहीं. अन् अशी स्थिति होणें हें त्याच्या सर्व सुखाचें भाण्डार. तेव्हां एवढा सुखाचा ठेवा तुझ्याजवळ असतां, निराशे, तुला लोक का भितात बरं! मी तर नाहीं तुला कधीं भिणार. तूं आतां माझी अगदीं सखी. तूंच माझी आई. (लीलेकडे व सतकुवरबाईकडे हात करून) ही माझी प्रियतमा अन् ह्या माझ्या मातोश्री ह्या देखील आतां मला तुझ्यापुढें तुच्छ आहेत. तूंच माझें राज्य, तूंच माझें सिंहासन. हा पहा मी त्यावर बसलों. (उठून पुनः पुनः बसतात.) या कींहो. आईसाहेब, ह्या सिंहसनावर बसा. ये, लाडके ये. अशी इथें बैस. मला एकट्यालाच काय पण आह्मां तिघांना, मत्सरसिंग, ह्या कागदांतील अक्षरांनीं अभिषेक कर, आणि त्यांतील शब्दांचे सुरावर मंत्र ह्मण. ह्मण ह्मण. अरे चालू दे. स्वस्थ कां उभा! माझा जयजयकार करणं तुला सहन नाहीं कां होत! असं असेल तर चालता हो. आईसाहेब, प्रिये, तुह्मी माझ्याजवळ बसून ह्या गादीचा उपभोग नाहीं कां घेत? या या. मला एकट्यालाच हा राज्याधिकार नको! दिवाणजींना हा सोहळा पाह्यला बोलवाहो!

**मत्सरसिंग**—महाराज, एवढें आपण व्याकुळ होऊं नका. हेही दिवस ईश्वरकृपेनें जातील.

**महाराज**—छेरे. मी शोकानं नाहीं व्याकुळ झालों. मला आनंदवायु झाला आहे!

**सतकुवरबाई**—हर हर देवा! काय हा दुष्ट प्रसंग! महाराज, नकाहो असं करूं. हें पाहून माझा जीव

कसा फाटून जातो हो. स्वस्थ बसा कसे क्षणभर. मी तुम्हाला वडील नव्हे कां. माझं ऐका पाहूं. मी बघा सगळी व्यवस्था कशी नीट करतें ती.

**महाराज**–होहो, तुम्ही मला वडीलच अहां बरं. मी तुम्हाला कां दुःख देईन! हा पहा गप्प बसलों आं. ( तोंड दाबून धरतात. )

**मत्सरसिंग**–( बाजूस ) मंत्र तर चांगलाच लागू पडला. त्याचा प्रभावच तसा आहे. आतां हकीम आला तरी हरकत नाहीं. ( उघड ) आईसाहेब, कायहो दैवानं ही आग पाखडली! आपल्याच्यानं नाहीं आतां हें तर सहन करवत. चला; आपण अम्मळ जाऊं इथून. दिवाणजी हकीमाला घेऊन इतक्यांत येणार आहेत. देवा, औषध चांगलं लागूं पडून आमच्या महाराजांना लवकर आराम पडूं दे, आणि त्यांनां पुनः सुखाचं वारं लागूं दे आं.

**लीला आणि सतकुवरबाई**–अंबाबाई, तुजजवळ पदर पसरून आमचं एवढंच मागणं आहे तें पूर्ण कर. ( सर्व जातात. पडदा पडतो. )

## प्रवेश तिसरा–लालासाहेबाचा तंबू.

[ लालासाहेबाच्या कमरेला मिठी मारलेल्या ललिताबाई प्रवेश करतात. ]

**ललिताबाई**–हें काय. मीं कधीं नाहीं म्हटलंय् पण! वाटेल तेव्हां सेवेला ही दासी तयार आहे. एकदां सांगितलंना कीं, ही काया आपल्याला अर्पण केली आहे म्हणून;

पण मी ह्मणतें त्याचं काय तें आधीं सांगितलं पाहिजे.

**लालासाहेब**—मला ऐकूं दे तर खरं काय तुझं ह्मणणं आहे तें.

**ललिताबाई**—ह्मणजे पुनःमाझ्या तोंडून वदवायचं वाटतं.

**लालासा०**—परंतु पुनः सांगितलं ह्मणून बिघडलं काय.

**ललिताबाई**—बिघडायचं काय त्यांत. मीं परवां ह्मटलेलं नाहीं कां आठवत कीं, आतां मत्सरसिंगाला माझ्या मांडीवर दत्तक बसवून त्याला गादीचा मालक करायचा तें! महाराजासंबन्धानं तर सर्व ग्रंथ आटप-लाच ह्मणायाचा कीं नाहीं आतां.

**लालासाहेब**—पण ह्या सर्व गोष्टी जशा कांहीं आपल्याच हातांतल्या असतील नव्हे?

**ललिताबाई**—हातांतल्याच नाहीं तर काय. आपण मनावर घेतल्यावर बादशहा परकी कां आहेत.

**लालासाहेब**—एकंदरींत आपली प्रत्येक कामांत घाई खरी.

**ललिताबाई**—अहा, बाई ती काय झाली त्याच्यांत! महाराजच जर भ्रमिष्ट झाले तर दुसरा नको कां कोणी दत्तक घ्यायला.

**लालासाहेब**—तें सर्व खरं. पण कांहीं विचार केला पाहिजे कां उगीच कांहीं तरी एकदम करायचं अन् मग एखादं भलतंच झालं ह्मणजे कुथत बसायच. एवढं केलं तोच जिकडे तिकडे केवढा बोभाटा झालाय्, बाकी मी काय बोभाट्याला मोजतोंय् ह्मणा.

**ललिताबाई**—खरंच कां पण बोभाटा झालाय्!

लालासाहेब—कसा नाहीं होणार. घडघडीत सर्व गोष्टी उघड उघड चालल्या आहेत. सत्तेपुढें कोणाचं शहाणपण चालत नाहीं ह्मणून कोणी बोलून दाखवीत नाहीं. उगीच बसतात, दुसरं काय.

ललिताबाई—तर मग आपल्याला नीट दिसेल तसंच कां होईना.

लालासाहेब—त्यांचा विश्वास तर बसला पाहिजे. जिकडची तिकडची चळवळ जरा शांत होऊं द्या. मग मत्सरसिंगालाच दत्तक घ्यायचा अन् तुमच्याच मांडीवर बसवायचा बरं. ( तिचा गाल धरतो. )

ललिताबाई—इश्श् हें काय! मी लहान कां आतां गाल धरायला. बरं पण दुसरी गोष्ट करायला ही अशीच कां कांहीं अडचण आहे?

लालासाहेब—काय ती सांगशील तर खरी.

ललिताबाई—ही कथली व्याध एकदां कुठं तरी दूर नेऊन ठेवायची ह्मणजे लीलेचीन् त्यांची पुनः गांठच नको पडायला. आज दोन दिवस नाहीं तरी मी त्यांना तिच्याशीं बोलूं देत नाहींच ह्मणा. त्यामुळें मनांतल्या मनांत काय जळफळताहेत पण? असंच पाहिजे आहे त्यांना.

लालासाहेब—दिवाणजीला सांगून लवकरच तें करवतों. आतां तुमचं काम संपलंना सगळं?

ललिताबाई—सारं संपलं. सध्या तरी कांहीं दुसरं दिसत नाहीं बाई.

लाला—मग आमचं थोडं आतां ऐकाल कीं नाहीं.

( तिची हनवटी धरून चुंबन घेऊं लागतो तों ती झिडकारते. ) ( पडता पडतो.)

**प्रवेश ४था**–महाराजांच्या दिवाणखान्याबाहेरील बोळ.

[एक सेवक लीलेला ओढीत आणतो.]

**सेवक**–( आरडून ) शंभरदां सांगितलं असेल कीं, महाराजांच्या खोलींत गडबड करायची नाहीं ह्मणून. त्यांना कटकट अगदीं सोसणार नाहीं असा हकीम-साहेबांचा हुकूम आहे तो लक्षांत नाहीं वाटतं ! पण तुम्ही आपल्या लोचटासारख्या पुनः पुनः तोंड घा-लायला पहातां अन् मग आमच्या हातून असा अप-मान करून घेतां. ( जातो. )

**लीला**–हाय हाय देवा! केवढा मेल्यांचा मला हा जाच. काय रांडेच्यांनीं आमचा छळ मांडलाय् पहा. शिव शिव ! प्राणेश्वरा, कायहो ही आपली स्थिति, काय ही विपत्ति, कोण हे हाल ! केवढा हा आपला अपमान ! किती ही आपली विटंबना ! कोण ही आपली अवहेलना ! विनोदानं केलेल्या कठोर भाष-णापेक्षां दुसरे कठोर शब्द खपत नसत; तेच आतां नीच चाकर माणसांची उद्धट उत्तरं अन् हृदयाला बोचणारीं अपमानकारक भाषणं कशीं हो सोसवत अ-सतील !! ज्या देहाला माझ्या स्पर्शाशिवाय अन्य स्पर्श दुःसह वाटत असे त्याच देहाला आतां वैद्या-च्यान् इतर नोकरांच्या लाथाबुक्या कशाहो सहन होत असतील ! ज्या शरीराला सासूबाईंच्या छायेखा-

ळीं उष्णतेचा लेश देखील माहीत नव्हता त्याच सकुमार शरीराला त्या कृत्येनं वणवा लावलान् त्याच्या प्रखर ज्वाला भाजीत असतील त्या वेदना कशागशाई सोसवतील! एखादे दिवशीं जर माझी सहज भेट झाली नाहीं तर जीव किती व्याकूळ होतसे; तर मग, आतां मला हे दुष्ट चांडाळ जुळमानं भेटूं देत नाहींत, ह्मणून मनाचा विरहानं भडका उठला असेल तो कसा तरी शमवाल! असं सांगतात कीं, पूर्वीं अंतःपुरांतील स्त्रियांकडे जर कोणीं नुसती वांकडी नजर केली तर त्याचा सूड उगवण्याकरितां शेंकडो तरवारी खळ् खळ् करीत म्यानांतून बाहेर पडून चमकूं लागत. तेच आतां प्रत्यक्ष राजपुत्राच्या स्त्रीला हलकट चाकर माणसं फरफर ओढीत आणतांना सर्वांना पहावतंना!! काय ही आमची दशा! हा कृत्ये कात्यायनी महामाये, तुला जर आमचं वैभव पहावत नव्हतं तर आपल्याच हातांनीं आम्हां दोघांच्या माना एकदम चरचर कापून कां नाहीं टाकल्यास! पण असं करून तूं आम्हांला सुख कोठून देशील. आम्हांला जिवन्त ठेवून आमचे हाल हाल करून, आमची छळणूक मांडून आमच्या माना मुरगाळाव्या ह्यांतच तुला आनंद वाटत असेल तर! प्रत्यक्ष दुखणेकरी असतां तिकडची सेवाचाकरी करण्याची मला मनाई अं. ज्यांच्या बरोबर धर्मशास्त्राप्रमाणं माझी जन्माची गांठ घातली त्यांच्याजवळ बसण्या बोलण्याची दिखील मला चोरीना! माझ्या बोलण्यानं कटकट होते अन्

ह्या चांडाळाच्या गांजणुकीनं मात्र दुखण्याला कसा आराम पडतो अं! खरंचरे बाबा खरंच. मी निर्लज्ज, मी लोचट आहें. प्रेमानं मला लोचट केलंय् हें तुला कसं कळणार! तुझ्याकडे कांहीं दोष नाहीं. आमचंच कपाळ फुटकं. हे अंबाबाई, हे जगदंबे, आमचे हाल पाहून तुला तरी करुणा येऊं दे बरं! आह्मांला हें राज्य नको; हा अधिकार नको; हें वैभव नको; ही संपत्ति नकोन् त्याबरोबर ही हालअपेष्टा पण नको. आह्मांला दीनदशा येऊं दे पण दोघांची तुटातूट कध्धीं कध्धीं पाडूं नकोस. प्रियकरा, याहो या एकदां मला कडकडून भेटा! माझ्यानं नाहीं हा आतां विरह सहन होत! (जमिनीवर पडते. महाराज धांवत धांवत प्रवेश करतात.)

**महाराज**—अहाहा! प्रिये तूं कां आक्रोश करीत आहेस! तुझेच कां हे दीनवाणे स्वर! ये ये. हा पहा मी तुला आलिंगन द्यायला तयार आहे. ये, लाडके ये. वाटेल ती तुझी हौस पुरवीन; तुझे लाड करीन. चल ऊठ, प्राणवल्लभे ऊठ! (लीला झटकन उठून मिठी मारते)

**लीला**—अहारे देवा! केवढं हें माझं नशीब. धन्य धन्य मी! प्राणनाथ माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करा ह्मणजे माझ्या ह्या संतप्त मनाला थंड गार वाटेल.

**महाराज**—( मिठी सोडवतात. ) पुरे पुरे, सोड सोड ही मिठी. तुला आलिंगन देण्यास मला अधिकार कुठाय्! (तिच्याकडे पहातात.) तूंच कां माझी प्रिया! मीच तुझा पति! छे छे. नव्हें नव्हें. मला आतां प्रिया नाहीं. तुला आतां पति नाहीं. मी तुला

नुसता स्पर्श केला तर दंड नाहीं कां होणार!

**लीला**—हें काय असं भलतंच बोलायचं तें! मी आपलीच नव्हें कां. दुखण्यानं विसर पडला कीं काय. पण बाई असं कसं होईल. आपण मला कध्धीं विसरणार नाहीं. (पुनः मिठी मारूं लागते.)

**महाराज**—नको नको. आजपासून तूं माझी धर्मपत्नी नव्हेस असा ठराव झालाय्ना! तूं आतां दुसऱ्याची झालीस. चाकरमाणसांची तुझ्यावर सत्ता! दिवाणजींची तर तुझ्यावर मालकीच! सोड सोड. मला शिवूं नकोस. तुला विटाळ होईल. पाप लागेल. जा जा. स्नान करून शुद्ध हो‌न् त्या पवित्र मातेच्या चरणावर मस्तक ठेव ह्मणजे तुला पुण्य लागेल! (हिसका मारून तिला दूर करतात.)

**लीला**—नकाहो नका. असं भलतं भलतं बोलून माझ्या हृदयाला टोचूं नका. मी गाय झालें आहें. करूं तरी काय! प्रतिबन्ध असल्यामुळें माझ्या हातून सेवा होत नाहीं, हा माझा कां अपराध. प्राणवल्लभा, नकाहो मला दूर लोटूं. मला दुसरं कोण बरं प्रेमाचं माणूस आहे! आपल्याला आतां मी कधीं दृष्टिआड होऊं द्यायची नाहीं. (जवळ जाते.)

**महाराज**—लाडके ये. (हात करून पुनः मागें घेतात.) पण नको. मी कैदी आहें. मला वेड्याला अशी राजकुमारिका कशी शोभेल सांग बरं! एकांतांत बोलतांना जर कोणी पाह्यलं तर देहदंड नाहीं कां सोसावा लागणार! सुंदरि, सोड आतां. हे पहा माझे

पहारेकरी आले. (दोन सेवक महाराजांस धक्के मारीत नेतात. लीला मागून आरडत जाते.)

**लीला**—हा मेल्या दुष्ट दैवा! काय ह्या यमयातना! कोण हा आमचा छळ चालवला आहेस! सोडारे सोडा. चंडाळांनो असे कां रे माजलेत! (पडदा पडतो.)

**प्रवेश पांचवा**—लाला साहेबांचा तंबू.

[लालासाहेब आणि दिवाणजी प्रवेश करतात]

**लालासाहेब**—कां दिवाणजी तुह्माला हवे तसे बादशहांच्या सहीचे हुकूम आणून दिले कीं नाहीं!

**दिवाणजी**—हें काय खाविंद. आपला अकिकार तसाच आहे. आपल्यापेक्षां बादशहांची सत्ता अधिक ती काय असणार! आपण प्रत्यक्ष प्रभुच अहां. जें मनांत आणाल तें करण्याचें आपलें सामर्थ्य आहे.

**लालासाहेब**—तेव्हां तुमची आतां कांहीं कुरकुर नाहींना? तुमच्या बक्षिशीची तजवीज आह्मी स्वतः करू.

**दिवाणजी**—मी कुठें बक्षिशीची गोष्ट काढली आहे खाविंद! खाविंद जें करतील तें मला सेवकाला मान्य आहे.

**लालासाहेब**—तर मग आतां अरदीं निर्भयपणें कारभार चालूद्यान् एकदां आमच्या ललितेचे मनोरथ पूर्ण होऊं द्या ह्मणजे झालें. आमच्यावर तिचा फार विश्वास आहे.

**दिवाणजी**—हें काय! खावंदावर नाहीं असणार तर कोणावर असेल!

**लालासाहेब**—सर्व काम तिच्या धोरणानेंच चालू द्या आं.

**दिवाणजी**—मी एक काडीभर त्यांच्या मर्जीबाहेर नाहीं.

लालासाहेब—किल्ल्याच्या योजनेंत तुह्मी असालच.

दिवाणजी—होहो. अगदीं सर्वोत्कृष्ट बंदोबस्त करतों.

लालासाहेब—ठीक आहे.

दिवाणजी—घेतों तर आतां खावंदाची रजा. ( तंबूबाहेर जातो. ) ( आपल्याशीं ) काय लेकाची चैन! तीन तीन दिवस त्या ललिताबाईला घेऊन एकटा तंबूंत रहातो अन् आह्माला मात्र तिच्या मर्जीकरतां वाटेल तसे हुकून फर्मावतो. पण करतां काय! पैशाच्या मोहोनीपुढें आह्मी अगदीं गाय झालों ह्मणून वाटेल तसं त्यांनीं चापलं तरी ऐकून घेणं भाग आहे. आतां एकदां कंबर बांधली आहे तर शेवटपर्यंत मजल मारूं या. मग काय आपलं राज्य आहेन् आपण आहों.

( पडदा पडतो. )

प्रवेश सहावा—ललिताबाईची खोली.

[ललिताबाई आणि मत्सरसिंग येतात.]

मत्सरसिंग—पण दिवाणजींच्या कानावर ती गोष्ट घातली नाहीं वाटतं आजून?

ललिताबाई—अरे हो, दोन दिवस झाले त्यांना सांगून.

मत्सरसिंग—मग ते काय ह्मणाले?

ललिता०—लवकरच व्यवस्था करतों असं कबूल केलंय्.

मत्सरसिंग—बरं. पण त्याच्यांत एक युक्ति लढवायची ती आली कां लक्षांत.

ललिताबाई—तुमची कांहीं तरी युक्ति निघायची ह मला स्वप्नच पडलं होतं.

मत्सरसिंग—ह्मणजे हें पहा, महाराजांनां आतां

किल्ल्यावर ठेवतील कीं नाहीं तेव्हां त्यांच्या शुश्रुषे करतां ह्मणून बरोबर माझी रवानगी झाली पाहिजे.

ललिताबाई—वा! पण आपण शुश्रुषा तरी काय करणार.

मत्सरसिंग—कारण त्याचं असं आहे कीं, जरा पैशाची लालुच दाखवली कीं, पहारेकरी मंडळी भुरळतील अन् वाटेल त्याला खुशाल आंत प्रवेश करून भेट घ्यायची परवानगी देतील. तर हें तुह्माला पसंत आहे कां?

ललिताबाई—खरंच बाई. त्याचा काय नेम सांगावा. असं होण्याचा संभव आहे खरा.

मत्सरसिंग—ह्मणूनच मी ह्मणतों कीं, मीच तेथें असलों ह्मणजे मग बंदोबस्ताविषयीं अगदीं पाह्यला नको.

ललिताबाई—खरोखर तुझा तर्क अगदीं खरा आहे.

मत्सरसिंग—अहो, त्यांत कसला आला आहे तर्क. आह्मी कांहीं मोठे बृहस्पति नव्हें. परंतु माझं ह्मणणं इतकंच कीं जें काय करणं असेल तें आपल्याकडून नीट दूरवर विचार करून करावं झालं.

ललिताबाई—बरं तर त्यांना मी असं कळिवतें ह्मणजे झालं कीं नाहीं.

मत्सरसिंग—अर्थात्. एवढं केलं ह्मणजे तें नीट जुळलंच पाहिजे.

ललिताबाई—पण आणखी एक गोष्ट केल्याशिवाय सुटका नाहीं, आलं कां ध्यानांत कोणती ती?

मत्सरसिंग—हो. तें तर पहिल्या पासूनच ठरलं आहे. मी त्यांना स्मशान दाखविल्याशिवाय परत येत नाहीं हें अगदीं ब्रह्मलिखित समजा.

**ललिताबाई**—ह्मणजे असं बघ कीं, हें दुखणं किती दिवस लांबतन् काय होतं हें कुणी सांगवं. ह्मणून ह्मटलं आपलं एका घावास दोन तुकडे हेंच बरं.

**मत्सरसिंग**—मग तुह्माला काय वाटलं ! महाराजांच्या बरोबर मी उगीचच जातींय होय. अहो माझा हाच उद्देश आहे.

**ललिताबाई**—पण तूं योजना कशी काय करणार ती मला आधीं कळूं दे. नाहीं तर मेलं करायला जावं एक अन् भलतंच कांहीं तरी व्हायचं.

**मत्सरसिंग**—अहो मीं कां वेडा आहे. त्याची तुह्माला अगदीं फिकीर नको.

**ललिताबाई**—तूं मोठा शहाण आहेस हें मी ही कबूल करतेंरे. पण मला कळवलंस तर तुला बाट कां लागेल.

**मत्सरसिंग**—हें पहा औषधें देण्याचें काम आतांशा मजकडेच असतं हें तुह्माला माहीत आहेना.

**ललिताबाई**—हो.

**मत्सरसिंग**—तेव्हां त्यांतच व्यवस्था करितों ह्मणजे झालं कीं नाहीं.

**ललिताबाई**—हां हां; हें ठीक आहे. ह्मणजे अगदीं बिन्बोभाट होईल खरं. टाक थोड्याच दिवसांत उरकून तर मग. उगाच उशीर तरी कशाला.

**मत्सरसिंग**—आस्थेआस्थे सर्व करूं,जरा धीर धरा. मी तर असं समजतों कीं, ज्याला धीर नाहीं तो ह्या जगांत अगदीं भिकारी. ( बाजूस ) आणखी एक तिसरी गोष्ट करायची आहे ती कुठे आहे आपल्या

ध्यानांत. आपल्यालाच ह्या जगांतून हद्दपार केल्या शिवाय गत्यन्तर कुठें आहे. मग पुनः कोणाच्या मांडीवर दत्तक द्यावा हा वाद निघायचा अवकाश ठेविण्याइतका मी मूर्ख कसा होऊं. ( जातो. )

**ललिताबाई**–(आपल्याशीं) असो. एकंदरींत बरीच मजल मारली म्हणायची. आतां एकदां निर्विघ्नपणें सगळे हेतु सिद्धीस गेले ह्मणजे सुटलें. खरोखर मनुष्य मनांत आणील तें करील म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. एकदां खटपट सुरू केली कीं, इकडचं जग तिकडे करायला किती उशीर. पहा आतां थोड्याच दिवसांत रावाचा रंक अन् रंकाचा राव होण्याची वेळ आलीच कीं नाहीं. (इतक्यांत मंजुळा दासी येते.)

**मंजुळा**–बाईसाहेब, थांबाहो थांबा !

**ललिताबाई**–अग अशी घाबऱ्या घाबऱ्या काय बोलतेस.

**मंजुळा**–नाहींहो बाईसाहेब, थांबाच पण तुम्ही.

**ललिताबाई**–ह्मणजे तुझं ह्मणणं तरी काय ?

**मंजुळा**–ह्मणजे मी आपल्या पायां पडतें तोंवर थांबा म्हटलं.

**ललिताबाई**–अग पायां पडायला काय झालं.

**मंजुळा**–पायां नको पडूं तर काय करूं. आपण ह्मणतां तें खरंच आहे.

**ललिताबाई**–मी काय म्हटलं पण.

**मंजुळा**–आपण म्हणालांत तें कांहीं खोटं नाहीं.

**ललिताबाई**–ह्मणजे.

मंजुळा–ह्मणजे माझंही ह्मणणं असंच आहे.

ललिता–अग तूं बोलतेस तरी काय?

मंजुळा–आपल्या सारखंच माझं ह्मणणं आहे ह्मणून आपल्याला ठाऊकच आहे. मग मी उगीच कशाला सांगूं. पण ह्मणतां तें कांहीं खोटं नाहीं.

ललिता–हाग मेले काय चावटपणा! सांग सांग म्हणतें तों अधिकच आपलं.

मंजुळा–अहो रावाचा रंक अन् रंकाचा राव आतां होणारना!

ललिता–मग तुला काय त्याच्याशीं करायचंय्.

मंजुळा–त्या मत्सरसिंगाला तुम्ही अरेराव करून सोडणार कीं नाहीं तो आधींच अरेरावी करूं लागलाय्.

ललिता–ती कशीग?

मंजुळा–माझ्याकडे डोळे भरून भरून अगदीं टक लावून त्यानं आतां पाह्यलं हें नीट दिसतं कां.

ललिताबाई–तर तर तूं मोठी रंभाच किनै तर तुझ्याकडे पाह्यलं ह्मणून तो मोठा अरेराव झाला!

मंजुळा–पुनः असं झालं तर मला नाहीं खपणार बाईसाहेब.

ललिताबाई–तूं कोण मोठी अशी.

मंजुळा–राणी ललिताबाईसाहेबांची आवडती मंजुळा.

( जातात. )

प्रवेश ६ वा–महाराजांच्या दिवाणखन्याबाहेरील बोळ.

[एक सिद्दी मुका चाकर प्रवेश करतो.]

मुका–( इकडे तिकडे कावऱ्या बावऱ्या सारखें

पाहून स्वतःशी ) परमेश्वरा तुझी लीला अगाध आहे बरें! तुझ्या शक्तिमत्तेचें जेवढें कौतुक करावें तेवढें थोडेंच! तुला समदृष्टि ह्मणतात, तें कांहीं मिथ्या नव्हे. जगन्नायका, मजवर तुझ्या कृपेचा वर्षाव झाला. त्या करितां हा भक्त तुझ्या चरणीं लीन आहे. आतां ह्याच वेषांत शेवटपर्यंत मला यशस्वी कर येवढीच तुला करद्वय जोडून प्रार्थना आहे. मी सत्यपक्षाचा जर स्वीकार केला आहे,तर तो प्रभु मला अपेश कां ह्मणून देईल!! असो. एवढी खटपट केल्यासारखें एकदांचें साधलें,नाहीं तर जीवावरच येऊन बेतायाची. कारभाऱ्यांच्या समोर उभा होतों, तोंपर्यंत हा ओळखील कीं काय अशा भीतीनें छाती सारखी उडत होती. पण चेहऱ्याला दिलेला हा रंग अन् धारण केलेलें हें मौनव्रत ह्या दोन गोष्टी फारच उपयोगी पडल्या,ह्मणून बरें नाहीं तर त्रेधाच उडायची. महाराजांच्या सन्निध असा मुका नोकर ठेवणें हें अर्थातच त्याला ज्यास्त सोईचें दिसलें; कारण उघडच आहे कीं, तेथें मग त्यांची मनमानेल तशी गांजणूक जरी केली तरी हा मुका कांहीं बोलणार नाहीं. दुष्टानें त्यांची सर्व चाकर माणसें बदलून टाकलीन् अं! आतां सगळे त्या कात्यायनीचे तर्फेचे नोकर. बरें. कांहीं हरकत नाहीं. मला त्यांत निवडला एवढी गोष्ट फारच चांगली झाली. अजूनपर्यंत तर कोणीं मला ओळखिलें नाहीं. थोरल्या आईसाहेबांना मात्र जरा संशय आल्यासारखें दिसतें. त्यांना एकदां एकांतांत भेटून ओळख द्यावी ह्मणजे

झालें. महाराज, आतां हा सज्जनसिंग आपली सेवाचाकरी उत्तम करील. नीचांनो, तुमच्या सर्व कृष्ण कारस्थानांचें उन्मूलन करण्याचा विडा ह्या बहादरानें उचलला आहे, हें पक्कें लक्षांत ठेवा. गांवांत तर ह्या संबंधानें आपण चळवळ सुरू केलीच आहे; शेवटीं याच चळवळींत आपण आपला राहिलेला कार्यभाग उरकावा ह्मणजे झालें; असो, आजचा दिवस मात्र हा वेष उघडकीस येण्याची जरा भीति आहे. करितां सावध राहिलें पाहिजे. उद्यां एकदां महाराजांच्या बरोबर किल्यांत प्रवेश केला कीं, निर्भय झालोंच; हें इकडे कोणसे येत आहेसें वाटतें. चला आपण येथून पळ काढावा झालें.

**प्रवेश सातवा**—लहानशा घराची पडवी.

[ एक स्त्री प्रवेश करते. ]

**स्त्री**—आज दोन दिवस त्या यमाच्या दाराशीं जाऊन गयावया केली, हात जोडले, पायां पडलें, डोळ्यावाटें अश्रु ढाळून त्याच्या नानातऱ्हेनं विनवण्या केल्या, पण त्या कसाबाच्या हृदयाला पाझर ह्मणून नाहींत नाहींच फुटला. मेल्याचं हृदय कसं दगडासारखं कठिण आहे. तें कोठून वितळेल ! एकदां जरी मला माझ्या लाडक्याला डोळेभरून नुसतं पाहूं देतां तरी माझ्या जिवाला केवढं समाधान झालं असतं ! पण तेवढं देखील त्या चंडाळानं करूं दिलं नाहीं. मग माझ्या बाळाशीं माझं बोलणं कुठचं होणार ! बाळा, दुखण्यांत दिखील मला तुझं दर्शन होऊं नयेन् ह्या

चंडाळांनीं तुझी माझी तुटातूट पाडावी ह्मणून कांरे तुला दत्तक दिला ! तुझ्या लहानपणीं आह्मीं किती कष्ट सोसले, गरीबी काढली, स्वतःचे हाल केले, पण सोन्या, तुला जीवापलीकडे बाळगला बरं ! जरा दृष्टिआड जर माझं बाळ झालं तर माझा जीव कसा कासाविस व्हावान् कावऱ्याबावऱ्या तुला मी शोधावा; पण एकदां कां सांपडलास ह्मणजे माझ्या हृदयाला सुखाचं जसं भरतं येई ! आजपर्यंत तूं सुखांत आहेस एवढं ऐकून न् कधींकधीं आपल्या डोळ्यांनीं पाहून मला समाधान वाटे; पण आतां लाडक्या, तूं आजारी असून ही माझ्या दृष्टीस पडणार नाहींसनारे ! तेंव्हां माझ्या पोटांत कसं कालवत असेल बरं. मी आपले दिवस कसेरे कंठू! तरी मी त्याचवेळीं ह्मणत होतें कीं, माझ्या बाळाला दत्तक नाहीं द्यायचा ह्मणून. पण माझं कोण ऐकतो; आतां मात्र मला ह्या दुःखडोहांत बुडावं लागणारना ! देवा, मला त्याचं द्रव्य नको, त्याचं राज्य नको, त्याचं वैभव नको, पण माझा बाळ मला पुनः परत दे ह्मणजे झालं. मी अशा हालविपत्तींत त्याच्या बरोबर मोठ्या आनंदानं दिवस काढीन, अन् त्याला काडीभर दिखील दुःख लागूं देणार नाहीं; पण माझं ऐकून कुणाला करुणा येईल! सोनुकल्या,तुला केव्हां पाहीनसं झालंय्रे. नाहीं; माझ्यानं नाहीं आवरत आतां हें दुःख. लोभानं पोटचा गोळा दत्तक देतांना नाहीं कांहीं वाटलं तर मग आतां तरी कां वाटावं! आयांनो,माझ्या सारख्या फसून अग्नींत उडी घालूं नका

बरं! (जमीनीवर पडते.) ( दोन नागरिक येतात. )

पहिला-(पुढे होऊन.) बाई तुह्मी अशा कां ओरडतां?

दुसरा-अरे त्या कांहीं संकटांत असतील ह्मणून रडत असतील.

स्त्री-[उठून] बाबांनो तुह्मांला काय सांगूं! तुह्मांला माहीत नाहीं कां कीं महाराज आजारी आहेत ते?

दोघे-[ एकदम ] होय, त्यांची छळणूक चालली आहे असें आह्मीं ऐकतों,

स्त्री-त्यांची मी सख्खी आई;मला त्यांना भेटूं देखील देत नाहींत, तेव्हां रडूं नाहीं येणार तर काय होईल!

दोघे-अरेरे, काय ह्या बिचारीला दुःख!! (जातात.)

## प्रवेश आठवा-लीलेची खोली.

[ लीला चिंतानिमग्न बसली आहे आणि पार्वती लुगडे चुणीत उभी आहे.]

लीला-पार्वति, कशाला त्या लुगड्याच्या निऱ्या करतेस! राहूं दे तें तसंच; त्या गांठोड्यांत दोन हल-कीशी पांढरीं पातळं असतील तीं काढ अन् त्याच्या निऱ्या करून ठेव ह्मणजे झालं.

पार्वती-[ ममतेनें ] हें काय बाईसाहेब, लुगडं नेसलं ह्मणून काय झालं.

लीला-अग, काय मला आतां लुगडं नेसून कुठें मिरवायचंय्! ज्यांच्या जीवावर सगळे थाटमाट करायचे त्यांच्याच जिवाला जर चैन नाहीं तर येवढं ल्यायला अन् करायला मला तरी बाई कसं बरं वाटेल! हें बघ,

आतां मी बेचाळीस दिवस उपास करणार आहें, आणि तुळशीला लक्ष प्रदक्षणा घालणार आहें. तोंपर्यंत साधी पातळंच नेसायाला ठेवीत जा. अन् पलंगावरचा बिछाना गुंडाळून त्या वरतीं दोन हरणाचीं कातडीं पसर, अन् चौघडीनीं घोंगडी पांघरायला ठेव ह्मणजे झालं.

**पार्वती**—बाईसाहेब, येवढं कडक व्रत आपल्याला कसं होईल.

**लीला**—अग् वाटेल तेवढे कठिण नेम मी सोशीन. देवाला संकट घालीन. तिकडे आराम पडावा ह्मणून कोणीं जे जे नेमधर्म सांगेल ते ते मी करीन. देवा, येवढं करून तरी दुखण्याला उतार पडो ह्मणजे झालं! (इतक्यांत मत्सरसिंग प्रवेश करतो.) कां भावोजी, आज संध्याकाळीं या वाड्यांतला सूर्य मावळणारना! पुन्हां केव्हां प्रकाशेल तो प्रकाशो! आजपर्यंत स्वारी इथें होती ह्मणून जरी भेट होत नव्हती तरी जीवाला अम्मळ आधार असे.

**मत्सरसिंग**—हो हो, हें काय विचारावें वहिनीसाहेब बरें घेतों मी आतां निरोप.

**लीला**—या बरं. आहांतच तुह्मी आतां जवळ. तुह्माला तिकडची प्रकृति माहीतच आहे; तेव्हां (गंहिवरून) नीट जपा, काळजी घ्या, जवळ. दुसरं कोणी ममतेचं नाहीं हें लक्षांत असूं द्या. झालं दुसरं काय सांगायचंय्.

**मत्सरसिंग**—बरें येतों. आपल्याला अगदीं रेसभर देखील काळजी नको. [ जातो पडदा पडतो. ]

## प्रवेश नववा—सतकुवरबाईचा महाल.

[सतकुवरबाई आणि मुका प्रवेश करितात.]

मुका—आईसाहेब आतां तर मजविषयीं आपल्याला शंका नाहीं राहिलीना?

सतकुवरबाई—छे रे सज्जनसिंग, अजून कसची शंका! पण बाई शाबास तुझी. तोंडाला काळं काय लावलंस. आणि मुका काय झालास. पण शेवटीं एकदाचा परत आलास.

मुका—तसं करण्याशिवाय मला दुसरा मार्गच दिसेना. आणि वाड्यांत आल्याशिवाय तर खरी बातमी कळण्याची दुसरीं कांहीं साधनं नाहींत तेव्हां असं करणं अवश्यच झालं. बरं पण आईसाहेब, मी आपल्याला सांगितलेल्या युक्तीची योजना करून एकदां तिला घाबरवा तर खरं म्हणजे तिच्या ह्या कारस्थानांना जरी खळ पडला तर पडेल.

सतकुवरबाई—आज मी खास करून पहातें बरं कां काय होतं तें.

मुका—कारण हें पहा, ह्यांचे हे कपटप्रबंध फार लांब थराला येऊन पोचले. आतां यांची उपेक्षा करतां कामा नये. एखादा रोग शरीराच्या अंतर्भागांत अगदीं परिपक्व दशेला येतो, तथापि त्याचीं बाह्य लक्षणं रोग्याला न कळल्यामुळं रोग एकदम उद्भवून अनावर होतो. तर तशा रोग्यासारखी जर आपली स्थिति आपण करून घेतली तर आपल्याला पूर्वी

चिन्हं कळण्याचा काय फायदा. ह्मणून वैद्यासारखं वागून व्याधीचें बीज जेथल्या तेथें चिरडून टाकण्याचा यत्न केला पाहिजे.

सतकुवरबाई—बरं पण हें बघ, तूं कोण, याचा महाराजांना एकदां गुप्तपणानं ओळख दे ह्मणजे तुझ्याशीं ते मोकळे मनानें बोलतील तरी. तुझ्याविषयीं आतां त्यांच्या मनांत कांहीं कपटभाव राहिला नाहीं, हें तर तुला माहितच आहे.

मुक्ता—कांहीं वेळ तें खरोखर अगदीं भ्रमांत असतात. तर अशा वेळीं त्यांच्याशीं कोणी बोलूं नये अशी मी व्यवस्था ठेवीन. शुद्धीवर असतात तेव्हां मात्र दुःखानं अगदीं निव्हल होतात. त्या वेळीं समाधान करायला मी आहेच.

सतकुवरबाई—खरोखरचरे, त्यांचं दुःखच तसं घोर आहे बरं! गादीची आशा रसातळास गेली. त्यामुळेंच त्यांच्या मनाला आधीं केवढा धक्का बसला अन् तशांत परवा लीलेला त्यांच्या महालांतून ओढून अगदीं बाहेर काढिली. त्यामुळें तर अधिकच माथं फिरलं. त्यांची दशा पाहून माझं हृदय कसं फाटून जातं तें!

मुक्ता—बरं मी येतों आतां. कोणी बोलतांना ऐकलं ह्मणजे पंचाईत व्हायची एखादी.

सतकुवरबाई—जा. पण त्यांना जीवापलीकडे जप. एवढंच तुला काय तें सांगायचं. ( जातात. )

## प्रवेश दहावा—ललिताबाईची खोली.

[ललिताबाई आणि मंजुळा प्रवेश करतात].

**मंजुळा**—(आरडून) अहो बाईसाहेब भूत! इकडे भूत तिकडे भूत हें पहा जिकडे तिकडे भूत.

**ललिताबाई**—(दचकून) हॅंग काय मेले! केवढ्यानं मी दचकलें, ती अंमळ हळू बोललीस तर.

**मंजुळा**—अहो लीलाबाईसाहेब भूत, आईसाहेब भूत, मी भूत, मी करूं तरी काय!

**ललिताबाई**—अग भूत भूत काय करते आहेस! वेड बीड तर नाहींना लागलं तुला!

**मंजुळा**—भूत पिशाच, पिशाच भूत, वेताळ सटवाई, सटवाई खंडोबा, भूत पिशाच वेताळ सटवाई लीलाबाई सगळीं त्यापैकींच.

**ललिताबाई**—मंजुळे काय असेल तें नीट सांग बाई. दर वेळेस कसचाग चावटपणा.

**मंजुळा**—अहो लीलाबाईसाहेबांच्या अंगांत सम्मन्ध आलाय् आजची ही चवथी वेळ. पुनः आला तर कळीव ह्मटलंत ह्मणून मी सांगायला आलें.

**ललिताबाई**—खरंच कांग पुनः अंगांत आलय्! काय बाई तरी पोरीनं बरेंच चार चार मांडले आहेन्. तों कांहीं बोलते कांग!

**मंजुळा**—तें नाहीं कांहीं मी पाहिलं. अंगांत भूत आलेलं पाहिलन् इकडेच आलें.

**ललिताबाई**—पण आलय् तरी कुठें!

**मंजुळा**—त्यांच्याच दिवाणखान्यांत अन् तेथें थोरल्या

बाईसाहेब नी गुरूजी बसले आहेत. दुसरं कोणी नाहीं.

**ललिताबाई**—चल तर सर्व पाहूं एकदां काय काय ढंग चालले आहेत ते. थांब ह्मणावं तुझं आज भूतच काढून टाकतें कसं तें.

**मंजुळा**—हा! तें झालं! घेरी येऊन पडला नाहीं ह्मणजे पुरें. (जातात.)

## प्रवेश अकरावा—लीलेची खोली.

[लीला अंगांत येऊन बसली आहे. पुढें कापूर ऊद जळताहेत, सतकुंवरबाई आणि एक भटजीबुवा बसले आहेत. मंजुळेसह ललिताबाई येतात.]

**लीला**—ह्या कुलटेचें मला मुखावलोकन देखील नको. (ललितेकडे पाहून) ही पहा येथें उभी आहे. हिला आधीं हाकून द्या. हिला पाहून माझ्या पायाची आग मस्तकांत जाते. हिचें एकेक कृत्य ऐकाल तर अंगावर कांटा येईल.

**ललिताबाई**—(मध्येंच मोठ्या जोरानें) कायग लीले, हे ढंग कसले मांडले आहेस! थांब, तुझ्या अंगांतलं बाहेर काढतें हो. (काठी उगारते तों लीला तिच्या तोंडांत मारते.)

**लीला**—मी लीला नव्हें. ज्याच्याबरोबर तुझें लग्न लागलें तो मी तुझा पति रामसिंह महाराज. वेश्ये, सतकुंवरपेक्षां तुजवर अधिक प्रेम केलें त्याचीं हीं फळें कां! माझ्या मागें सर्व कुळाचा नावलौकिक चांगला रक्षण करतेस!

ललिता—( घाबरून ) मी आपल्या आज्ञेबाहेर काडीभर देखील वागत नाहीं.

लीला—( ललितेकडे पाहते ) होय असेंच खरें. सतकुवरचा मत्सर करून गादीच्या वारसाचे हाल हाल करण्याकरितां ह्या सुंदर कायेचा विक्रय कर आणि त्या शिखानष्टाशीं रत हो असा माझाच उपदेश असेल! तुझ्या पापकर्मांनीं मला अशी पिशाचयोनी प्राप्त झाली आहे आणि रौरव नरकवास भोगावा लागत आहे. ह्या संस्थानरूपी वृक्षाचें उन्मूलन करण्यास तूं प्रवृत्त झाली आंहेस हें मी पूर्ण जाणून आहें. ह्या झाडाचे तूं हाल मांडले आहेस. आजपासून पंधरा दिवसांचे आंत तुला मी घेऊन जाईन. तोंपर्यंत ह्या लोकींच तुला यातना भोगाव्या लागतील. सतकुवर, लीला, तुम्हीं सुखानें नांदा. मी जातों आतां. ( लीला अंगाला पीळ देऊन किंकाळी फोडते. ललिताबाई बेसावध होतात. मंजुळा त्यांना सांवरते. )

मंजुळा—लीलाबाईसाहेबांच्या अंगांतलं गेलं न आमच्या बाईसाहेबांच्या अंगांत भूत शिरलं.

सतकुवरबाई—हेंग काय मंजुळे! चेष्टा करण्याची कां वेळ ही! ना त्यांना अगोदर खोलींत घेऊन. ( लीलेला बाजूस ) लीले, शाबास बाई तुझी! अग चांगलीच बतावणी साधली तुला! ( सर्व जातात. पडदा पडतो. )

( अंक चवथा समाप्त. )

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला—विद्याधरपंताची माडी.

विद्याधरपंत—( आपल्याशीं ) एकदां शंका फिटली येवढं बरं झालं. प्रत्यक्ष लेख सांपडल्यावर शंका घेण्याचें कांहीं कारणच उरलें नाहीं. शिवाय दुसरी कडून आपल्याला खातरीलायक माहिती मिळालीच आहे. आणि सध्या चालू असलेले प्रकार ह्या दोन्हीं गोष्टींची चांगलीच साक्ष देतात. तेव्हां आतां कांहीं हरकत नाहीं. पाहून घेऊं ह्यांच्या गमज्या आतां किती दिवस चालतात त्या. गुलामानो, तुह्मांला खड्ड्यांत घातलेंच ह्मणून समजा. बरे तावडींत सांपडलेत. आतां तुमचें साम्राज्य फार तर काय पण एक आठ दिवस देखील चालूं देणार राहीं. सगळीं आंडीं पिल्लीं बाहेर काढतों. आमचा बेत मात्र साधला पाहिजे. ह्मणजे दाखवतों काय मजा आहे ती. असो. ( इतक्यांत एक गृहस्थ प्रवेश करून नमस्कार करतो ) नमस्कार. या. बरे आलेत शामराव. तुमचीच मी वाट पहात होतों. पण येवढी रात्र कां केलीत?

शामराव—त्याचं असं झालं कीं, जरा अंमळ एके ठिकाणीं गाण्याला बसलों होतों तों झाली रात्र झालं. मला वाटलं तुम्ही देखील याल क्षणभर ऐकायला ह्मणून म्हटलं मग दोघे बरोबरच जाऊं.

विद्याधर०—अरे गृहस्था, तूं गाणं कसलं ऐकत बसला आहेस. हा शिरावर घेतलेला बोजा खालीं उ-

तरला पाहिजे हें तूं इतक्यांत विसरलास कीं काय. अरे बाबा, मला तर आतांशा झोंप नाहीं. केव्हां एकदां निर्विघ्नपणें पार पडेन असं झालंय. कारण आपल्याजवळ असा सबळ आधार असूनही जर आपण आपल्याच हिताकरतां खटपट केली नाहीं, तर आपल्या मुखावर आपणच माती टाकली असं ह्मटलं पाहिजे. आपल्या संस्थानचें नांव ह्या वेळेला राखलेंच पाहिजे. नाहीं तर नेहमीं आपले परकीयांच्याच अमलांत.

**शामराव**—पण मी नाहीं ह्मणेन तेव्हांना. मी तर दंड थोपटून तयार आहे. बरं, तुह्माला हवी होती ती माहिती मिळाली कां?

**विद्याधर०**—अरे काय प्रयास पडले तेव्हां कोठें थोडी बहुत माहिती मिळाली पण मिळाली अस्सल. प्रत्यक्ष महाराजांच्या एका प्रामाणिक मित्राकडून खात्रीलायक मिळाली. कसकसे व्यूह रचले आहेत, काय काय विचार सुरू आहेत हें सर्व इत्थंभूत त्यानं सांगितलन्. शिवाय त्याला सांपडलेलं एक पत्र देखील त्यानं माझ्या स्वाधीन केलं आहे.

**शामराव**—आणखी एखादं छिद्र पाडलंत कीं नाहीं?

**विद्याधर०**—अरे प्रत्यक्ष दिवाणाच्या हातचे लेख. त्याच्याच कारकुनाकडून मिळविले आहेत. शिवाय हल्लीं वाड्यांत काय काय धुमाकूळ चालले आहेत हें सर्व जगाला ठाऊकच आहे. तेव्हां ह्यापेक्षां आणखी दांडगं प्रत्यंतर तें काय पाहिजे!

**शामराव**—शाबास आहे ज्यदा तुमची. इतकी उठाठेव कोण असलाय करायला, तुह्मीच ती आपली करूं जाणें.

**विद्याधर०**—अरे शाबास ह्मणजे! वेळ पडली तर कैदेंत जाईन. पण एकदां लोकांचीं मनें हालवीन तर खरीं. अन् तें तरी कशा करतां? केवळ सत्याकरितां. एकदा कां एखादी गोष्ट करणं मी आपलं कर्तव्य मानलं कीं ती पाळा मुळा सकट खणून काढीन किंवा आपला देह अर्पण करीन. मागें सरण्याचं नांव देखील काढूं नको.

**शामराव**—वाहवा! याचं नांव तरतरीन् ह्याला ह्मणतात हिंम्या. मी पाहून ठेवलय् विद्याधरपंत, असा उत्साह असल्या शिवाय कांहीं देखील हातून व्हायच नाहीं.

**विद्याधर**—बरं, पण तुला सांगितलेली तयारी तूं केलीस कां गाणंच करायचा विचार आहे?

**शामराव**—वा वा, असं काय ह्मणतां! माझी जय्यत तयारी आहे. परवाच्या दिवशीं सकाळीं असे आठाच्या सुमारास अंबाबाईच्या देवळांत चारशें लोकांचा समाज हजर नाहीं झाला तर मला विचारा.

**विद्याधर०**—शाबास! असं तुमच्या सारख्या चार लोकांचे सहाय्य असल्यावर कार्य सिद्धीला काय उशीर. तर मग परवां लोकपक्षाचा बावटा उभा करायाचा. ईश्वर करो अन् ह्या संस्थानचं निशाण वाऱ्यांत फडकत राहो ह्मणजे झालं.

**शामराव**—ठरलं तर. आतां परवां सकाळीं देवळांत गांठ. (जातात.)

## प्रवेश दुसरा–दिवाणजींचा वाडा.

[ दिवाणजी आणि मुका प्रवेश करतात. ]

मुका–तेव्हां मी मुक्याचा वेश धारण कां केला हें आपल्याला उघड करून सांगितलं. माझं हृदय ह्या संस्थानच्या हिताकरतां कळकळत बरं, ह्मणून मी आपली येवढी अर्जव करण्यास तयार झालोय्. दिवाण साहेब, काय करतां याचा आपण पुनः एकवार विचार करा. भलत्यांच्या नादीं लागून आपण असलीं अघटित कर्मं करण्यास कां तयार होणार! आजपर्यंतच्या आपल्या कीर्तीकडे लक्ष द्या. संस्थानचे आपण पिढीजादे नोकर अहां. ह्या गादीच्या कल्याणाकरतां आपलेच वाडवडील कसे दक्ष असत ही गोष्ट आपण इतक्यांत विसरलां कां! उपकार फेडण्याचा हाच कां श्रेयस्कर मार्ग! हेंच कां पूर्वजांना शोभणारं आपलं इमान. आपल्या घराण्यांतील पुरुषांना स्वामिभक्ति शिकवायला कां हवी! स्वराज्यांत यवनांचं पाऊल शिरकेल हें पाहून आपलं अन्तःकरण नाहीं कां हळहळूं! महाराजांना आपल्या मुलाप्रमाणें आपणच वाढिवलतना! मग आतां त्यांचे हाल ह्याच डोळ्यांनीं पहाणं हें सहृदय माणसाचं शील कां! आपल्याच हातांनीं घाव घालण्यास हे हात तयार व्हावे कां! दिवाण साहेब—

दिवाणजी–पुरे पुरे. माझ्या मनाला अधिक बाण नको आतां मारूं. माझी कान उघाडणी चांगली

झाली. माझा संमोह गेला. तूं खरोखर महात्मा आहेस. मी तुला वाटेल तें सहाय्य करण्यास तयार आहें. सांगसांग, माझ्या हातून जें जें होईल तें तें मी करतों.

**मुका**—दिवाणसाहेब, बादशहाच्या हुकुमावरून आपण जी व्यवस्था केली ती तर मोडण्याचं आपल्या हातीं आतां कांहींच साधन नाहींना?

**दिवाणजी**—छे छे. तसं कांहीं आतां करतां येणार नाहीं. पण ह्या पुढें जर बादशहाचे आणखी कांहीं सक्त हुकुम आले तर ते मात्र मी तुह्माला दाखवीनन् मग तुमच्याच सल्लामसलतीनं नीट दिसेल तें करूं.

**मुका**—आणखी सक्त हुकुम ते आतां काय येणर? झालंय हें काय थोडं आहे.

**दिवाणजी**—तर मग मी काय करूं!

**मुका**—हें पहा महाराजांची जी छळणूक चालली आहे तींत खरोखर ह्मटलं ह्मणजे बादशहाचं कांहीं अंग नाहीं. लालासाहेबांनीं वाटेल तसे त्यांचे कान फुकले ह्मणून त्यांनीं हें आजपर्यंत असं विषतुल्य वर्तन केलं अन् आपण त्यांच्या सांगण्याप्रमाणं अम्मल करून त्यांना सहाय्य केलंत असंच कीं, नाहीं?

**दिवाणजी**—होय. पण पुढें काय.

**मुका**—तेव्हां आपण आतां दिल्लीस जायची तयारी केली पाहिजे.

**दिवाणजी**—आणखी?

**मुका**—आणखी बादशहाच्या कानावर सर्व खरी हकीकत घालून झालेल्या अपराधाबद्दल क्षमा मागितली

पाहिजेन् पुनः महाराजांना अधिकार द्यावा अशी परवानगी मिळण्याची मनापासून खटपट केली पाहिजे.

दिवाणजी—ठीक आहे. मी आतां निघायला तयार आहें.

• मुक्का—तों आम्ही इकडून तुम्हाला पाठवळ द्यायला तयार होतच आहों.

दिवाणजी—तें कसें काय?

मुक्का—आजपर्यंत झालेल्या दुष्कृत्यांचा खरा वृतान्त लोकांच्या वतीनें आम्ही बादशहा पुढें मांडणार आणि कोणीं कसं अधमपणाचं आचरण केलं आणि त्या पासून कसकसे अनर्थ ओढवले हें सर्व इत्थंभूत त्यांना कळवून दाद मागणार.

दिवाणजी—पण ह्याच्यांत माझ्यावर टपका येईलसं दिसतं.

मुक्का—छे. ती कांहीं भीति नको. तुम्ही फक्त हुकमाचे बंदे होतां त्याला तुम्ही काय कराल.

दिवाणजी—होय. असंच खरं. अन् मीहि पण असंच सांगेन.

मुक्का—तेव्हां आपण निघण्याची तयारी करा. आपल्या उच्च कुलाला शोभेल असंच हें वर्तन होईल. आपल्या ह्या दयालुत्वाबद्दल आपली लोकांत वाहवा होईल. उदारपणाबद्दल आपण सर्वांना पूज्य व्हाल. काम फत्ते करून या म्हणजे सर्व प्रजा आपली उपकारी होईलन् आपलं स्वागत उत्तम करील. महाराजांचे आपण आवडते सेवक व्हाल. येतों आतां.

**दिवाणजी**–ठीक आहे सज्जनसिंग. मी तुझा ऋणी आहें. तूं मला जागा केलास. आपल्या ह्या कार्यांत यश येईल अशी मी खटपट करीन. महाराजां विषयीं माझा जीव आतां तुटायला लागला आहे. कामगिरी बजावल्याशिवाय हें तोंड पुनः त्यांना दाखिवणार नाहीं. (जातात.)

**प्रवेश तिसरा**–किल्यांतील एक खोली.

[महाराज प्रवेश करतात.]

**महाराज**–(आपल्याशीं) अहाहा! काय ही मध्यरात्रीची वेळ!

ह्या वेळीं कलकल तो कुठें न कांहीं ।
शांतीचें प्रबलचि आधिपत्य राही ॥
कोणाला नच सुख दुःख ठावकें तें ।
अज्ञानस्थितिमय सर्व सृष्टि वाटे ॥ १ ॥
ह्या वेळीं सकळहि येथचा पसारा ॥
संसारा जन विसरूनि ह्या असारा ॥
निद्रेते वश असती तयांस सर्व ।
आहे हें जगत असत्य शून्य भाव ॥ २ ॥

बाह्य सृष्टींत जिकडे तिकडे अशी स्थिति असून, ईश्वरा, ह्या एकट्या प्राण्याच्याच अन्तःसृष्टींत मात्र शांततेचा लेश ही नसावा एवढा तुझा मी काय अपराध केलाय् बरं! ह्या तुझ्या सर्व राज्यांत शांतता कशी खेळत आहे. पशुपक्षादिकांचा शब्द देखील ऐकूं येत नाहीं; झाडाझुडपावरील पानही हालत नाहीं; पाणी

देखील स्थिर आणि गंभीर झालें आहे; मनुष्यमात्र निद्रेच्या अंकित झालें आहे, परंतु माझ्या मानसिक राज्यांत मात्र प्रबळ विकारांनीं अगदीं कल्होळ करून सोडला आहे. काय पण माझें हें सुख! जगांत ज्याला सुखाचं वारं देखील नाहीं, त्याला जगणं आणि मरणं ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच समजल्या पाहिजेत. ज्याच्या आयुष्याचे व्यापार जेवणं आणि निजणं ह्या दोनच क्रियांत मर्यादित झाले त्याच्या सुखोदधीला भरती आणि ओहटी येण्याचा संभवच नाहीं. ह्मणजे सौख्याचें अवलंबन आणि जीविताचें पोषण अशी जी आशा तिचाच विनाश झाला. तेव्हां मग कुठें तरी आपल्याला जायचं आहे, कांहीं तरी आपलं बरं व्हायचं आहे, हा जो मनाच्या प्रकृतीशीं एकजीव झालेला मंत्र त्याचा लोप होणार. ह्मणजे जीविताचं सत्वच नाहींसं झालं. तर मग जगांतील पसारा आटोपून परलोकाची वाट धरायला अशा प्राण्यानं तयार असलंच पाहिजे, परंतु वस्तुस्थिति अशी दिसत नाहीं. ज्याच्या काळजाला विषाप्रमाणें दुःख झोंबत आहे. तिरस्कृतप्रेमाच्या वेदना ज्याला टोंचीत आहेत, ज्याच्या गुणाला मान मिळत नाहीं, नीच लोकांचं ज्याला दास्य करावं लागत आहे, आईच्या विरहानं ज्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात आहेत, विश्वासघाताचे आरोप ज्याच्यावर येत आहेत, ज्याला काळापुढं गाय होऊन रहाव लागत आहे, असा मनुष्य देखील पुनः टक्के टोणपे खायला तया-

रच. तेव्हां वारा येईल तशी पाठ देणें, अनेक घोरसंकटें मुकाट्यानें सहन करणें, वाटेल त्या वेदना सोसण्यास तयार होणें, कोणत्याही प्रसंगीं धैर्य न खचूं देणें, एकंदरींत येईल त्या दुःखाशीं टिकाव धरणें ह्मणजे ह्यांतच मनाचा मोठेपणा आहे, असं हा प्राणी मानीत असला पाहिजे. किंवा परलोकांत तरी सुखाचें भाण्डार आहे कीं, दुखाचाच ठेवा आहे ह्याविषयीं पूर्ण अज्ञान असल्यामुळें परलोकगमनाची भीति वाटून त्याला तेथील स्थितीपेक्षां आहे ही स्थितिच बरी असें वाटत असलें पाहिजे. निद्रेमध्यें सर्व सुखदुःखांचा लय होतो ह्मणून निद्रावस्था बरी ही गोष्ट खरी; परंतु ती गाढ न लागतां स्वप्नें पडतील तर उलट त्रास मात्र व्हायचा. ह्मणूनच मरणरूपीं गाढ, अक्षय निद्रेची अवस्था प्राप्त करून घेण्यास मनाचा हिय्या करणें कठीण. कारण त्या निद्रेंत काय काय स्वप्नें पडतील ह्याचा तर्क करणें अशक्य आहे. परंतु मला असले विचार करण्याची गरज काय ? माझ्या प्रस्तुतच्या स्थितींतच हालविपत्तीचा कळस झाला आहे. आतां याहून अधिक दुःख तें काय असणार ! प्रत्यक्ष माझ्यासारख्याच्या आईची न माझी तुटातुट ! जिच्या मांडीवर बसलों तिला भेटण्याची मनाई ! बायकोवर तर दुसऱ्यांचीच, सत्ता ! तिच्याशीं समागम करणें ह्मणजे व्यभिचार करण्याचं पातक ! बंदिखान्यांत माशा मारीतबसणं ही आमची स्वतंत्रता ! कोंड्याचे पदार्थ हें आमचं पक्कान्न ! चाकरमाणसांच्या लाथाबुक्याखाणं ही आमची सेवा !

देवारे ! काय ही दशा ! आतां ह्यापेक्षां कष्टतर दुःख नाहीं! छे. कांहीं राहिलें नाहीं! तेव्हां आतां जी स्थिति येईल ती ह्यापेक्षां बरीच असली पाहिजे. ( उठून बाहेरील गच्चीवर जातात. ) मग आतां अक्षय निद्रेच्या चरणीं शरण जाऊन सर्व दुःखाचा अन्त करण्यास कां उशीर करावा ? ठरलं. [ इकडे तिकडे नजर फेंकून ] हे वनस्पतिनो, पक्षानो, हे जलचरानो तुमची शांतता आतां मला द्या बरं ! हा पहा मी तुह्माला भेटण्याकरताच आलों ? चाललो चाललों आं ! ( उडी टाकणार इतक्यांत मुका चाकर येतो. )

मुका-( धरून ) महाराज, काय ही ! आजची तिसरी खेप. एवढे जीवावर उदार कां झालां ? आतां आपली प्रकृति कशी सुधारत चालली आहे. आपल्याला अधिकार देण्याचा विचार पुनः घाटत आहे.

महाराज-मला नकोरे बाबा आतां अधिकार ! मला आतां यमलोक पहाण्याचा अधिकार द्या ह्मणजे मोठे उपकार होतील. सज्जन, अरे तुझ्या मनाप्रमाणं माझं मन असतं ह्मणजे मी वाटेल तें सहन केलं असतं. तूं आपला कसा दुःखांत देखील आनंदी! आनंद हीच तुझी संपत्ति. आनंद हाच तुझ्या जीवाचा आधार. अशीं मनोवृत्तीचीं दास न बनणारीं माणसं मला फार आवडतात. अशीं मला दाखीव ह्मणजे त्यांना मी आपल्या हृदय मंदिरांत बसवून त्यांची पूजा करीन. तुझ्या सारखं त्यांच्यावर मी प्रेम करीन. परंतु अशीं माणसं या जगांत फारच दुर्मिळ आणि

म्हणूनच या जगत्‌रूपी अरण्यांत जिकडे तिकडे काटेच भरलेले आहेत. आई नाहीं, बाप नाहीं, भाऊ नाहीं, बायको नाहीं, कोणी कोणाचं नव्हे. जो तो आपल्या इच्छेचा गुलाम होऊन राहिला आहे.

( पहारेवाला लालासाहेबांची वर्दी देतो. )

मुक्का—मी आतां बाहेर बसतो तर महाराज, ह्मणजे संशयाला उगीच जागा नको. ( जातो. )

( लालासाहेब मत्सरसिंगासह प्रवेश करतात. )

**मत्सरसिंग**—महाराज, बादशहांच्या हुकुमावरून लालासाहेब आपल्या समाचाराकरतां आले आहेत. आपल्या प्रकृतीला जरा आराम पडेपर्यंत इथेच मुक्काम करण्याचा त्यांचा मानस आहे.

**महाराज**—ते आमचा समाचार कधींच घेऊन चुकले आहेत. आतां आणखी तो काय घेणार !

**लाला०**—कसं काय आहे महाराज ?

**महाराज**—आमच्यावर आपली कृपा आहे हें केवढं सुदैव !

**लाला०**—आपण आईसाहेबांचं मन फार दुखावलत ह्मणून समजतं.

**महाराज**—आपण आईसाहेबांच शरीर फार दुखावलत ह्मणून समजतं.

**लाला०**—अस वेडगळ उत्तर काय देतां.

**महाराज**—असले दुष्ट प्रश्न काय करतां.

**लाला०**—आह्मी काय असं केलय् ?

**महाराज**—आपण रमणीय बागेतील मधुर गुलाबां-

चीं झाडें खणून त्यांचे जागीं काटेरी झाडें लावलीत. पवित्र श्रीभवानीच्या देवालयांत पापमूर्तीची स्थापना केलीत. मातृसौख्याचं तारूं वादळांत खडकावर आपटून त्याचे तुकडे तुकडे केलेत. धर्मप्रणीत संबंधाला व्यभिचार असं नांव ठेवलत. स्वतंत्रतेची मूर्ति छिन्नभिन्न केलीत. मुत्सद्दीपणाची व्याख्या कसाबीपणा अशी केलीत. सुग्रास अन्नांत विष कालिवलत. पुंण्याला पाप अशी संज्ञा दिलीत. विनयाच्या धवल शोभेवर काजळ सारीवलत. न्यायसूर्याला ग्रहण लावलत. देवादिकांच्या राज्यांत दुष्ट मनोविकाररूपी पिशाच्यांच्या बण्डाची उठावणी केलीत.

**मत्सरसिंग**–काय भ्रम हा !

**लालासाहेब**–आपण शुद्धीवर अहां कां ?

**महाराज**–खरोखर शुद्धीवर असलं ह्मणजेच झटकन् लालासाहेबांच बाप बनतां येतं. महाराजाला मुलगा करतां येतं. आईची प्रिया होते. प्रियेची आई होते. ह्यापेक्षां शुद्धीवर असण्याचे आणखी फायदे ते काय असणार ! हे फायदे ज्याला करून घेतां येत नाहींत तो अर्थात वेडा. अगदीं शुद्ध खुळा. ( बडबडत जातात. )

**लालासाहेब**–मत्सरसिंग, हें प्रकर्ण फार लांबणीवर जाऊन पोहोंचलं. ह्याचा एकदां लवकरच समाचार घेतला पाहिजे.

**मत्सरसिंग**–मी आतां फार दिवस लोंबत ठेवीतनाहीं. अगदीं आटपतं घेतो. आपण बेफिकीर रहा. (जातात.)

## प्रवेश चवथा–किल्यावरील पहारा.

[ दोन पहारेकरी प्रवेश करितात. ]

**पहिला**–कोण ? दयाळसिंग ! बरं झालं वेळेवर आलास.

**दुसरा**–गुलाब, आण इकडे आण. ( त्याच्या जवळून पट्टा आणि तरवार घेतो ) उजाडलंच आतां. किती ? सहा वाजले असतील. तूं नीज आतां. मी पहारा करतो. कायरे तुझ्या पहाऱ्यांत कांहीं गडबड-बिडबड झाली नाहींना ?

**पहिला**–छेरे, चिटपाखरूं देखील इकडच तिकडे हाललं नाहीं. मध्यान्हीच्या सुमारास मात्र महाराज त्या गच्चीवरून खालीं उडी घेत होते तों त्या मुख्यानं त्यांना सावरलन्.

**दुसरा**–बरं. आणखी कांहीं ?

**पहिला**–माझ्या पहाऱ्यांत आणखी कांहीं एक झालं नाहीं.

**दुसरा**–तर मग महाराजांनीं एका पहारेकऱ्याची तरवार हिसकावून त्याला जखम केली ह्मणतात तो कोण पहारेकरी होता ?

**पहिला**–हं हं तो ग्यानु. तो पहा कसा दारूनं धुंद होऊन तारवटलाय् तो. अरे हे लेक सदा दारून झिंगलेले. ह्यांच्या हातून पहारा नीट व्हावा कसा. ह्यांचं नेसतं धोतर कोणीं सोडून नेलं तरी ह्यांना दाद नाहीं. असले हे शूर शिपाई. ह्यांच्यापेक्षां बायका देखील चांगला पहारा करतील.

**ग्यानु**-(पडल्या पडल्या) काकार शिशिशिगिच्यो, फाफारस त्वात्वात्वांड सोडलया. काकाका आआम्ही काका शूर ककमी आऱ्हं कां. तुतुतुम्ही बी नाय् दादारू पेत.

**पहिला**-हें बघ ग्यान्या, ज्यास्त बोलशील तर गर्दन छाटीन. लेका, आम्ही दारूं ह्मणजे शेतखान्यांतलं पाणी समजतों बरं कां.

**ग्यानु**-(धोतर सांवरीत) काकार मुममुरदाडो अन् तसं तुह्मीं पेपेतांना. अअक्षि ललई सूसूर तुम्ही म्हम्हम्हुन्शान् आआमचं गगरदान् उउउडिवताऱ्हय. पपपावुद्यातसई. (उठण्याचा यत्न करतो. इतक्यांत पहिला त्याला वर उचलून खाली आपटतो) तीतीती मामाझी ततरवावार कुकुठशी हाहाय्रे. थांथांव शिशिशिगिच्या तुतुझी दददादीच काकाट डालतों. (दोघांची झोंबी लागते. इतक्यांत एक वेडी प्रवेश करते.)

**दुसरा**-( तिचेकडे पाहून ) काग ए बाई कुणीकडे चाललीस ?

**वेडी**-(हात पसरून) दाखवा माझा ॥ मीझा बाळ माला ॥ कोणी चोरुनिया नेला॥ मारिती त्याला॥त्याला लाडक्याला ॥ पहा किती तरी छळिला ॥ पोटचा गोळा ॥ गोळा रडत बसला ॥ चला करूं उगी त्याला ॥

**दुसरा**-काय बाई याचा अर्थ तरी काय ?

**वेडी**-दावुं मी कैसें ॥ कैसें प्रेम त्याला ॥ जाऊं द्या मला भेटण्याला ॥ कसाहो वेडा ॥ वेडा त्यास केला ॥ परत द्या पुनः कसा मजला ॥ माझिया कंठीं ॥

कंठीं जीव आला ॥ तरी दया न मांगाला ॥

**दुसरा**—कारे गुलाब् ही वेडी कोण आहे?

**पहिला**—अरे ती दररोज सकाळीं अशीच येते. कोण आहे कुणाला ठाऊक. मात्र संध्याकाळपर्यंत येथून अगदीं हालत नाहीं.

(चाल—सहाजणीसू.)

**वेडी**—माझ्या सोन्याला ॥ माझ्या सोन्याला ॥ आगीमध्यें ढकलूनि कोणीहो दिला ॥ येरे ये बाळा ॥ येरे ये बाळा ॥ सोसेल कैसा आगीचा गोळा ॥ जाऊं द्या मला ॥ मारिन मिठि मी लाडक्या तुला ॥

(पहाऱ्यावर उडी टाकते. पहारेकरी वार करतो. मरते. पहाऱ्यावर गलबा होतो. मुका प्रवेश करतो.)

**मुका**—(वेडीकडे पाहून) हा माउलि ! शेवटीं तुझा असा दुःखकारक अन्त व्हावाना ! आपल्या लाडक्या मुलाकरतां धायधाय रडलीस तरी तुझीन् त्याची भेट झाली नाहीं ती नाहींच ! पुत्रमोहानं वेड लागलं ! वेड्यासारखी रस्तोरस्तीं बडबडत फिरलीस तरी तुझी दया तर कोणाला आली नाहींच, पण उलट त्याच वेडानं तुला मृत्युमुखीं अर्पण केलन्! हाय हाय! काय हें आमचें दुर्दैव! अभिषेकसमयीं महाराजांना आनंदाश्रूनीं तूं न्हाण घालण्याचा महोत्सव आम्ही पहायचा तो उलट दुःखाश्रूंनीं त्यांनीं तुला तुझ्या मरणकाळीं स्नान घालण्याचा प्रसंग पाहण्याचं आमच्या कपाळीं यावंना ! असो. कपाळीं आलं तें कर्तव्य मानून केलंच पाहिजे. आपला मुलगा दत्तक देण्याबद्दल

देवानं तुला शेवटीं चांगलीच शिक्षा दिली आं! (प्रेत पडद्यांत नेतात. जातो. पडदा पडतो.)

## प्रवेश पांचवा—लीलेची खोली.

[लीला पलंगावर पडली आहे. पार्वती उभी आहे.]

**पार्वती**—बाईसाहेब! पुरे हो आतां हें रडणं. रडून रडून डोळे पहा कसे लाल झाले ते. डोळ्यांच्या अगदीं मुठी वळल्या! या उपासातापासांनीं अन् ह्या कडक नेमांनीं शरीर पहा कसं सुकून गेलं तें! अगदीं आतां हडंन्हडं दिसायला लागली.

**लीला**—पार्वति! आतां हें माझं रडणं कधींही टळायचं नाहीं. देवानं तेंच आतां जन्मभर माझ्या मागं लावलयन् बरं! अग मी करूं तरी काय! पोटांत तुटून तुटून दुःखाचे उमाळे येताहेत ते आवरतील तरी कसे! आंत कशी आग झाली आहे. एकदां पोटभर रडरड रडलें ह्मणजे जरा बरं तरी वाटेल.

**पार्वती**—पण जीवाचे किती हाल होताहेत ते पाहिलेत कां!

**लीला**—अग आतां मला सुखांत राहून करायचय् काय! तिकडे त्या चंडाळांनीं काय काय हाल मांडले असतील त्यानं काय अवस्था झाली असेल बरं! हें बघ, मी अगदीं आतां मरायला तयार आहे, पण हे प्राण कसे आंतल्या आंत गुटमळताहेत ते मेले जाईनात परते! एकदां नुस्ती ती मूर्ति या डोळ्यांनीं पाहूं दे ह्मणजे मी सुखानं मरेन. इकडे उपास केले, कडक

नेमधर्म केले, नवस बोलले तरी तिकडे-ह्मणून आराम नाहीं तो नाहींच, नारायणा! तुझ्या मनांत काय तरी आहेरे!! पार्वति, आतां माझी खास आशा सोड.

पार्वती–बाईसाहेब, असं अशुभ काय बरं बोलावं!

लीला–अग आतां सगळं शुभच आहे. माझ्या मागून तिकडे असं कळीव–अगदीं जपून कळीव बरं, नाहीं तर बाई धक्का बसेल आं–कीं आपली ही दुर्भाग्यी बायको विरहानं शोक करून करून मेली. तिची शेवटली इच्छा एवढीच होती ह्मणावं कीं,ती मेली तरी दुसरी करायचं होऊं नये अन् तिजवरच् प्रेम करावं ह्मणजे स्वर्गांत पुनः दोघांची भेट होईल! तेथें आपण सुखानं नांदूं. एवढं खचित कळवशील ना पण! माझी तुला शपथ आहे आं. देवा! आतां मला सोडीव ह्या यातनातून एकदां. एवढं माझं सौभाग्य रक्षण कर ह्मणजे सुटलें!

पार्वती–बाईसाहेब, नकाहो असं बोलू! (इतक्यांत सतकुवरबाई प्रवेश करतात.) आईसाहेब ह्यांना आपण तरी दोन गोष्टी सांगाव्या.

सतकुवरबाई–बाई लीले, आतां पुरेहो तुझा शोक. आज किल्यावर खचित जायचं बरं. ऊठ तर आतां अन् आंग धू कशी.

लीला–( उठून बसते ) खरंच कां पण जायच! ह्या दळभद्रीला तिकडचं दर्शन होईल कां पण! मला असा सोन्याचा दिवस उगवेल कां देवा!

सतकुवरबाई–अग आज खाचित महाराजांची भेट

होईल बरं. सुजनसिंग रात्रीं बारा वाजतां येईल अन् आपल्याला अगदीं चोरवाटेनें तेथें नेईल. मग पहाटेस आपण परत येऊं. झालंना आतां तुझ्या मनाप्रमाणं?
(सर्व जातात.)

### प्रवेश सहावा.—अंबिकेचे देवालय.

[नागरिकांचा समाजापुढें दोन वक्ते प्रवेश करितात.]

**पहिला**—तेव्हां येथपर्यंत मी आपल्याला जो दुःखकारक वृतान्त सांगितला आणि भयंकर कृष्ण कारस्थानांचें जें विवरण केलें तेवढ्यावरून आपल्याला या मत्सरसिंगाच्या नीच आणि क्रूर स्वभावाची कांहींतरी कल्पना करतां येईल. ज्या शुद्ध, पवित्र, पुण्यवती, धर्मपरायण, पतिव्रतेचें नख देखील मोठमोठ्या सदाचारसंपन्न पुरुषांच्याही दृष्टिगोचर होणें कठीण, त्याच पतिव्रतेला दीड दमडीच्या हलकट चाकरमाणसांकडून प्रत्यक्ष तिच्या पतीपासून एकांताचा भंग करून फरफरत ओढीत आणविणें आणि त्या साध्वीची विडंबना करविणें, सख्या आईपासून प्रिय बालकाची तुटातुट करणें, सप्रेम, उत्साहवान्, तीव्रवीर्य, कोमल मनाच्या अशा राजपुत्राला कारागृहांत लोळत पडण्याचा प्रसंग आणणें, आणि एवढें सर्व केवळ मत्सरजन्य राज्यतृष्णेला वश होऊन करणें,—इत्यादि गोष्टींवरून ह्या गृहस्थाचें हृदय कसें फत्तरासारखें असेल आणि अशा हृदयाच्या तुच्छ आज्ञा अंमलांत आणण्यास ह्याचे लोखंडाचे हात कसे वाहले असतील हें शब्दांनीं व्यक्त

करून दाखविणें खरोखर अशक्य आहे. परंतु आरोप असा आहे कीं, महाराज वेडे झाले. तेव्हां खरोखर महाराज वेडे झाले कीं, त्यांना मत्सरसिंग, ललिताबाई, लालासाहेब, ह्या त्रिकुटाच्या कसाबीपणानें वेडे केलें ह्या गोष्टीचा निर्णय आपणच करा. आपल्यापैकीं प्रत्येकाला बायको आहे, प्रत्येकाला आईबहिणीही असतीलच. तेव्हां आपल्याला अशा विपत्तिकारक स्थितींत ठेवून निर्दयपणानें जर आपली गांजणूक सुरू केली असती तर आपण काय केलें असतें ह्याची कल्पना करा आणि मग आपल्या कोमल हृदयांत काय काय वृत्ति उठतात त्यांची प्रतीति घ्या. आपण कोण अहां हें आपण विसरलां नसाळच. मित्रहो, पूर्वकालीं ज्यांनीं आपल्या स्वामीकरतां आपले स्वतःचे देह धारातीर्थीं ठेविले, अतिशय कोमल अशीं प्रेमबंधनें तोडून ज्यांनीं केवळ स्वतंत्रता मिळविण्याकरितां रणांगणें आपल्या रक्तानें न्हाणिलीं, ज्यांनीं आई मारली, बायकोला यमलोकीं पाठविली, लहान लहान रमणीय बालकांचे देह अर्पण केले, आपण स्वतः मृत्युमुखीं बळी पडले, परंतु जे कधीं शत्रूला हार ह्मणून गेलेच नाहींत; ज्यांच्या कीर्तीचे झेंडे सर्व देशभर फडकत आहेत, ज्यांच्या शौर्याचें नांव काढतांच यवनांच्या तरवारी गळून पडत, ज्यांच्या पराक्रमानें हा सर्व राजपुताना दणाणून गेला, असे जे आपले शूर पूर्वज त्यांचेच आपण वीरवंशज अहां. तेव्हां सांप्रत आपल्या राजपुत्राला जे हाल काढावे लागत आहेत ज्या वि-

पत्ति भोगाव्या लागत आहेत, जी छळणूक सहन करणें भाग आहे, ज्या यमयातना सोसण्याचें कपाळीं आलें आहे, त्या सर्व दुःखांतून त्याची मुक्तता आपण जर न केली तर आपण आपल्या पूर्वजांला शोभणारे पुत्र नव्हें असें ह्मणणें भाग आहे ! तर हा जो आपल्या धवल कीर्तीवर येणारा नित्य कालिमा तो धुवून टाकण्याची जर आपली मनापासून इच्छा असेल, जर स्वराज्याची आपल्याला खरी किंमत कळत असेल, स्वातंत्र्यसुखाची जर आपल्याला गोडी असेल, आणि असत्याचा जर आपण तिटकारा करीत असाल, तर कंबर बांधा आणि दिल्लीच्या बादशहाकडे दाद मागण्यास तयार व्हा; आणि ह्या पापी, दुष्ट मनुष्याधमांच्या कपटप्रबंधांचा बमोड करून आपल्या महाराजांना स्वतंत्र आणि सुखी करा ह्मणजे ही अंबिका तुमचें कल्याण करील.

**लोक**—वाहवारे वाहवा ! हा ह्मणतो तें अक्षरशः खरं आहे. असं केल्या खेरीज कांहीं गति नाहीं. शिवशिव ! केवढं अरिष्ट हें ! !

**दुसरा**—मित्रहो, मी आपल्यापुढें जो उभा राहिलों आहें, तो स्वतःच्या वक्तृत्वानें आपलीं मनें आकर्षून घेण्याकरितां किंवा आपल्यामध्यें बंडाची उठावणी करण्याकरितां नव्हें. तर ह्या अनीतिप्रवर्तक मत्सरसिंगरूपी कलीच्या काळ्या कृत्यांचं आविष्करण करून सत्य आणि न्याय ह्यांचें पुनरुज्जीवन करण्यास आपली मसलत आणि सहाय्य घ्यावें एवढाच माझा

उद्दिष्ट हेतु आहे प्रस्तुत व्यवहारांत कांहीं भाग इतका बिभत्स आणि अश्लील आहे कीं, त्याचा नामोच्चार करण्यास तिटकारा येतो. ह्या अधमानें, ह्या मनोभावशून्यानें, ह्या मानवीधर्मभ्रष्टानें ज्या बंधनांचा विच्छेद केला त्या बंधनांच्या पवित्रते विषयीं सविस्तर निरूपण करणें ह्मणजे पुनरुक्तता होईल. ज्या समाजापुढें मी उभा आहे त्या समाजांत जो आपल्या नेत्रांनीं असल्या पाशव आचरणाची निर्भर्त्सना करीत नाहीं आणि अशाबद्दल दंड झालाच पाहिजे असें ज्याचें मन सांगत नाहीं असा एकतरी मनुष्य आहे काय! पितृवात्सल्य हें समाजाचें आदिबंधन आहे. हे प्रकृतिसिद्ध तत्व आहे. ह्या तत्वानें यथार्थ कल्याणाचा अभिलाष उत्पन्न होतो आणि मनुष्याचें प्रत्येक इंद्रिय आणि चेतना हीं सांत्वन पावतात. हें वात्सल्य अशा प्रकारची कृतज्ञता आहे कीं, जिचा लघूकृत अर्थ स्मरण केलेलें हित असा आहे आणि ज्याच्या योगानें मनुष्य संतत उत्कंठा प्रशंसनीय आत्मसंयमन, जीवसंरक्षक चिन्ता, इत्यादिकांकरतां झालेले उपकारऋण स्मरण्यास उत्सुक असतो, पण अहाहा! तें अनन्त, अमर्यादित ऋण त्याच्यानें कधींही फिटलें जाणार नाहीं. हें वात्सल्य आपल्या वर्तनातला असा भाग आहे कीं, जेथ कर्तव्य आपली उग्रता विसरते, जेथें पूज्य बुद्धी संस्कारानें प्रेमरूप होते; जेथें स्मरणशक्तीचें सहाय्य नको, जेथें विचारपद्धतीच्या अनुमानांची गरज नाहीं, जेथें नीतिनिर्बंध असो किंवा मानवी नियम असो, पितृवात्स-

ह्याचें प्राधान्यच आहे. हें मनुष्याचा पहिला मोठा अधिकार आहे. मनुष्याच्या अतिशय रमणीय उत्साहावर ह्याचा अम्मल आहे. हें आपल्या स्वभावाला संस्कृत करतें. हेंच वात्सल्य यावेळीं प्रत्येकाच्या ओष्ठप्रांतावर हलतेंसें दिसत आहे. हेंच सर्वांच्या नेत्रांत चमकत आहे! ह्यापेक्षां अधिक दृढ, विशेष कोमल, रमणीय, असें प्रियानुरागाचें बंधन आहे. ह्या बंधनांत असमतेचें अस्तित्व हानिकारक आहे. ह्यांत नीति आणि न्याय ह्यांचेंच प्राबल्य असतें. विश्वास आणि शुद्धता ह्या दोन गोष्टींत ह्याचा पाया आहे. मनोरमता ह्याचें पोषण करते. संशय आणि कपट हीं ह्यास विघातक आहेत. सर्व बंधनांत हें पवित्रतम आणि श्रेष्ठ आहे. तेव्हां वात्सल्य आणि प्रियानुराग अशीं जीं दोन अत्यंत दृढ आणि अतिशय नाजुक बंधनें त्यांचे टाके ह्या यमकिंकरानें अगदीं ढिले करण्याची खटपट केली. आपल्या मनोवासना तृप्त करण्याकरतां एकल्या महाराजांच्याच काय पण सर्व संस्थानच्या सुखावर आणि स्वातंत्र्यावर ह्या चंडाळानें माती टाकण्याचे बेत केले. आपणा सर्व रजपूत लोकांचा अशा कृत्यांनीं ह्यानें अपमान केला. आपल्या कायदेकानूंची पायमल्ली केली. आपला धर्म तुच्छ मानला. ह्या संस्थानच्या नावलौकिकाला ह्यानें कलंक लावला. आपल्या अधिकाराचा ह्यानें अयोग्य उपयोग केला. संस्थानच्या गादीच्या वैभवाचा ह्यानें धिःकार केला. सर्व लोकांच्या दहशतीची किंमत कवडीमोल केली आणि बादशहाल

खोट्या बातम्या देऊन संस्थानच्या अधिपतीवर अरिष्ट कोसळविलें! तेव्हां ह्याचें सर्व करणें न्यायाला आणि नीतीला अनुसरून होतें असें ह्मणणें ह्मणजे न्याय आणि नीति ह्यांची थट्टा करण्यासारखेच नव्हें कां! मित्रहो, अशा ह्या तमाशाला आपण न्याय अशी संज्ञा कधीं देणार नाहीं अशी माझी खात्री आहे. न्याय ह्मणजे कांहीं पंगु आणि दीन पदार्थ नाहीं, किंवा निराशेची दुश्चिन्हकारक अशी छाया नाहीं. न्यायाची खरी मूर्ति ह्याहून फार भिन्न आहे. ही पहा. आपल्यापुढें न्यायाची महनीय आणि पवित्र अशी मूर्ति उभी आहे! मनुष्याच्या आत्म्यांत आणि आकांक्षेत जें कांहीं ह्मणून पूर्ण होणें शक्य असेल त्याची ही तात्विक कल्पना आहे; जेथें मन उन्नत होतें. हृदय विस्तृति पावतें. जेथें मुद्रा सदा सौम्य आणि भव्य रहाते. जेथें दैवहीन लोकांपुढें लीन होणें, त्यांची दाद घेणें, त्यांना सहाय्य करणें आणि दुःखमुक्त करणें, ह्यांच्यातच त्या मूर्तीची आवडती वृत्ति आहे. क्षमाशीलतेमुळें जी मूर्ती राजश्रीविराजित आहे. उपयुक्ततेमुळें जी पूज्य आहे. गर्वाशिवाय जी उच्चस्थानीं आहे. दुराग्रहाशिवाय जी स्थिर आहे. उपकार करण्याविषयीं जिला सदा अभिरुचि आहे. सभ्रूभंग असूनही जी मनोज्ञ आहे. अशी ही जी न्यायदेवता तिचें पुनरुज्जीवन करून तिची संस्थापना करणें हें आपणा सर्वांचें कर्तव्य आहे आणि तें बजावण्यास आपण उत्सुकतेनें सिद्ध झालेंच पाहिजे. शेवटीं आपल्याला या कृत्यांत यश येवो अशी

श्री भवानीची प्रार्थना करून मी पुरे करतों.

**पहिला नागरिक**—शाबास याची! आज ह्यानें मोठ्या धैर्यानें सर्व काळेंबेरें बाहेर काढलें.

**दुसरा**—त्या पहिल्या बोलणारापेक्षां हाच अधिक धीट दिसतो.

**तिसरा**—काय बुवा आपल्याला तर ह्याचं बोलणं चांगलसं कळल नाहीं.

**चवथा**—अरे बोलणार असावा तर असाच असावा. सगळ्यांना बोलणं समजलं मग काय राहिलं!

**तिसरा**—अरे ह्याला आपला पुढारी करावा.

**पहिला**—ह्मणूनच मी त्याची स्तुति केली.

**दुसरा**—मग मी त्याला. व्यर्थच का धीट ह्मटलं?

(इतक्यांत चार संत्री प्रवेश करतात. दोन्ही वक्त्यांना कैद करतात. धक्के मारून ओढून नेतात लोकांत जिकडे तिकडे गलबा सुरू होतो.)

**पहिला**—अरे धरा ह्या शिपुर्ड्यांना! पुढें व्हा पुढें व्हा.

**दुसरा**—पाडा त्यांनां पालथे अन् मारा पाठीवर लाथा!

**तिसरा**—अरे बांधा त्यांच्या मुसक्या!

**चवथा**—अरे घ्या त्यांचा सूड. (सर्व निघून जातात.)

**प्रवेश सातवा**—लालासाहेबांचा तंबू.

[ लालासाहेब आणि बरळत पडलेली ललिताबाई प्रवेश करतात. ]

**लालासाहेब**—( स्वतःशी ) कुणाला न जुमानतां हिला येथें आणलीन् औषधोपचार सुरूं केले तरी

दुखणं फारच विकोपाला गेलं. आतां आवरणं कठीण दिसतं! त्या लीलेच्या अंगांत तें काय आलंन् हिनं धास्ती ती काय घेतली. शेवटीं परिणाम फार वाईट होणार झालं!!

ललिताबाई–( बरळत ) नकाहो नका आतां मला छळूं. ही पहा मी आपल्या मागून यायला तयारच आहे. चला प्राणनाथ, मला घेऊन चला. मी मुकाट्यानं येतें. पण मला आतां भेवडवूं नका. मी आपल्या पाया पडतें. मी अगदीं गाय झालें आहें. अगाईग! (मोठ्यानं किंकाळी मारते) किती विद्रुप भूत हें! आणि कसं काळं काळं कभिन्न दिसतयन् दाताचे सुळेच तेवढे पांढरे फटफटीत. इयै-अरे देवारे-धावा कुणी. हें माझ्या मागच लागलं. हें बघा ह्या भिंतीवर. हें पहा त्या दारा मांगं लपलं! हा मला मारायला धोंडा उचललान्. ( आरडते ) नको नको. मला अशी मारूं नकाहो! मी खुषीनं यायला तयार आहे. प्राणनाथ, हें असं कधींपासून आपलं अक्राळ विक्राळ रूप झालं. अयायाई नकाहो मला मिठी मारूं. अरे देवारे देवा, सोडीव मला ह्या यातनांतून. पंधरा दिवसांच्या आंत न्यायची बोलींना? मग अजून मला कां नेत नाहीं. पुरे नाहीं कां झाले माझे हाल. (एकलसं करून) काय! नेतोंच आतां तुला. न्या तर मग. उशीर कशाला हवा. पण फिरून हें पहा माझ्या पलंगावर चढलं. सोडवाहो सोडवा मला कोणी. अगबया! अगाई! अरे देवा! आतां करूं तरी कसं.

लालासाहेब–प्रिये, अशी बरळतेस काय. अजून मनाची भीति नाहीं कां जात. मी तुझ्या जवळ बसून सर्व ऐकतोय्. इथें कुठें भूत नाहीं. तूं हा मनाचा संशय सोड म्हणजे पहातों भूत कसं दिसतय् तें.

ललिताबाई–कोण! तुम्ही कां बसला अहां. मग त्या पिशाच्याला घालवून नाहीं कां देऊं. हें पहा पुनः आलं. माझी मानगुटी दाबूं नकोरे!

लालासाहेब–तूं घाबरूं नकोस. येथें माझ्याशिवाय कोणी नाहीं. आज औषध घेतलं कां नाहीं अजून?

ललिताबाई–मला नको तें औषध. मत्सरसिंगानं काल तें दिलन् तेंव्हांपासून तें माझ्या पोटांत अगदीं झोंबतय्. सारखं कालवतय्. अर्ध घेतलं तोंच इतक्या वेदना होताहेत कीं जीव जातो कीं रहातो असं झालंय्.

लालासाहेब–बाकीचं अर्ध कुठें आहे. फेकून दिलं कीं काय?

ललिताबाई–तें आहे त्या बाटलींत.

लालासाहेब–(बाटली पहातो) (बाजूस) काय घातहा! दुष्टानं विष दिलन् कीं हो विष दिलन्. हरामखोरा, थांब तुझा सूड उगवीन तरच राहीन. तरी ह्या गोड बोल्याचा मला नेहमीं संशय येई. खास मरणार! आतां कसली ही जगते. तथापि उतारा देऊन पहावा. (तिला) प्रिये, मी आत्ता दुसरं औषध आणतो आं. त्यानं पहा तुझा जीव कसा थंड होईल तो. (जातो.)

ललिताबाई–मी आतां औषध म्हणून घ्यायची नाहीं. आंगाचा कसा दाह झाला आहे. कोण आगही!

प्राणनाथ,न्या मला लवकर ह्मणजे सुटलें मी एकदाची. मग मला हें भेवडावणं नको न् हें भूतही नको. (किंकाळी मारते) अगबाई आलंग आलं, पुनः छातीवरच बसलं. अगबया ! इथें आहे कां कुणी. मंजुळे, इथें येऊन बैस तरी. ( पडदा पडतो )

## प्रवेश आठवा–किल्यांतील खोली बाहेरचा सज्जा.

[ मत्सरसिंग प्रवेश करतो. ]

**मत्सरसिंग**–लालासाहेबांच्या संध्यांचा परवां मोठाच उपयोग झाला. ते होते ह्मणूनच त्यासभेतील वक्त्यांना मुसक्या बांधून कैद करायला सापडलें. आतां पहातों गुलाम कशीं बादशहाकडे गाऱ्हाणीं नेतात तीं. शिवाणजी लोकपक्षाला मिळालान् मोटा दिल्लीस गेला. पण इथें काय होणार. परत्तोहे तों इकडचा सगळा ग्रंथ संपला ह्मणून समजा ह्मणावं. उलटे आपल्याला कचाट्यांत घालीन तरच हा मत्सरसिंग खरा. आतां कोणाच्या मांडीवर दत्तक द्यायचा ह्या विषयीं ही मुळींच वाद राहिला नाहीं. ललिताबाई काय ती आतां एक दोन दिवसांची सोबतीण. मी कसलं औषध दिलं हें तिला कळलं नाहींन् लालासाहेबाच्या पण ध्यानांत आलं नाहीं ही मोठी बहार उडाली. चला एकदाचा काटा निघाला. बरं झालं ! महाराज बहुधा एकदोन दिवसांत निजधामास गेले ह्मणजे मिळवली एकदाची. आपल्या नाटकाचा हा शेवटलाच प्रवेश ह्मणावयाचा. ( जातो. )

## प्रवेश नववा–किल्यांतील कोठडी.

[ महाराज बिछान्यावर पडले आहेत. सतकुवरबाई आणि लीला जवळ बसतात. ]

**महाराज**–आईसाहेब, या अशा जवळ बसा. माझी सख्खी आई तर वेडी झाली. बडबडत फिरली, शेवटीं पहारेकऱ्यांच्या हातून तिचा अन्त झाला! पण या दुर्भाग्याला तिची भेट नाहीं ती नाहींच झाली. आईग, आलोंच मी आतां! स्वर्गलोकीं तुला मी कधींही विरहदुःख देणार नाहीं बरं!! काय कपाळकरंटा मी! माझ्या हातून तुझी कांहीं देखील सेवा झाली नाहीं. केवळ तुला दुःख देण्याकरतां तुझ्या उदरीं जन्म घेतला! आईसाहेब, तुह्मी मला त्या आईच्याच ठिकाणीं अहां बरं. तुह्मी मला आतां अन्तर्वैरी होऊं नका! पहाट उजाडेलसं मला वाटत नाहीं! यावेळीं मी चांगला शुद्धीवर आहे. एवढी मजवर–देवा–तुझी कृपा आहे बरं!

**सतकुवरबाई**–( सद्गदित कंठानें ) महाराज, दुखणकऱ्यांनीं असं बोलूं नये बरं बाळ! सकाळीं माझ्या बाळाला आराम पडेल बरं!

**महाराज**–आईसाहेब, माझ्या सर्व नाड्या आतां अगदीं आखडल्या. बोलवेल तोंपर्यंत मी कायतो तुमचा सोबती. मी तर या जगाला सोडून चाललोंच पण माझ्या मागं माझ्या या प्रिय लाडकीचं नीट संगोपन करा आं! तुमच्यावांचून हिच्यावर ममता करणारं

मनुष्य तिला कोणी नाहीं! (लीलेकडे वळून) प्रिये,आईसाहेब तुला वडील आहेत त्यांचं ऐकत जा, आणि शुद्ध आचरण असूं दे. तुला मीं सुख ह्मणून कांहींच दिलं नाहीं. तुझ्या अमोल गुणांचं कौतुक कांहींच झालं नाहीं! मी तरी काय करूं! मी हा असा वेडा होऊन कैदेंत पडलों!! सर्व संस्थानच्या लोकांनां माझा वृत्तांत कळवा! त्यांना माझा आशीर्वाद सांगा. लाडके, दे आतां शेवटली भेट! आतां माझ्यानं बोलवत नाहीं! येये. (भेटतात) (एक पहारेवाला प्रवेश करून लीलेला ओढतो. महाराज तडकन उठून त्याची तरवार घेऊन त्याला वार करतात तो लीलेला लागतो.)

**लीला**—प्राणनाथ, मेलें हो मेलें! आपल्या हातून मला मरण आलं हें माझं केवढं दैव! शेवटीं देवानं माझं सौभाग्य रक्षण केलं! चला, आतां स्वर्गात आपण सुखानं राहूं. (मरते)

**महाराज**—(धाडदिशीं खालीं पडतात.) काय दुर्भाग्य हें! शेवटीं मरतांना देखील या चंडाळांनीं मला माझ्या प्रियेला भेटूं दिलं नाहीं आं! अगाई, हे चालले माझे प्राण! प्रिये, आलोंग आलों. (मरतात)

**सतकुवरबाई**—आतां माझ्या डोळ्यानं नाहीं हें दुःख पहावत! हिरा पण हिरा गेला! (तरवार खुपसून घेऊन मरते.)

(लालासाहेब मागे लागलेला मत्सरसिंग प्रवेश करतो. लालासाहेब मत्सरसिंगाला जमिनीवर पाडून वार करतो.)

**मत्सरसिंग**—अरेरे! ह्या दुष्ट चांडाळानं माझा घात केला हो घात केला! कोणी मला वाचवारे वाचवा. अयाई मेलोंरे मेलों!! ( मरतो )

• **लालासाहेब**—दुष्टा, तुला योग्य शासन झालं. जीवाला जीव बळी दिलाच पाहिजे! ललिता तर बिचारी मेलीच! तिचा जीव घेणाराचा मी सूड ही उगवला. आतां हळहळत दिल्लीस परत जाणं कपाळीं आलं खरं! (प्रेताकडे पाहून) या प्रतापसिंहाचा असा दुःखदायक अन्त आतां विनाकारणच झाला ह्मणायचा. जिच्या करतां मी वाटेल तें करण्यास तयार झालों तिला याचा काय आतां उपयोग! जावं झालं!! ( जातो. )

( मुक्का आणि दिवाणजी येतात. )

**मुक्का**—शिव, शिव, काय हे प्राणनाश! दिवाणजी, शेवटीं ह्या संस्थानचा सूर्य मावळला बरं! जिकडे तिकडे आतां निबिड अंधःकार पसरणारना! ( प्रेताजवळ जाऊन) महाराज, शेवटीं आह्माला टाकून गेलां नांहो!! नव्हते तुमच्या दैवीं राज्योपभोग त्याला तुह्मी काय कराल! आजपासून आह्मा सर्व रजपूत लोकांच्या देशाभिमानाला, इमानीपणाला, नावाला ग्रहण लागलं! ह्या इथें लीला वहिनी पडल्या आहेत. हा साध्वि धन्य तुह्मी! शेवटीं पतिसहगमन करून आपल्या शुद्ध प्रेमाचा सगळ्या जगावर स्वच्छ, उज्वळ प्रकाश पाडलास आं! शाबास तुह्मी!

( सतकुवरबाईचें प्रेत पाहून ) आईसाहेब, तुह्मी देखिल महाराजांबरोबर आपला देह ठेवलातना! देवा, ह्या सगळ्यांना स्वर्गलोकीं तरी सौख्य लाभो वरं ! काय हृदयद्रावक भयंकर देखावा हा ! !

**दिवाणजी**—सज्जनसिंग, काय हा अवचित घाला पडलारे ! दिल्लीहून निघालों तों माझ्या ध्यानीं मनीं देखिल अशी गोष्ट आली नाहीं कीरे. थोड्याच दिवसांत आपले मनोरथ पूर्ण होतील न् मी महाराजांना राजश्रीविराजित पाहीन् अशी मला आशा होती. पण इथें येतों तों ही कुऱ्हाड कोसळली! आतां काय करूं! मीं दुष्टानें अनन्त पापं केलीं त्यांचा जाब आतां महाराजांना कसा देऊं ! लोकांचा तर वैरी ठरलों. दुष्कीर्ति संपादन केली. पुढें डोळे उघडले न् कांहीं करतोंय्, तोंच महाराज मजवर रागावून निघून कां हो गेलां ! वरं झालं. माझ्या मुखावलोकनाचा आपल्याला कलंक तरी नाहीं लागला. असो. आतां नको हा व्याप. संन्यासग्रहण करावं न् स्वस्थ हरी हरी ह्मणत पाप क्षाळन करावं ह्मणजे झालं.

**सज्जनसिंग**—चला, शेवटला हा विधी उरकण्याची तजवीज केली पाहिजे. ( पडदा पडतो. )

अंक ५वा समाप्त.